काव्य
४३६०

BVBK-0404360

३७३. २८५७४
बा.मा.
९८८४
३-४-५
दा. क्र. ४३६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 MAY 1975

# नवनीत रामायण

म. ग्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. ७३६० नों. दि.
वि. ... ह.

लेखक

पं. महादेवशास्त्री जोशी

द्वितीयावृत्ति

सन १९५३

BVBK-0404360

मूल्य दीड रुपया

—: प्रकाशक :—
बलवंत संस्था
रत्नागिरी.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]

—: मुद्रक :—
मोरेश्वर दिनकर जोशी,
बी. ए. एल्एल्. बी.
बलवंत मुद्रणालय
२०७५, रत्नागिरी.

# प्राकृत रामायणें

रघुकुलभूषण अयोध्याधीश प्रभु रामचंद्र हें आम्हां भारतवासीयाचें परमश्रेष्ठ उपास्य दैवत आहे. तो आदर्श महापुरुष आहे. जसा ज्ञानी तसाच गुणी. जसा वीर तसाच उदार. अेकवचनी, अेकबाणी, अेकपत्नी ही त्याची बिरुदावलि. पितृभक्ति आणि वचनपूर्ति हें त्याचें कुलव्रत. देवांचें बंधमोचन, दुर्जनांचा संहार आणि प्रजेचा सुखसंतोष हें त्यांचें जीवितकार्य वाल्मीकि मुनींनी त्याचें चरित्र वर्णिलें आणि जनतेच्या हृदयसिंहासनावर त्याला अधिष्ठित केलें.

वाल्मीकींनीं रामायणरचना केल्यानंतर भरतखंडांतल्या अनेक कवि-श्रेष्ठांना रामचरित्र गाण्याची स्फूर्ति झाली आहे. आपली दिव्य प्रतिभा रामरायाच्या चरणीं वाहून ते धन्य झाले आहेत आपल्या महाराष्ट्रांतहि संतकवींनी रामकथागंगेचे प्रवाह खेळवले आहेत. रामायणावर लहानमोठे ग्रंथ रचून त्यांनी स्वतःला धन्य मानलें आहे. रामचरित्रावर आधारलेला केवढा तरी मोठा काव्यसंग्रह महाराष्ट्रसरस्वतीच्या मंदिरांत विराजमान आहे. ज्यांना तो वाचण्याचें आणि त्यांतला रसरंग लुटण्याचें भाग्य लाभलें असेल ते धन्य होत. अितरांना निदान त्यांची तोंडओळख तरी व्हावी म्हणून हे चार शब्द लिहायला प्रवृत्त झालों आहें. हें 'जुनें ठेवणें' असून तें आपल्या हक्काचें आहे आणि म्हणूनच त्याची माहिती करून घेणें हें आपलें कर्तव्य ठरतें.

## भावार्थरामायण

संतमंडळानें रचलेल्या रामायणांत कालक्रम आणि विस्तार या दोन्ही दृष्टींनीं एकनाथमहाराजांच्या "भावार्थ-रामायणा"चा पहिला क्रमांक लागतो. त्यांच्या सर्व वाङ्मयांत हा ग्रंथ मोठा आहे. "श्रीरामरायानें स्वप्नांत दर्शन देऊन प्राकृत भाषेंत रामायण रचण्याची मला आज्ञा केली. अवघड कार्य म्हणून मी नाहीं म्हणत होतों; पण रामानें माझी पाठ

पुरवली. शेवटीं तो माझ्या मीपणाच्या माथीं चढला आणि 'आपुल्या निजसत्ता। वदवी कथा बलात्कारें।'" असें नाथमहाराज चौथ्या अध्यायांत सांगतात.

या ग्रंथाचे अेकूण २९७ अध्याय आहेत. त्यांतले युद्धकांडाच्या ४४ अध्यायापर्यंतचे १७२ अध्याय नाथांचे आहेत. पुढचे १२५ अध्याय गावबा नांवाच्या त्यांच्या शिष्यानें रचून ग्रंथ पुरा केला आहे त्याची हकीगत अशी:–

युद्धकांडाचे ४४ अध्याय पुरे झाले आणि नाथांचा निर्याणकाल आला. तेव्हा भक्तमंडळी त्यांना आग्रह करूं लागली की ग्रंथ पुरा केल्यावांचून तुम्ही अिहलोक सोडूं नका. तेव्हां ते म्हणाले कीं, 'काळाचा खोळंबा करणें बरें नव्हे. माझा ग्रंथ गावबा पुरा करील.'' नाथांचें हें बोलणें अैकून लोक हसले. कारण गावबा हा एक वेडसर प्राणी असून, केवळ पुरणपोळी खाण्यासाठी नाथांच्या घरीं पंधरा वर्षें पडून राहिला होता. पण नाथांच्या कृपेनें त्याच्या अंतरांत प्रतिभेचा अुदय झाला, ज्ञानाचे डोळे उघडले आणि त्यानें आपल्या गुरूचें अपुरें कार्य त्यांच्याअितक्याच तोलानें पुरें केलें.

हा ग्रंथ वाल्मीकिरामायणाच्या आधारें मुख्यतः रचलेला असला तरी अितर रामायणें व रामविषयक संस्कृत वाङ्मय यांचे नाथांनी पुष्कळ ठिकाणीं आधार घेतले आहेत. या ग्रंथांत विद्वत्ता आणि बहुश्रुतपणा यांचा जागोजाग प्रत्यय येतो. त्यांच्या आंगीं मुरलेलें व्यवहारज्ञानहि या ग्रंथांत इतस्ततः विखुरलेलें आहे. नाथांची दृष्टि दिव्य तशीच सूक्ष्म आहे. कोणताहि प्रसंग ते प्रत्यक्ष पाहिल्यासारखा सांगोपांग वर्णितात सहजपणें त्यांच्या हातून रसनिष्पत्ति होते. कथानकांतल्या प्रत्येक व्यक्तीच्या अंतरंगांत शिरून नाथ तिथल्या सूक्ष्म स्वभावछटा इतक्या सुंदरपणें उकलून दाखवतात की मनाला मोहच पडावा.

राम नको नको म्हणत असतांहि सीतेनें वनवासाला येण्याची 'आळी' घेतली. रामानें तिच्यापुढें वनांतल्या कष्टांचा आणि भयस्थानांचा बाऊ

अुभा केला. पण ती डगमगली नाही. त्या वेळीं तिने केलेला युक्तिवाद बिनतोड असून, तिच्या अुच्च मनोभूमिकेची साक्ष देणारा आहे. त्यांतल्या तीनच ओव्या अिथें उद्‌धृत करतों:—

"वृक व्याघ्र पंचानन। त्यांचा आत्मा रघुनंदन।
तो तूं जवळी असतां जाण। द्वंद्वबंधन मज कैंचें?॥
जवळी असतां रघुटिळक! कंटक होती निःकंटक
विष तें होय पीयूख। परम सुख वनवासीं॥
तुज सांगातें वनवास। तो मज वैकुंठ कैलास।
तुजवेगळा संसार वोस! दुःख असोस मज तेंव्हां

भरद्वाज मुनीनें भरताला आपल्या आश्रमांत मेजवानी दिली त्या प्रसंगाचें वर्णन करतांना नाथांनीं वाचकांच्यापुढें साक्षात् स्वर्ग आणून उभा केला आहे. दिव्यान्नांचीं पूर्ण ताटें, नाना रसांनी भरलेल्या वाटघा, गोमटीं लोणचीं, शीतल जल आणि जेवणारांना विझणवारे करायला उभ्या असलेल्या दिव्यांगना अित्यादि अनुपमेय सुखाचा आस्वाद घेतांना पाहुण्यांची काय अवस्था झाली तें थोडेंसें वर्णन वाचा:—

दिव्यांगना अतिसुंदरी। विजणें घेवोनियां करीं।
वांजितात आपुले करीं। त्यांसी जेवणारीं भुलिजेती॥
पाहतां त्यांच्या तोंडांकडे। जेवण अंतरलें पुढे।
जेवणार झाले वेडे। अंगनांकडे पहातांची॥
श्रीरामाचे निजभक्त। अंगनामुखीं नव्हेति आसक्त।
ग्रासोग्रासीं राम स्मरत। जाले तृप्त स्वानंदें॥
वसिष्ठ ताटीं परवडी चोख। तैसोंचे ताट सेविती रंक।
उंच नीच नाहो देख। जेविलें कटक समतृप्ति॥

टिळेमाळा गंधाक्षता । विडे दिधले समस्तां ।
पूजितां श्रीरामाच्या भक्तां । उल्हासता भरद्वाजा ॥

वनें घमघमीत मनोहर । परागें उधळती सपूर ।
सामगायनें मधुर । तैसे भ्रमर रुणझुणती ॥

कोकिळा वाक्यें कूजती । वेदांतपारवीं घुमघुमती ।
तांडवें नाचे उमापति । तैसे नाचती मयूर ॥

शूर्पणखेच्या विडंबनप्रसंगीं त्यांनीं सुंदर विनोद निर्माण केला आहे रावणानें सीतेचें हरण केलें त्या प्रसंगीं तिची अशरणता, तिचा पश्चात्ताप, लक्ष्मणावर आळ घेतल्याबद्दल तिला होणाऱ्या मनोवेदना यांतून करुणरसाचे पूर वाहवतांना,

तूं कां मजवरी रुसलासी । तुझे चरण झाडीन केशीं ।
थोर गांजिलें राक्षसीं कवणापासी मी सांगों ! ॥

या ओवीनें प्रकर्षाची परमावधि गांठली आहे. रामाच्या विरहावस्थेचें वर्णन करतांना कालिदासाच्या अजाला आणि यक्षालाहि खालीं पहायला लावलें आहे. रामानें तारेला केलेला उपदेश म्हणजे ती एक छोटीशी गीताच आहे. त्यांत देह आणि आत्मा, जीव आणि शिव तसेंच बंध आणि मोक्ष यांचा विवेक मोजक्या शब्दांत, परिणामकारकपणें आणि सोदाहरण सांगितलेला आहे. मारुतीनें रामाची मुद्रिका आणून सीतेच्या ओंजळींत टाकतांच सीतेला झालेला आनंद आणि तिनें त्या जड मुद्रिकेशीं केलेलें हितगुज हें एक हृदयंगम काव्य आहे.

"मुद्रिका वंदिली निढळीं । मग आलिंगिली हृदयकमळीं ।
स्वानंदें चुंबी जनकबाळी । सुखें वेल्हाळी आलीसी ॥
तूं माझी सखी श्रीराममुद्रा । घाल्ूं सेजे करीं निद्रा ।
श्रमलीस उतरतां समुद्रा । आणि गिरीवरा उल्लंघितां ॥

अशा अनेक सरस ओव्या नाथांच्या लेखणींतून उतरल्या आहेत.

कोणत्याहि कथेला अध्यात्माचा रंग कसा द्यावा हें नाथांनाच विचारावें. कांहीहि लिहायचें झालें तरी त्यांची अध्यात्मदृष्टि ढळत नाहीं. सगळें चराचर अध्यात्मरूपानेंच ते पाहातात. त्यांच्या वाङमयांतहि तें सहजपणें उतरतें. भावार्थ-रामायणालाहि असेंच अध्यात्माचें अस्तर आहे. अध्यात्माला महत्त्व देऊनहि त्यांनीं कथेचा परिपाक बिघडूं दिला नाहीं. चित्ताची मोहोर निर्गुणाकडे असतांहि त्यांनीं सगुणाची गोडी तितक्याच आवडीनें घेतली आहे. राम म्हटलें कीं, त्यांना त्याच्या जागीं परमात्मा दिसतो. सीता म्हणजे त्याची चिच्छक्ति असें ते मानतात.

" माझें स्वरूप चैतन्यघन । सीता चिच्छक्ति संपूर्ण ॥"

दशरथ म्हणजे दशेंद्रियें. कौसल्या म्हणजे सद्विद्या. सुमित्रा शुद्ध मेधा. कैकेयी अविद्या. दहा इंद्रियें जेव्हां वीतराग झालीं तेव्हांच सद्विद्येच्या पोटीं ज्ञानरूप परमात्मा अवतरला, असें हें प्रचंड रूपक आहे. रामासह चौघे भाऊ म्हणजे ते कोणीं वेगवेगळे नसून एकाच परमात्म्याचीं तीं चार रूपें आहेत असें नाथ सांगतात.

" आत्मप्रबोध तो लक्ष्मण । भावार्थ तो भरत जाण ।
निजानिर्धारी तो शत्रुघ्न । आनंदविग्रही पूर्ण श्रीराम ॥ "

सगुण निर्गुण एक परमात्मा या भूमिकेवरून त्यांनीं हा ग्रंथ रचला आहे.

## कौतूहलरामायण

मुक्तेश्वर हा एकनाथांचा नातू. आजोबांच्याप्रमाणेंच यालाहि एक रामायण रचण्याची स्फूर्ति आली आहे. ' संक्षेपरामायण ' असें मुक्तेश्वरानें त्याला नांव दिलें असलें तरी ' कौतूहलरामायण ' या नांवानें लोकांत तें प्रसिद्ध आहे. मुक्तेश्वर म्हटला कीं त्याची सकलकाव्यगुणांनीं नटलेली रसरशीत ओवी डोळ्यांपुढें उभी रहाते. पण त्यानें हें रामायण ओवीबद्ध लिहि-

लेलें नसून, तें श्लोकात्मक आहे. अिंद्रवज्रा, भुजंगप्रयात, शिखरिणी, अनुष्टुभ्, स्रग्धरा अित्यादि वृत्तें त्यांत त्यानें उपयोजिलीं आहेत. याची श्लोक संख्या १७२५ आहे. सर्वांत उत्तरकांड मोठें असून त्याच्या खालोखाल युद्धकांड आहे. महाभारत लिहिण्यापूर्वी त्याने हें काव्य लिहिलें असावें असें म्हणतात आणि तें खरेंहि वाटतें. कारण महाभारतांतले तरल कल्पना, सहजता, भाषेवरचें प्रभुत्व, आवेश, रसाळपणा इत्यादि काव्यगुण त्याच्या रामायणांत तितक्या प्रमाणानें दिसून येत नाहींत. रामायण रचतांना तो नवशिका कवि वाटतो. रामायणांत त्यानें शब्दांची खूप ओढाताण केली आहे. ऱ्हस्व–दीर्घाचे नियम संभाळले नाहींत. क्वचित् शब्दांच्या मानाहि मुरगळल्या आहेत. क्लिष्टता तर बऱ्याच ठिकाणीं आहे.

'कौतूहलरामायणां' तले लंकादहन, द्रोणागिरी आणणें, रावण-कुंभकर्णांची जन्मकथा, सीतात्याग हे प्रसंग वाचनीय आहेत. त्याच्या पुढच्या महाकविपणाचीं बीजें त्यांत आढळतात.

"म्हणे मारुती, 'पाथरा ! द्रोण शैला
जडा निष्ठुरा नेणसी कष्टवेला
त्वरामाजि लंकेसि नेऊन तूतें
जगीं कोपल्या कोण वारील मातें ?
बळें पर्वता घातले तीन वेढे
करें कर्षिलें, आवळी पुच्छ गाढें
कडाडे कडे काढितां शैल्यवेगा
जडे मेदिनी पिंडिका जेवि लिंगा
उचलुनि गिरि पृष्ठीं वाहिला वीरराजें
उसळत नभपंथीं गर्जतां मेघ लाजे"

........................ ...............

वरील उताऱ्यांतला भाषेचा जोर आणि वर्णनांतलें ओज मनाची पकड घेणारें आहे. लिंग–पिंडिकेचा दृष्टान्त तर फारच बहारीचा आहे. सीतात्यागाचा प्रसंग वाचतांना कालिदासाच्या रघुवंशांतल्या चौदाव्या सर्गाची आठवण होते. एका बाजूनें रामाची आज्ञा आणि दुसऱ्या बाजूनें सीतेविषयीं सस्नेह मातृभाव अशा कात्रींत सांपडलेल्या लक्ष्मणाचें चित्र, मुक्तेश्वरानें कालिदासाइतकेंच भावरम्य असें चितारलें आहे. सीतेची मनोवृत्तीहि तशीच दाखविली आहे. तिथला थोडासाच मासला पहाः—

"तरुतळीं तृणशय्यें बैसली लोकमाता
सकरुण फणिराजें वंदिले पाय माथां
वदनविधु विलोकी सद्गदा कंठ दाटे
उभय नयनपंथीं सांचलें नीर लोटे
प्रदक्षिणा पंकजईक्षणीतें
सारूनि, पायावरि मस्तकातें
ठेवोनि बोले अळुमाळ संज्ञा
अलोट माते रघुराजआज्ञा
"रघुपतिचरणांतें मानसामाजि ठेवी
अनुदिनि रसनेतें रामरंगेंची लावी
रघुपतिकरुणेचा मेघ वोळेल जेव्हां
नयनवदनमेळें पावसी सौख्य तेव्हां !"

अेखाद्या प्रिय व्यक्तीचें सांत्वन करावयाला याहून गोड आणि कोवळे शब्द कोण आणूं शकेल बरें !

मुक्तेश्वरानें या ग्रंथांत जयदेव कवीच्या प्रसन्नराघव नाटकाचें व हनुमन्नाटकाचें बऱ्याच ठिकाणीं अनुकरण केलें आहे. कित्येक ठिकाणीं तर त्यांतल्या श्लोकांचें शब्दशः भाषांतरच आहे. प्रस्तुत ग्रंथांत अनेक ठिकाणीं

यमकें, अनुप्रास व बंधहि साधलेले आहेत. कांहीं ठिकाणीं तर पादांत्य यमकाला चाट देऊन गर्भिक यमक साधण्याचें चातुर्य त्यानें दाखविलें आहे. पहिल्या चरणाच्या अंतीं व दुसऱ्या चरणाच्या मध्यें जिथे यति असेल तिथे यमक साधणें याला गर्भित यमक म्हणतात. उदा० ' पाताल नगरीं **रामा** । दिव्य **धामा** विलोकल्या. ' यमकासाठीं त्यानें फारशी ओढाताण मात्र केलेली नाहीं. श्लेषहि बऱ्याच ठिकाणीं आहेत. किंबहुना असें म्हणतां येईल कीं, मुक्तेश्वरानें या ग्रंथांत शब्दालंकारांची हौस पुरतेपणीं फेडून घेतली आहे. रामदासांप्रमाणेंच मुक्तेश्वरानेंहि युद्धप्रसंग वर्णितांना बहुशः भुजंगप्रयात वृत्ताचा अवलंब केला आहे. हें वृत्त रणधुमाळीस साजेसें आहे यांत शंका नाहीं.

## समर्थ रामदासकृत रामायण

संत मंडळींनीं रामायणावर काव्यरचना केली ती रामकृपा व्हावी आणि तिच्या द्वारा भक्ति–मुक्तींचा लाभ व्हावा म्हणून. लौकिकदृष्टि ठेवून आणि तात्कालीन परिस्थिति लक्षांत घेऊन रामायण लिहिलें तें फक्त रामदासस्वामींनीच असें म्हटलें पाहिजे. त्यांना रामकृपा हवी होती ; पण त्याबरोबरच महाराष्ट्राचें दास्यविमोचनहि हवें होतें. महाराष्ट्र ' आनंदवनभुवन ' झालेला पहाण्याची त्यांना विलक्षण तळमळ होती. महाराष्ट्रांत वीरवृत्ति, अैक्य, शिस्त आणि धर्मावर श्रद्धा निर्माण होण्यासाठीं त्यांनीं जे अनेक प्रयत्न केले, त्यापैकींच रामायणरचना हा अेक प्रयत्न होय. आपल्या काव्याच्या द्वारें त्यांनीं मराठ्यांच्या नसांनसांत वीरवृत्ति खेळविली. मारुतीचा कथाप्रसंग वर्णून त्यांच्यापुढें स्वामिभक्तीचा आदर्श ठेवला. वानरांच्या पराक्रमाचें वर्णन करून संघटनेचें सामर्थ्य काय आहे तें सांगितलें. रघुकुलतिलकाचे लोकोत्तर सद्‌गुण गाअून लोकांचीं मनें देवाधर्माविषयीं सश्रद्ध केलीं.

समर्थांचें रामायण सुंदरकांड आणि युद्धकांड अेवढ्यापुरतेंच आहे. मारुती सीताशुद्धीसाठीं निघाला अिथपासून तों रामाच्या राज्याभिषेकापर्यंतचा भाग त्यांत वर्णिलेला आहे. सुंदरकांडाचे शंभर श्लोक आणि युद्धकांडाचे तेराशे-

च्यावर मिळून १४६२ अेवढी त्याची श्लोकसंख्या आहे. रावणानें बंदींत टाकलेल्या देवांना बंधमुक्त करण्यासाठीं रामाचा अवतार झाला, तेव्हां तेवढाच कथाभाग मुख्यत्वें वर्णावा असा समर्थांचा हेतु दिसतो. 'बंधमोचक' हें विशेषण त्यांनीं रामाला अनेक वेळां लावलें आहे त्याचें तात्पर्य हेंच असावें. वीररस हा समर्थांचा आवडता रस. त्याचा परिपोष करायला सुंदर आणि युद्ध या दोन कांडांतच भरपूर वाव असल्यामुळें समर्थांनी काव्यरचनेसाठीं त्यांची निवड केली असावी.

समर्थांची भाषा ओजस्वी आहे. तिच्यांत मिळमिळीतपणा औषधालाहि सांपडायचा नाहीं ते अलंकारांच्या नादाला विशेषसे लागले नाहींत. मनांत आलेल्या कल्पना शक्य तितक्या चांगल्या शब्दांत मांडाव्या असाहि हव्यास त्यांनी घरला नाहीं जें वर्णायचें तें अुघड्या अर्थानें त्यांनीं वर्णिलें आहे. आणि हा अनलंकृत स्पष्टपणाच त्यांच्या काव्याला गोडी आणतो. पुढें दिलेल्या लहानशा अुताऱ्यावरूनच या गोष्टीचा प्रत्यय येअील.

मारुतीच्या शेपटीला वस्त्रें गुंडाळून आग लावली तो प्रसंगः—

" तया लावितां वन्हि तेथे नलागे
बळें फुंकितां तो विरेंवीर भागे
तया देखतां रावणू सीघ्र आला
वळें फुंकितां फुंकितां तो गळाला
पुढें रावणू थोर कोपें कडाडी
बळें फुंकितां ज्वाळ नेटें भडाडी
जळालीं मुखें भस्मल्या खाडमीषा
बहूसाळ लंबीत होत्या विशेषा
बळें चेतला वन्हि नेटें भडाडी
कडाडति ज्वाळा दडाडी धडाडी

कपीवीर तो वाड झाला उडाला
पुढे ज़ाळिता जाहला त्रीकुटाला
गृहांगोपुरांमाजि तो पुच्छ घाली
त्रिकूटाचळीं आगि नेटें निघाली
विदी, हाट, बाजार, चौबार कुंचे
पळें, वोंवली, नागिवा लोक नाचे

त्यांचीं खणाखणीचीं युद्धवर्णनें तर विशेष स्फूर्तिप्रद आहेत. सृष्टिवर्णनेंहि पाहून लिहिल्यासारखीं हुबेहुब वाटतात. ते भाषेचे गुलाम नाहींत. शब्दांचे पांगिले नाहींत. आपल्याला हवी तशी भाषा त्यांनीं वांकवली आहे. वृत्तांत बसतील अशाप्रकारें शब्दांचे आकार बदलले आहेत. ग्रीवेबद्दल 'ग्रिवा,' लंकानाथबद्दल लंकनाथ, 'असिलते-बद्दल 'आसिलता' अशरीरिणी 'आश्रिणी' अशी शब्दांची ओढा-ताण करतांना त्यांनीं मुळीच मागेपुढें पाहिलें नाहीं. वस्तुतः हे काव्यदोष आहेत. पण त्यांच्या ओजस्वी अनिर्बंध वाक्प्रवाहांत ते दडून जातात. त्यांच्या भाषेत जोमच अेवढा जबरदस्त आहे कीं, कथेच्या पकडींतून सुटून दोष पहायला अवकाशच मिळत नाहीं, शब्द हें काव्याचें शरीर आणि रस हा आत्मा असें काव्यशास्त्रज्ञ मानतात. समर्थांनीं काव्यशरीराकडे दुर्लक्ष केलें असलें तरी त्याच्या आत्म्याची चांगल्या प्रकारें जोपासना केली आहे. त्यांच्या रामायणांत राजनीति, व्यवहारज्ञान, सदाचार यांचे दाखले पुष्कळ ठिकाणीं आढळतात. अेकंदरींत समर्थांच्या या रामायणाला 'स्फूर्तिरामाण' असें म्हणतां येअील.

## 'रामविजय'

श्रीधर कवीनें 'रामविजय' नांवाचा जो अेक ग्रंथ लिहिला आहे तेंहि अेक रामायणच आहे. याचे ४० अध्याय असून छंद ओवी आहे. वाल्मीकिरामायण, हनुमंत काव्य व व्यासांनीं भारत–भागवतांत

वर्णिलेलें रामचरित्र यांच्या आधारें कवीनें हा ग्रंथ सजवला आहे. हा कवि, अितका प्रेमळ आणि हळव्या मनाचा होता कीं, सगळें रामायण रचून झाल्यावर, श्रीराम निजधामाला गेले हा करुण गंभीर वृत्तांत त्याला वर्णवेना. तेव्हां रामराया मध्यान्हीं प्रकट होअून त्यानें त्याला किरातवधाच्या प्रसंगाअखेर ग्रंथ पुरा करण्यास सांगितलें असें श्रीधरानें स्वत:च लिहून ठेवलें आहे. आपल्या ग्रंथाला पंढरीनाथाचें वरदान आहे असें तो सांगतो.

आणि अेका अर्थीं ती गोष्ट खरीहि आहे. श्रीधराचे रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप अित्यादि ग्रंथ अत्यंत लोकप्रिय झाले आहेत नव्या पिढीची आवड बदलली असली तरी जुनीं माणसें अजून त्याचे ग्रंथ आवडीनें वाचतात आणि कथेचा रंग लुटतात. महाराष्ट्रांतल्या कित्येक पिढ्यांनीं त्याच्या ग्रंथांच्या द्वारें हरिप्रेमाची आणि काव्यानंदाची गोडी चाखली आहे.

ज्ञानेश्वर आणि मुक्तेश्वर यांच्या ओवीची परंपरा तितक्याच तोलानें कोणी पुढें चालविली असेल तर ती अेका श्रीधरानेंच. मुक्तेश्वर तर त्यानें आपल्या अंगीं मुरवला आहे. रामविजय हा ग्रंथ प्रासादिक म्हणजे प्रसादपूर्ण आहे. कुठलेंहि पान अुघडून वाचायाला लागलें तरी वसंतऋतूंत कळ्याफुलांनी बहरलेल्या अुद्यानांत गेल्याचा भास होतो आणि मन तिथून बाहेर निघतच नाहीं. नादमधुर शब्द आणि हृदयंगम कल्पना यांचा त्याच्या काव्यांत प्रीतिसंगम झालेला आहे. त्याची भाषेची कोवळीक संस्कृत वाङ्मयांत जयदेव कवीच्या तोडीची आहे ग्रंथारंभीं त्यानें जें नमन केलें आहे त्यांतल्या चार–पांचच ओव्या माझ्या म्हणण्याची साक्ष पटवतील.

“ आता नमूं सरसिजोद्भवकुमारी । जी विलसे
सदा कविजिव्हारीं ॥
जीच्या वरदानें मुकाहि करी । वाचस्पतीशीं संवाद ॥
जी आनंदसरोवरमराळिका । जी चातुर्यचंपककलिका ॥

संग्रहालय, क्रमांक २९६७ ९८४ नों. दि.

जी निजकृपेची करूनी नौका । कविबालका नेत पैलतिरा ॥
अगे तूं कविहृदयाब्जभ्रमरी । की निजानंद सागरींची लहरी ॥
वाग्वल्ली त्वां बैसोनि जिव्हाग्रीं । विरूढें सफल सर्वदा ॥
विवेकहंस शुद्ध धवळ । त्यावरी तुझें आसन अचळ ॥
तप्तकांचन जैसें सुढाळ । तैसें निर्मळ अंग तुझें ॥
शुभ्र कंचुकी शुभ्र अंबर । दिव्य मुक्तांचे अलंकार ॥
निजबोधवीणा घेवोनि सुस्वर । गायन करिशी स्वानंदें ॥

त्याचे अहल्योद्धार, सीतास्वयंवर, कौसल्येनें रामाची पाठवणी करतांना काढलेले करुणालाप हे सर्व प्रसंग वाचतांना वाचकांच्या हृदयाला द्रव आणि डोळ्यांना पाणी येतें. अवसर सांपडेल तिथें त्यानें सामान्य नीतीचा सुंदर उपदेश केला आहे.

उपमा आणि दृष्टांत यांची रेलचेल उडवून देण्याच्या कामीं त्यानें ज्ञानेश्वरांना गुरु केलें आहे. मुक्तेश्वराच्या रूपकासारखीं मोठमोठीं सांग परंपरित रूपकेंहि त्यानें यशस्वीपणें मांडून दाखविलीं आहेत. नाथांच्या भावार्थरामायणांतल्या कित्येक कल्पना त्यानें उचलल्या आहेत आणि त्याच्यापेक्षांहि नीटस, गोंडस करून पुढें मांडल्या आहेत. करुण रसाचा परिपोष करतांना तर तो कमालच करतो. काव्याचे बहुतेक गुण त्याच्या ग्रंथांत आढळतात. जिव्हाळा तर सगळीकडेच भरलेला आहे.

## मोरोपंती रामायणें

मोरोपंतांनी आपल्या उतार वयांत रामायणावर काव्यरचना केली. पंत हे एकनिष्ठ रामोपासक असल्यामुळें, त्यांनीं विविध रामायणांची पुष्पांजली रामाच्या चरणी वाहिली आहे. पंतांनीं १०८ रामायणें लिहिलीं असा सार्वत्रिक समज आहे. पण मोजदाद केल्याअंतीं त्यांची संख्या तेवढी भरत नाहीं. एकंदर ७७ रामायणें छापलीं गेलीं आहेत. 'स्त्रग्विणी रामायण'

दंडक रामायण ' इत्यादि ११ रामायणें पंढरपुरांत त्यांच्या व चातुर्मास्ये यांच्या दप्तरांत हस्तलिखित आहेत. मिळून ही संख्या ८८ होते. आणखीं कांहीं असतील तर त्यांचा आज ठावठिकाणा लागत नाहीं.

यांपैकीं मंत्रबद्ध रामायणें ३१ आहेत. यांत राम, अनेक देव, तीर्थें व संत यांचीं नांवें गुंफलेलीं आहेत. मंत्र रामायण हें पंतांचें रामायण होय. हे आर्याबद्ध आहे. या शिवाय संस्कृतांतहि त्यांनी एक रामायण रचलें असून, त्यालाहि मंत्ररामायण हेंच नांव द्यावयाचें कारण

मंत्रप्रयुक्त रचिलें चरित्र भावेंचि रामरायाचें

असें पंतांनींच सांगितलें आहे. ' श्रीराम जयराम जयजयराम ' हा त्रयोदशाक्षरी मंत्र त्यांत गुंफलेला आहे. फुलांच्या वेणींत कुशल माळी मध्येंच एकादें पान भरून तिला जसा आकर्षकपणा आणतो तसाच हा प्रकार आहे. पहिल्या कांडांत आर्येचें पहिलें अक्षर, दुसऱ्यांत दुसरें, अशा प्रकारें सातव्या कांडापर्यंत अक्षरें मंत्रमय साधलेलीं आहेत. " आर्येच्या प्रथमदलीं दुसरा तो मंत्रवर्ण समजावा–दुसऱ्या कांडापासुनी षट्कांडीं ह्याचि मार्ग उमजावा " असें पंत यांच्या रचनेविषयीं सांगतात. याच्या १८८० आर्या आहेत सातहि कांड मिळून त्रयोदशाक्षरी मंत्र १४६ वेळां साधला आहे.

' बालमंत्र रामायणा ' चें प्रत्येक कांड ३९ आर्यांत पुरें झालेलें आहे. मंत्रगर्भरामायणा ' च्या प्रत्येक आर्येत मंत्राचे तेराहि वर्ण साधलेले आहेत. ' नामांकरामायणांत ' पूर्वार्धाच्या आरंभीं ' रा व उत्तरार्धाच्या आरंभीं ' म साधून १२९ आर्यांत तें पुरें केलें आहे. याच पद्धतीची ' शिव ' व ' उमा ' रामायणें आहेत. ' सन्नामगर्भ ' रामायणांत भारतीय संतांचीं नांवें खुबीनें गुंफलीं आहेत.

याशिवाय त्यांचीं कांहीं चित्ररामायणें आहेत. एकाच्या प्रत्येक आर्येत ' परंतु ' शब्द असल्यामुळें त्याला ' परंतु रामायण ' असें म्हणतात. मात्रा-रामायणांत ऋ, लृ, लॄ ङ, ञ ळ, हे वर्ज्य करून बाकीचे अ पासून ज्ञ पर्यंतचे वर्ण आर्यारंभीं घेतलेले आहेत. ' निरोष्ठरामायणांत ' पवर्ग मुळींच नाहीं

तिथे ' राम ' शब्दाऐवजीं ' रघुनाथ ' शब्द योजिला आहे. हें सगळें रामायण तोंड उघडें ठेवून म्हणतां येतें. त्यांच्या अनेक रामायणांत अशा अनेक गमती आहेत. पण त्यांचा विस्तार करण्याचें हें स्थळ नव्हे. हीं रामायणें वाचलीं असतां पंतांचें पराकोटीचें भाषाप्रभुत्व दिसून येतें आणि मन आश्चर्यस्तिमित होतें.

पंतांच्या सर्व रामायणांत मंत्र रामायण हें संख्येनें मोठें व गुणांनी समृद्ध असें आहे. अलंकाराचे तर तें भांडारच आहे. एखाद्याला मराठी भाषेंत सगळ्या अलंकारांचीं उदाहरणें द्यावयाचीं असल्यास, त्याला दुसरा काव्यग्रंथ हातांत सुद्धां धरावा लागणार नाहीं. हे अलंकार यमकाप्रमाणें मुद्दाम साधलेले नसून स्फूर्तीच्या ओघांत सहजपणें घडलेले आहेत. सुश्लिष्ट रचना, भाषेचा दमदारपणा, यमकचातुर्य, अनुप्रास, सौंदर्य, पांडित्याचा प्रकर्ष आणि भक्तीचा जिव्हाळा हे गुण त्यांच्या मंत्ररायायणांत ठळकपणें दिसून येतात.

त्यांनीं भारताचें जें रम्योदात्त स्वभावचित्र काढलें आहे तें पाहून वाचकांच्या तोंडून सहजगत्या ' वाहवा ' ! असा उद्गार निघेल. सीताहरण झाल्यावर त्यांचा राम तो रिक्त आश्रम पाहून परोपरीनें विलाप करतो.

' मज राजकन्यके तूं वरूनियां पावलीस न सुखातें। खातें हें चित्तातें, सांगों कोणास मी स्वदुःखातें '!

असा तो स्वतःला दोष लावून घेतो आणि शेवटीं तिला विविध मधुर संबोधनांनीं हाकारून

' अमृताहुनी गोडसें स्वयें वद ये '

म्हणून तिची प्रार्थना करतो. पंपासरोवराच्या परिसरांतलीं वृक्ष-वल्ली-भ्रमर मयूरपिच्छें पाहून त्याला सीतेच्या नाजुक पण कांतिमान अवयवांचें स्मरण होतें व

' नवनीतकोमलांगी सीता दिसते मला मनोभवनीं '

असें तो लक्ष्मणाला सांगतो. या आणि अशाच अन्य कांहीं प्रसंगीं पंतांनी

करुणरसाचे डोह निर्माण केले आहेत. मारुतीच्या सेवेविषयीं कृतज्ञता व्यक्त करतांना

'आम्हां उपकाराचा सागर लंघावया नसे नाव' असे भावार्द्र शब्द ते सीतेच्या तोंडून वदवितात. शिष्टाईच्या प्रसंगीं अंगदानें दाखविलेला रुवाब, आणि रावणाला केलेला सदुपदेश वाचून 'एथ चातुर्य शहाणें जालें' असें म्हणावेंसें वाटतें. कुंभकर्णाला दीर्घनिद्रेंतून उठविण्याच्या प्रसंगीं त्यांनीं वाचकांना अद्‌भुतरसाची पोटभर मेजवानी दिली आहे. रणधुमाळीचें वर्णन करतांना त्यांची भाषा सुद्धां तोच खणखणाट आणि गडबडाट घेऊन उठते आणि तांडव मांडते. लक्ष्मण मूर्च्छेतून सावध झाल्यावर उभयपक्षीं जें युद्ध झालें त्याचें थोडेसें वर्णन वाचा.

" शर नाराचांजलिकप्रासगदाखड्‌गशूलपरि घातें
हातें धरुनि राक्षस ताडिति कीशांसि निष्ठुराघातें
शूर प्लवंग रागिट विकट कठोर प्रचंड भुज धीट
नीट प्रहार करुनी, शत्रूंतें रगडिती जणों कीट
तो अतुल लोमहर्षण रण जेथें शोणितापगापूर
राक्षस कपींस तैसे जैसा दीप्तानलास कापूर

...................................................

तेव्हा 'जयजय' शब्दें गर्जति मुनि, सिद्ध, देव, गंधर्व
पर्व अपूर्व तयांला झालें, आनंद पावले सर्व
ते दुंदुभि वाजविती धिमिधिमिधिमि देवलोक आनंदें
गंधर्व करिति तनतन, तत्थैथैथैय्य अप्सरोवृंदें "

असे किती प्रसंग सांगू आणि किती उतारे देऊं ? खरें म्हणजे वाचकांनी हें मुळांतून वाचलें पाहिजे. दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी कितीसें मिळणार ? संतकाव्याचीं प्रकरणेंच्या प्रकरणें पाठ असलेले कांही जुन्या

पिढींतले म्हातारे बैठकींत रंग भरतांना मी पाहिले आहेत. एका काळीं मोरोपंतांच्या आर्यांचा अर्थ लावतां येणें हें सुसंस्कृतपणाचें आणि सुशिक्षितपणाचें लक्षण समजलें जात असे. वधूपिते वरपरीक्षा करतांना त्याला मोरोपंत कितपत समजतो त्याची चौकशी करीत असेंहि एका वृद्धानें मला सांगितलें आहे. पण हल्लीच्या पिढींत प्राकृत वाङ्मयाबरोबरच मोरोपंतांविषयींहि अनास्थाच दिसून येते. जुन्या पिढीचे कीर्तनकार आर्याबद्ध चरित्रें सांगून श्रोत्यांच्या कानामनाची धणी पुरवीत. पण नव्या कीर्तनकारांनी ती परंपरा सोडली आहे. पंतांच्या खुमासदार आर्येच्या ऐवजीं ते स्वकृत नीरस कवनेंच तानाआलापासह श्रोत्यांच्या कानांत कोंबतात. असो.

समर्थसंप्रदायांतल्या गिरिधर नांवाच्या एका कवीनेंहि संकेतरामायण मंगलरामायण अशीं कांहीं रामायणें रचलीं आहेत. पण त्यांत सांगण्यासारखें वैशिष्टच मला कांही दिसलें नाहीं. त्यांत गुणांपेक्षां दोषांचेंच प्रमाण अधिक आहे. तें एक अंध आणि दुर्बल अनुकरण आहे असें म्हटल्यास त्यांत कांही वावगें होणार नाहीं. निरंजनमाधवानेंहि चिद्बोधरामायण नांवाचें एक काव्य लिहिलें होतें; पण तूर्त त्याचें बालकांडच तेवढें उपलब्ध आहे. बाकीचें जळून गेलें असें सांगतात. याशिवाय वामनपंडित नागेश, विठ्ठल, आनंदतनय अित्यादि कवींनी रामायणांतल्या विविध प्रसंगांवर आख्यानें रचलीं असून तींहि आपल्यापरी सुरस आहेत.

हीं सगळीं रामायणें पाहिली कीं, माझा रसलोलुप आत्मा भुलून जातो. मला त्या ग्रंथांचा अभिमान वाटतो मी त्या कविश्रेष्ठांना हार्दिक धन्यवाद देतों. एकच रामकथा; पण संतांनी तिच्या अंगावर आपापल्या प्रतिभेचीं वेगवेगळीं लेणीं चढवून तिला विविधता आणि रम्यता आणली आहे. एकच अमृत; पण तें नानारंगी, नकशीदार पेल्यांतून पाजलें आहे. महाराष्ट्र–शारदेचें सौभाग्य थोर की असे सत्कवि तिला लाभले.

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| बालकांड | .... | .... | पृष्ठ | १–२४ |
| अयोध्याकांड | .... | .... | ,, | २५–४० |
| अरण्यकांड | .... | .... | ,, | ४१–५१ |
| किष्किंधाकांड | .... | .... | ,, | ५२–५८ |
| सुंदरकांड | .... | .... | ,, | ५९–७१ |
| युद्धकांड | .... | .... | ,, | ७२–८६ |
| उत्तरकांड | .... | .... | ,, | ८७–९९ |

# नवनीत रामायण

## बालकांड

रघुकुलतिलक श्रीरामचंद्राची कथा ही पुण्यपावन आहे. श्रवणमात्रें ती जड जीवांचा उद्धार करते. ती पातक्यांचें दुरित घालवते. पुण्यवंतांना उत्तम गति देते. संसारी जनांना कर्तव्याचा चोखाळ मार्ग दाखवते. 'रंजले गांजले' असतील त्यांना विसांवा देते. संकटग्रस्तांना स्फूर्ति देते. प्रयत्नवाद्यांचा उत्साह वाढवते. साधुसंतांना रमवते. तीच कथा आतां आपल्याला महाराष्ट्र–संत-कवींच्या वाणीनें गावयाची आहे. वाङमयीन आनंदाची लयलूट करायची आहे. यासाठीं आपलें हें आरंभलेलें कार्य निर्विघ्नपणें समाप्त होवो म्हणून ग्रंथारंभीं गणरायाला पहिलें नमन करूं या.

### १ गणेश स्तवन

"मंगलदायक तूं गजवदन मंगलारंभीं तुझें चिंतन
मंगळजननीवरी[1] कारितां लेखन तुझे गुण न सरती १

रक्तोत्पलें सुकुमार बहुत तैसे चरणतळवे आरक्त
प्रपद[2] गौर नेपुरेंसहित ध्याती भक्त हृदयांतरीं २

क्षीरापरी[3] अति श्वेतांबर[4] कीं कांसे लागला क्षीरसागर
कीं निर्दोष यश पवित्र वसनरूपें आकारलें ३

---

१ पृथ्वी. २ पादाग्र ३ दूध. ४ शुभ्र वस्त्र.

अरुणसंध्यारागमिश्रित तैशी उटी दिसे आरक्त
कीं मंदराचळ सिंदूरें चर्चित चारी हस्त विराजती ४

भक्तांचा मनोवारण[1] अनिवार नावरे कदा साचार
तो अकर्षावया निर्धार विवेकांकुश धरियेला ५

भावें जे शरण येती अज्ञात जन त्यांचे छेदावया अविद्याविपिन
यालागीं ऊर्ध्व फरश धरून सिद्ध गजानन सर्वदा ६

हातीं झळके लीलाकमळ जें अम्लानचि सर्वकाळ
तेणें पूजूं इच्छी भक्त प्रेमळ जें का निर्मळ अंतर्बाह्य ७

जैसे कल्पांतविजूचे उमाळे तैसे अलंकार आंगीं मिरवले
नक्षत्रपुंज गुणीं[2] ओविले तेविं मुक्ताहार डोलती ८

हृदयाकाशीं सुरेख पदक झाला तो मृगांक
क्षयरहित निष्कलंक निजसुखें सुरवाडला ९

मुगुटीं झळकती रत्नकिळा तेणें नभमंडळ उजळला
आदिपुरुष हा साकारला वरदान द्यावया कवीतें " १०

**श्रीधरकृत रामविजय**

गजवदना, तुझा जयजयकार असो. माझ्या प्राकृत बोलांनीं तुझें महिमान मी कसा वर्णूं ! कल्पवृक्षापुढें बोर नेऊन ठेवावें, कामधेनूला वाळल्या गवताची मूठ घालावी, किंवा सुवर्णमेरूच्या पायथ्याशीं गारगोटी मांडावी, तसे तुझ्या माहात्म्यापुढें माझे हे दुबळे शब्द आहेत.

## २ शारदा–स्तवन

" आतां नमूं सरसिजोद्भवकुमारी[3] जी विलसे सदा कविजिव्हारीं
जीच्या वरदानें मुकाहि करी वाचस्पतीशीं संवाद ११

---

१ मनोरूप हत्ती. २ दोऱ्यांत. ३ ब्रह्मदेवाची कन्या.

जी आनंदसरोवरमरालिका जी चातुर्यचंपककलिका
जी निजकृपेची करूनि नौका कविबाळका नेत पैलतिरा १२

अंबे तूं कविहृद्याब्जभ्रमरी कीं निजानंदसागरींची लहरी
वाग्वल्ली त्वां बैसोनि जिव्हाग्रीं विरूढे सफळ सर्वदा १३

विवेकहंस शुद्ध धवळ त्यावरी तुझें आसन अचळ
तप्त कांचन जैसें सुढाळ तैसें निर्मळ अंग तुझें १४

शुभ्र कंचुकी शुभ्र अंबर दिव्य मुक्तांचे अलंकार
निजबोधवीणा घेवोनि सुस्वर गायन करिशी स्वानंदें" १५

**–श्रीधरकृत रामविजय**

पृथ्वीचें वजन कोणाला करवेल! समुद्रांतल्या पाण्याचे थेंब कोण मोजूं शकेल! सप्तसागर बाहुबळावर कोण उल्लंघील! हें जितकें अशक्य तितकेंच सरस्वतीचें गुणवर्णन अशक्य आहे. पण माझीं बालकाचीं वचनें तिनें प्रीतीनें हृदयीं धरलीं. माझ्या जिव्हाग्रीं ठाणें मांडलें. चंद्राच्या चढत्या वाढत्या कळा पाहिल्या कीं चकोराला सोहळा होतो. आतां रामकथेलाहि असाच रंग चढेल आणि प्रेमळांना सात्त्विकाचीं दोंदें फुटतील.

वाल्मीकि मुनि हे आदिकवि. श्रीरामाचें लीलाचरित्र प्रथम त्यांनीं गाइलें. एक दिवस ते स्नानासाठीं तमसा नदीच्या तीरावर गेले होते. तिथें एका वृक्षावर पक्ष्यांचें एक जोडपें प्रेमकूजन करीत बसलें होतें. इतक्यांत एक व्याध आला आणि त्यानें त्यांपैकीं एका पाखराला बाण मारला. तें मरून खालीं पडलें. वाल्मीकींना तें करुण दृश्य पाहवलें नाहीं. त्यांनीं त्या व्याधाला शाप दिला कीं, 'तुला चिरकाल प्रतिष्ठा मिळणार नाहीं.' सहजपणें मुखांतून निघालेली ही शापवाणी गद्य नसून श्लोकबद्ध होती. त्याचें त्यांनाच आश्चर्य वाटलें त्याबद्दल. इतक्यांत ब्रह्मदेव त्या ठिकाणीं प्रगट झाले आणि त्यांनीं वाल्मीकींना छंदोबद्ध रामायण रचण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यांनीं रामायण रचून तें लव–कुशांना पढविलें व त्यांच्याच तोंडून रामरायाला ऐकविलें. त्या दिवसापासून रामकथा त्रिलोकीं प्रसिद्ध झाली. असो.

---

१ हंसी.

गुलाबाच्या फुलाभोंवतीं जसे कांटे तसे दुर्जन सज्जनांना वेढतात. किंबहुना दुर्जनांच्या विरोधामुळें किंवा छळवादामुळेंच सज्जनांच्या चारित्र्याला उजळा मिळतो. रामरायालाहि अनेक शत्रु निर्माण झाले. त्याचा सर्वांत अतुर्बळी शत्रु रावण. तो रामाच्या आधीं जन्मला. रामालाच नव्हे, तर त्याच्या बापालाहि त्यानें त्रास दिला. तेव्हां रामकथेआधीं थोडी रावणकथा सांगणें भाग आहे.

ब्रह्मदेवाला पुलस्त्य नांवाचा एक पुत्र झाला. त्याचा मुलगा विश्रवा. तो कुबेराचा पिता. कुबेरानें तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न केलें. त्यानें त्याला लंका नांवाची नगरी आणि पुष्पक विमान दिलें. पुढें सुमाळी दैत्यानें आपली कन्या कैकसी विश्रव्याला दिली. तिला रावण कुंभकर्ण व बिभीषण असे तीन पुत्र व ताटिका आणि शूर्पणखा अशा दोन मुली मिळून पांच अपत्यें झालीं.

तीनहि पुत्रांनीं गोकर्णक्षेत्रीं उग्र तप केलें. ब्रह्मदेव त्यांना प्रसन्न होऊन 'वर मागा' म्हणाला. 'सगळ्या देवांनीं आपल्या आज्ञेंत वर्तावें, संतति, संपत्ति आणि विद्या यांचा लाभ व्हावा' असें रावणानें मागितलें. कुंभकर्णानें 'दीर्घ निद्रा' मागितली. बिभीषणानें कामक्रोध नष्ट व्हावे आणि श्रीहरि-चिंतनांत मन रमावें' असें मागितलें. ब्रह्मदेवानें 'तथास्तु' म्हणून तो निघून गेला. त्याच्या वरानें रावण–कुंभकर्ण मातले.

## २ रावण–कुंभकर्णांचे अत्याचार

"कुंभकर्ण दशग्रीवी कोणासाहि न लेखिती
विश्व पीडियलें पापें भेकं सर्पें जयापरी १६

नाहीं संरक्षिता त्राता विश्वघाता प्रवर्तले
कोणा देतील गार्‍हाणें देव दीनें प्रलापती १७

---

१ बेडूक

देवगंधर्वपश्वादि मनुष्यादि ऋषीश्वरां
मारुनी भक्षिते झाले, भयें भ्याले जगत्रय १८

रावणादि देशे आले, वैर झालें जगत्पती
आयकोनि सुसौख्यासी येती पाशीं निशाचर १९

मातले मत्त मातंग तेविं दोघे दुराग्रही
भंगिती वनउद्यानें, देवस्थानें सहस्रधा २०

अपूर्व तितुकें न्हेती, बळें घेती हिरोनियां
कुबेर दंडिला क्रोधा प्रतिस्पर्धी विभागिया
लंका हिरतलें स्थान देवयान सुपुष्पक" २१

मुक्तेश्वरकृत रामायण

रावण कुबेराला घालवून आपण लकेचा राजा झाला. ऐशीं हजार स्त्रियांशीं त्यानें लग्नें केलीं. लक्षावधि पुत्रपौत्र झाले. नंतर त्यानें देवांवर स्वारी केली. त्याचा थोरला मुलगा मेघनाद त्याच्याबरोबर होता. इंद्राच्या गळ्याभोंवतीं पाश टाकून त्यानें त्याला रावणापुढें आणलें. म्हणून त्याला मग 'इंद्रजित' असें नांव पडलें. रावणानें सगळे देव जिंकून आपल्या सेवेंत राबवले. इंद्रानें हार करावे, चंद्रानें छत्र धरावें, वरुणानें पाणी भरावें, वायूनें झाडलोट करावी, अशीं कामें त्यानें देवांना नेमून दिलीं. दशरथाच्या पुत्रापासून आपल्याला मृत्यु आहे, असें ब्रह्मदेवाकडून समजतांच त्यानें दशरथ-कौसल्येच्या लग्नांत विघ्न आणलें; पण त्यांत त्याला अपेश आलें.

त्यानें आणि त्याच्या अनुचरांनीं पृथ्वीवर उच्छाद मांडला. गोब्राह्मणांचा संहार सुरू केला. ऋषींचीं कुटुंबें मारलीं, झोडपलीं. यज्ञयाग उध्वस्त केलें. हव्यकव्यें बुडवलीं. धर्म नष्ट झाला. अधर्म फैलावला. भूमि गायीचें रूप घेऊन ऋषींसह ब्रह्मदेवाकडे गाऱ्हाणें सांगायला गेली. भयभीत झालेले देवहि गेले. ब्रह्मदेव सर्वांना घेऊन क्षीरसागरीं आला आणि त्यानें शेषशायी नारायणाचें स्तवन मांडलें.

---

१ तारुण्यांत. २ हिरावून घेतलें.

## ४ नारायणाची प्रार्थना

" शेषशयन नारायण कोटिसूर्यांची प्रभा पूर्ण
साठी सहस्र योजन शेषतल्पक शुभ्र तो २२

लक्षार्ध योजनें प्रमाण वरी पहुडला श्रीभगवान
तो सच्चिदानंद रमारमण अलंकारें मंडित २३

जी अनंत शक्तीची स्वामिणी ती कमला विलसत चरणीं
जिच्या इच्छामात्रेंकरूनी ब्रह्मांड हें विस्तारलें २४

एक लक्ष योजनें दैदीप्य विराजमान मध्यमंडप
तोथिंचें तेज पाहतां अमूप मार्तंड शशी लोपती २५

गरुडपाचूचें जोतें स्वयंभ वरी हिऱ्याचे विशाळ स्तंभ
माणिकांचीं उथाळीं सुप्रभ खालीं तोळंबे[2] हिरियांचे २६

सुवर्णाचीं तुळवटें प्रचंडें आरक्त रत्नांचे पसरिले दांडे
वरी किलचा झळकती निवाडें गरुडपाचूचिया सांजिऱ्या २७

असो; ऐलतीरीं देव सकळी उभे ठाकले बद्धांजळी
म्हणती 'पूर्णब्रह्म वनमाळी भक्तपाळका सर्वेशा २८

जयजय अनंतब्रह्मांडनायका वेदवंद्या वेदपाळका
विश्वंभरा विश्वव्यापका विश्वरक्षका जगद्गुरु २९

पुराणपुरुषा परात्परा पंकलोचना पयोब्धिविहारा
परमात्मया परम उदारा भुवनसुंदरा भवहृदया ! ३०

आतां रावण कुंभकर्ण असुर इहीं त्रिभुवन पीडिलें समग्र
भक्तकैवारी तूं सर्वेश्वर रक्षीं सत्वर दासांतें " ३१

- श्रीधरकृत रामविजय

---

१ शेषरूपी शय्या. २ खांब

ही प्रार्थना होतांच क्षीरसागरांतून ध्वनि उठला. 'देवहो, धीर धरा. मी लवकरच अवतार घेऊन येतों.' हें ऐकतांच देवांनीं जयजयकार केला आणि ते स्वस्थानीं परत गेले.

दशरथानें गृहस्थाश्रम स्वीकारून बरींच वर्षें लोटलीं तरी त्याच्या एकाहि राणीला पुत्रसंतान होईना. त्यामुळें राजा दिवसेंदिवस कष्टी होऊं-लागला. प्राणावांचून शरीर, दयेवांचून ज्ञान, दिव्यावांचून मंदिर तसें पुत्रां-वांचून राजभवन त्याला अमंगल आणि ओकें वाटूं लागलें. राजकाजावरचें त्याचें लक्ष उडालें. तो शिकारीच्या मिषानें रानावनांत काल कंठूं लागला.

एक दिवस रात्रीच्या वेळीं नदीतीरावर शिकार साधायला बसला असतां, नदीवर झारी भरून घेणाऱ्या श्रावण नांवाच्या वैश्यपुत्राला त्याचा बाण लागला. तो घायाळ होऊन पडला. राजाला वाईट वाटलें. श्रावणानें आपल्या तहानेल्या मातापितरांना पाणी पाजण्याबद्दल राजाला विनवून प्राण सोडला. राजा पाणी घेऊन म्हाताऱ्यांकडे आला व त्यानें झालेली सर्व हकीगत सांगि-तली. म्हातारीनें एकदम हंबरडाच फोडला. श्रावणाचे गुण आठवून त्यांनीं पुष्कळ विलाप केला आणि शेवटीं दशरथाला शाप दिला कीं, "तूंहि आमच्या सारखाच 'पुत्र पुत्र' म्हणत मरशील!" शोकाचा आवेग असह्य होऊन त्यांचे प्राण निघून गेले. राजा त्यांचें और्ध्वदेहिक करून अयोध्येस परतला.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं स्वर्गांत देवदानवांचें युद्ध सुरू झालें. कांहीं केल्या दैत्य देवांना आटपेनात. तेव्हां इंद्रानें आपल्या बाजूनें लढण्यासाठीं दश-रथाला पाचारण केलें. दशरथ निघाला तेव्हां त्याची लाडकी भार्या कैकेयीहि त्याच्याबरोबर रणभूमीवर गेली. वृषपर्वा आणि दशरथ यांची चांगलीच जुंपली त्यानें संधि साधून दशरथाच्या रथाचा कणाच मोडून टाकला. राजा खालीं कोसळणार होता, पण कैकेयीनें प्रसंगावधान राखून खालीं उडी टाकली आणि चक्राच्या मधल्या छिद्रांतून हात घालून तो कणा सांवरून धरला. युद्ध संपल्यावर ही गोष्ट राजाच्या लक्षांत आली. त्यानें तिच्या धैर्याची प्रशंसा करून तिला 'दोन वर माग' असें म्हटलें. त्यावर 'वेळ येईल तेव्हां मागेन' असें कैकेयीनें सांगितलें.

त्यानंतर ऋष्यशृंगाला आणवून दशरथानें पुत्रेष्टि केली. पूर्णाहुतीच्या वेळीं हातांत पायसाचें पात्र घेऊन साक्षात् अग्निनारायण यज्ञकुंडांतून प्रगटला.

वसिष्ठानें त्या पायसाचे तीन भाग करून कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी या तिघी राण्यांना दिले. आपला भाग लहान म्हणून कैकेयी रुसून बसली. इतक्यांत एका घारीनें झडप घालून तिचा भाग पळवला. कैकेयी रडूं लागली तेव्हां कौसल्या व सुमित्रा या दोघींनीं आपल्यांतला अर्धा अर्धा वाटा तिला दिला. तिघींनींहि पायसभक्षण केल्यावर ऋषींनीं इष्टि समाप्त केली.

घारीनें पळवलेला तो भाग वायूनें हिसकला आणि पुत्रप्राप्तीसाठीं ऋष्यमूक पर्वतावर तप करीत बसलेल्या अंजनीच्या ओंजळींत टाकला. त्याच्या सेवनानें ती गर्भवती झाली आणि नवमास पूर्ण होतांच शुभदिनीं प्रातःकाळीं पुत्ररत्न प्रसवली. मारुति तो हाच. जन्मतांच त्यानें उगवत्या सूर्यमंडळाला ग्रासण्यासाठीं गगनोड्डाण केलें.

## ५ मारुतीचें सूर्यमंडळाकडे उड्डाण

विद्युत्प्राय कुंडलें झळकती गंडस्थळीं पडली दीप्ती
दृढ कौपीन निश्चितीं कटिप्रदेशीं मौंजी झळके ३२

तळपतसे यज्ञोपवीत ऐसें वानररूप अद्भुत
मुखीं पुच्छाग्रीं आरक्त वर्ण दिसत प्रवाळसम ३३

क्षुधाक्रांत परम बाळ चहूंकडे पाहे चंचळ
तों अंजनी उतावेळ फळें गेली आणावया ३४

रुदन करी क्षुधित बाळ तों आरक्त दिसे सूर्यमंडळ
म्हणे हें दिसे उत्तम फळ उडे चपळ मारुती ३५

पिंजरल्या रोमावळी सिंहनादें गर्जे निराळीं
दिग्गजांची बैसली टाळीं आंदोळली वसुंधरा ३६

स्फुरण दाटलें थोर गाजवी पुच्छाचा फडत्कार
मागें अंगवातें तरुवर उन्मळोनि जाती आकाशीं ३७

---

१ केस. २ आकाशांत.

चपळ पदद्वय तसेचि हस्त प्रतापें झेंपावे गगनांत
उड्डाणावर उड्डाण घेत जात आदित्य लक्षोनीं ३८
कीं उर्वीवरोनि सुपर्ण जाय वैकुंठपीठ लक्षून
तैसाचि अंजनीहृदयरत्न भानुमंडळा आटोपी ३९
मनोवेगासी मागें टाकुनी हनुमंत वेगें जात गगनीं
तों लोकप्राणेश धांवुनी धरीन म्हणे स्वपुत्रा ४०
परम तीव्र सूर्यमंडळ तेजें आहोळेल माझें बाळ
म्हणून धरूं पाहे अनिळे परि तो चपळ नाटोपे ४१
मग हिमाचळाचे शीतलांबुकण मागूनि शिंपी प्रभंजन
हनुमंत मुख पसरोन सूर्याजवळी पातला " ४२

-श्रीधरकृत रामविजय

मारुति ग्रासायला आलेला पाहून सूर्य त्याला. मारुतीनें त्याला हातांत धरलें आणि हें फळ नव्हे, अशी खात्री करून सोडून दिलें. इतक्यांत त्याच्या साह्याला इंद्र धाऊन आला. दोघांचें तुंबळ युद्ध झालें. इंद्रानें हनुवटीवर वज्र-प्रहार करतांच मारुति मेरूपर्वतावरून खालीं दरींत कोसळला मग आपल्या पुत्राच्या साह्याला वायु धावून आला. त्याला वाटलें कीं, आतां आपला पुत्र मरतो. त्या रागानें त्यानें त्रिभुवनाचा श्वासोच्छ्वास कोंडून त्याला कासावीस केलें. तेव्हां सर्व देव त्याला शरण आले. ब्रह्मदेवानें त्याला अश्वासन दिलें कीं, तुझा पुत्र चिरंजीव आहे. त्याला कधींहि मरण येणार नाहीं. एवढयांत मारुति उठून बसला. हनुवटीवर वज्राचा तडाखा बसून ती चेपटली म्हणून त्याला हनुमंत असें नांव पडलें. त्याला अनेक वर देऊन देव स्वस्थानाला गेले.

इकडे अयोध्येंत दशरथाच्या तिन्ही राण्या गर्भवती झाल्या. कौसल्याराणीला डोहाळे विचारण्याठीं एक दिवस दशरथ तिच्या मंदिरांत आला, पण ती त्याला कुठें दिसेना. वैखरीच्या ओसरीवर नाहीं, मध्यमेच्या माजघरांत नाहीं,

१ पृथ्वीवरून. २ गरुड. ३ वायु. ४ जळेल. ५ वायु. ६ तुषार.

पश्यंतीच्या अंतर्गृहांत नाहीं, कीं, परेच्या पर्यंकावरहि नाहीं. त्यानें मग द्वैताची अर्गळा मोडली. शब्दाची शृंखला तोडली. अद्वैताची 'सुमनशाळा' उघडली, तेव्हां मग निर्विकल्पाचें निजसुख भोगणारी कौसल्या त्याला दिसली. योग्याला उन्मनी लागावी तशी ती सहज सिंहासनावर बसली होती. तिला पाहून राजाचे डोळे निवले.

राजानें जवळ बसून तिला डोहाळे विचारले, पण ती कांहीं बोलेना. ती आपल्याशींच हसत होती. आत्मसुखांतच धुंद होती. तो तिच्याशीं नानाप्रकारच्या गोष्टी बोलूं लागला. बोलतां बोलतां लग्नांत विघ्न करणाऱ्या रावणाचें नांव त्याच्या तोंडून निघालें. त्यासरशीं ती खवळून उठली.

"रावण ! कुठें आहे रावण ? आणा माझे धनुष्यबाण. मी त्या दुष्टाचा संहार करीन ! देव बंदींतून सोडवीन. धर्माचें राज्य स्थापीन. अधर्माचा उच्छेद करीन—"

तिचे हे अघटित बोल ऐकून राजा भ्याला. त्याला वाटलें कीं, हिला भुतानें झपाटलें असावें. त्यानें ताबडतोब वसिष्ठांना बोलावणें पाठवलें. वसिष्ठ आले. त्यांनीं पाहिलें तों कौसल्या राममय झाली आहे. ते राजाला म्हणाले—

"खरंच हिला भूत बाधलं आहे. साधंसुधं नव्हे, सर्व भूतांना पोटी सांठवणारं महद्भूत ! हिच्या उदरी परमात्मा आला आहे. पुढें घडणाऱ्या गोष्टींची तो हिच्या मुखांतून सूचना देत आहे. तूं निश्चिंत राहा. तुझं भाग्य थोर आहे."

कौसल्येला नवमास पूर्ण झाले. चैत्रमास प्राप्त झाला. नवमी तिथि उगवली. सूर्य मध्यान्हीं तळपूं लागला. अशा वेळीं पुष्य नक्षत्रीं, पांच ग्रह उच्च स्थानीं असतांना पूर्णब्रह्म परमात्मा रामरूपानें अवतरला. आठ वर्षांची प्रभुमूर्ति एकाएकीं कौसल्येच्या पुढें उभी राहिली. तिचे डोळे दिपले. तो साक्षात् परमात्मा आहे असें जाणून तिनें हात जोडले, आणि त्याचें स्तवन आरंभिलें.

## ६ कौसल्येची परमात्मस्तुति

"वेदविदीं तुज जाणितलें, परिपूर्ण चिदात्मक सत्य सुखात्मा
निर्मिसि, पाळिसि, अंत निरंतर तूं करिसी, परमेश परात्मा

मायिक हे गुणभाव, अमायिक तूं तुज मोहित कीं जगदात्मा
तूं तरि रज्जुभुजंग तसा नसतां दिसणें, म्हणणें अखिलात्मा ४३

पाहसि तूं परि पाहसिना, मग ऐकुनि नायकसी, न चलोनी
चालसि तूं, वचनावलि बोलुनि बोलसिना, न करीसि करोनी.
बैससि, ऊठसि, बैसत नूठत धांवसि तूं नवजोनि पदांनीं
सर्वहि हें गुणचेष्टितें निर्गुणिं मानिजतें तुजला न कळोनी ४४

संसृतिसागर फाराचि दुस्तर यांत पडोनि सुसंभ्रमचित्तें
पुत्र, पति, प्रिय बांधव हे मति लाहुनि गुंतुनि चंचळ वित्तें
निश्चळ बुद्धि शरीर विनाशक तें अविनाश गणोनि अनर्थें
बूडतसों परपारनिदर्शक सद्‌गुरु नाविक तूंचि अशांतें ४५

त्वच्चरणांबुरुहा शरणागत निश्चित मी तरि जाण अनंता
शक्ति तुझी भ्रमवील मला न कधींच असें करिं वा! प्रभु आतां
आंवरि हें अतिरूप महाद्‌भुत लौकिक बाळक हो मम ताता
पाहुनि, घेउनि, सेवुनि, लालुनि, पावन, संसृतिबंधनिवृता" ४६

—निरंजनमाधवकृत चिद्‌बोध रामायण

काय त्या परमात्मरूपाचें सौंदर्य वर्णावें! त्याचे चरणतळवे संध्यारागासारखे आरक्त होते. चंद्रकोरीसारखीं नखें होतीं. पायांवर ध्वज, वज्र, अंकुश हीं चिन्हें होतीं. गरुडपाचूचे कोंभ निघावे तशा मांड्या होत्या. कासे पीतांबर आणि त्यावर मेखळा शोभत होती. हृदयावर कौस्तुभ झळकत होता. निळ्या गगनावर मंदाकिनीचा शुभ्र ओघ, तसा सांवळ्या तनूवर अम्लान पुष्पहार रुळत होता. सूर्यप्रभेचीं चक्रें तशा मुद्रिका बोटांत चमचम करीत होत्या. कोटिमदन ओंवाळून टाकावे असें सस्मित वदन होतें. स्वानंदसरोवरींचीं कमळदळें तसे आकर्ण नेत्र विराजत होते. अंगींचा सुवास ब्रह्मांड भेदून बाहेर धावत होता.

---

१ न जातां. २ गुणांचा व्यापार.

अशा प्रकारचें तें रूप पाहून कौसल्येला परमानंद झाला. तिचे अष्ट सात्त्विक भाव उचंबळले. हृदयीं प्रेमा दाटला. स्वानंदाच्या उर्मि पोटीं जिरवून ती परमात्म्याला म्हणाली, " देवा ! आतां हें रूप आवर. बाळरूप घे. गोंडस तान्हुलं होऊन माझ्या मांडीवर ये ! "

## ७ रामजन्मोत्सव

" पुत्रउत्सव जयास विराजे उत्तमासनिंच बैसवि राजे
सूर्य ये परम उच्च पदातें सेविती ग्रह समस्त पदातें ४७
प्रगटला प्रभु ज्या विमलक्षणीं ऋषिवरां सुख दे शुभलक्षणीं
म्हणाति मारुनियां पुरुषाद[1] हा करिल शुभ यशें स्वदिशा दहा ४८
दशरथ स्वसुतानन पाहतो निजसुखें सुखि होउनि राहतो
जगपटीं सुखतंतु विराजतो प्रगटला नयनीं रघुराज तो ४९
रवीच्या करें श्यामता ये घनासी तयाचाच संताप तो मेघ नाशी
तया सूर्यवंशीं घनश्याम राम करी काळ वैवस्वताचा विराम[2] ५०
जसें चातकाला घनाचेंच पाणी स्वभक्तां तसा राम कोदंडपाणी
म्हणूनी घनश्याम हा राम झाला जया कारणें जन्म घेणें अजाला ५१
बुंग बुंग रव तुंग[3] मृदंगीं संग संग नटती स्वहृदंगीं
अंगभंग बहु दाविति रंगी रामरंगसुख सिंधुतरंगीं ५२
दुम दुम ध्वनि वाजति दुंदुभी सहित रावण राक्षसवृंद भी
सुख नरां सकळां अमरां महा प्रगटतांचि रघूत्तम राम हा " ५३

—वामनपंडितकृत

रामजन्म होतांच राजवाड्यांत मंगलवाद्यें वाजूं लागलीं. अयोध्येंत घरोघरीं ब्रह्मानंद पसरला. हळदीकुंकू तबकांत भरून सुवासिनी कौसल्येच्या महालांत

१ राक्षस. २ नाश. ३ उंच.

आल्या. बाहेर ब्राह्मणांची दाटी झाली. राजानें पुण्याहवाचन करून पुत्रमुख पाहिलें. रामाच्या मुखांत मधाचा थेंब घातला. ब्राह्मणांना दानें दिलीं. मोठा उत्सवसमारंभ केला. त्यानंतर सुमित्रेला लक्ष्मण आणि शत्रुघ्न असे दोन पुत्र झाले, कैकेयीला भरत झाला. चारहि पुत्र राजवाड्यांत वाढूं लागले. त्यांच्या बालक्रीडेला राजवाडा अपुरा पडूं लागला. त्यांचें बंधुप्रेम लोकोत्तर होतें. तिघेहि रामाच्या तंत्रानें चालत. त्याच्या आज्ञेंत वागत. मुंजीचे होतांच दशरथानें त्यांचें उपनयन केलें. वसिष्ठांच्या जवळ ते वेदशास्त्रें आणि धनुर्वेद शिकले. त्यानंतर चौघांनींहि मिळून भरतखंडांतल्या तीर्थयात्रा केल्या. वयाला पंधरा वर्षे पूर्ण होण्याच्या आंतच या सर्व गोष्टी पुऱ्या झाल्या.

एक दिवस विश्वामित्र ऋषि अयोध्येस आला. दशरथानें त्याचें स्वागत केलें. 'काय हवें तें मागा,' असें राजानें सांगतांच विश्वामित्र म्हणाला—

"राजा, राक्षस माझ्या यज्ञाचा विध्वंस करतात. त्याचें रक्षण व्हावें म्हणून मी रामाला नेण्यासाठीं आलों आहे. तूं रामाला मजबरोबर पाठव."

विश्वामित्राचें हें वचन ऐकून दशरथ दुःखांत बुडाला. अंगावर पर्वत कोसळावा, तप्त शस्त्र हृदयांत घुसावें तसें त्याला झालें. तो विश्वामित्राला काकुळतीनें बोलला—

"मुनिराज, माझा राम अजून कोवळा आहे. राक्षसांबरोबर लढायला मी त्याला कसा बरं पाठवूं? त्याच्या ऐवजीं मी येतों तुमच्याबरोबर. मी राक्षसांना मारून तुमच्या यज्ञाचं रक्षण करतों. मला घेऊन चला; पण माझ्या बाळाला मागूं नका. मी तुमच्या पायां पडतों."

दशरथाच्या बोलण्यानें विश्वामित्र रागावला. 'आधी देतों म्हटलंस अन् आतां नाहीं म्हणतोस. तूं असत्यप्रतिज्ञ आहेस. रघुवंशाच्या धवल कीर्तीला कलंक लावलास तूं.' असा त्यानें दशरथाला दोष दिला. 'इकडे आड आणि तिकडे विहीर' असें दशरथाला झालें. शेवटीं त्यानें वसिष्ठांचें मत विचारलें. 'तूं रामाला अवश्य पाठव; त्यांत त्याचें कल्याण आहे.' असें वसिष्ठांनीं सांगितलें. मनाचा धडा करून त्यानें होकार दिला. भरल्या डोळ्यांनीं त्याची पाठवणी केली.

राम–लक्ष्मण दोघेहि विश्वामित्राबरोबर निघाले. बला आणि अतिबला अशा दोन विद्या त्यानें राम--लक्ष्मणांना शिकविल्या. त्यामुळें त्यांना वाटचालीचे श्रम झाले नाहींत. वाटेंत त्यांना ताटकेचें अरण्य लागलें. माणसांचा वास लागतांच ती राक्षसी रान दणाणीत धांवत येऊं लागली.

## ८ ताटकावध

"एवं राम, मुनींद्र, लक्ष्मण तिघे गांभीर्य लीलागती
जातां, कौतुक एक अद्भुत दिसे; पक्षी नभीं लागती
स्वैर श्वापतसंघ धांवति भयें दंती[1] दिगंतांप्रती
जाती लंघिति काननीं, कवण हा कोल्हाळ जी संप्रती? ५४
वारा कां सुटला? निनाद फुटला? कां देश बोभाटला?
मेघांच्या पटलापरी उमटला पांशू[2] नभीं दाटला
बोले राम मुनीसि पाय नमुनी, 'आज्ञा करा नेमुनी
काळातें दमुनी, न सोडिन शरा क्षेमस्थिती कां मुनी? ५५
ऐशी व्याकुळ वाट कां? मुनिवरा! हे धांवती थाट[3] कां?
मोठा घोर अचाट काननतटीं वंश क्षिती दाट कां?'
"रक्षोरूप जुनाट कामिनि फिरे, साधूजनीं कंटका;
ऐकें चिन्मयनाटका रघुपती! आली दिसे ताटका" ५६
वार्ता ऐकति राम-लक्ष्मण अशी, तों धांवली कर्कशी
घोराकार करालदंष्ट्रवदना तद्दृष्टि बालार्कशी
हाडांच्या अळुमाळ डोलति गळां माळा कटीं कांबळा
जिव्हा लोळतसे मुखीं ळळळा, येते धरोनी वळा ५७

---

१ हत्ती. २ धुरळा. ३ समाज. ४ विस्तृत.

दंतीं चावित सिंह कुंजर मृगें हातीं कितेकां धरी
पातीं झांकुनी ऊघडी घडिघडी माती कचाग्रांवरी[1]
कोरा काटलिया मुखीं कटकटा, ढोरांचिया शोणितें
घोरा वंश शरीर एक नटली, थोरा भया आणिते. ५८

बाळें देखुनि रामलक्ष्मण, पुढें चाटी अंबाळेपरी[2]
हुंकारी, क्षण हा करीत, तंव ते वाढे, उडे अंबरीं
अट्टा हासुनि मट्ट मट्ट करिते, श्रीरामसंघट्टणीं
धांवे, तों क्षितिकंप हा रव उठे देवांचिया पट्टणीं[3] ५९

येतां सन्मुख राक्षसी लचुलचू, क्ष्मापालवंशाग्रणी
क्रोधें दुर्धर रामवीर उठला, शिक्षावर्या तत्क्षणीं
तूणीं बाण गुणीं धरोनि सहसा कर्णांत ओणी रणीं
हाणी तीं धरणीवरी उलथली, उत्साह धाता गणी ६०

लागतां हृदयिं बाण खणाणा
ताटका उलथलीच दणाणा
त्या ध्वनीस्तव रविंदु गळाले
यक्षराक्षस पिशाच पळाले.' ६१

—आनंदतनयकृत ताटकावध

रामाच्या हातून ताटकेचा वध होतांच विश्वामित्राला ब्रह्मानंद झाला. त्यानें रामाला हृदयाशीं धरलें. तो संतोषून म्हणाला, 'रामा, धनुर्विद्या म्हणून म्हणतात ती मीं आज पाहिली.' तो मग दोघानांहि घेऊन स्वतःच्या आश्रमांत आला. तपोवनांतले सर्व ऋषि रामाला पाहायला गोळा झाले. त्यानें त्यांना वंदन केलें.

शुभ दिवस पाहून विश्वामित्रानें यज्ञदीक्षा घेतली. नित्य होमहवन चालू झालें. राम-लक्ष्मण सज्ज होऊन यज्ञमंडपाभोंवतीं पहारा करूं लागले.

---

१ केसांच्या अग्रांवर. २ ओठ. ३ नगरांत.

एक दिवस सूर्यास्ताच्या वेळीं राक्षसांनीं हांक फोडली. पर्वत आणि शिळा मंडपावर येऊन पडूं लागल्या. रक्त--मांसाचा वर्षाव सुरू झाला. ब्राह्मण घावरले. त्यांच्या हातांतलीं अवदानें गळून पडलीं. त्यांनीं आपल्या रक्षणा-विषयीं रामाची प्रार्थना केली.

आलेल्या राक्षसांत सुबाहु आणि मारीच हे प्रमुख होते. रामानें एकवार त्यांच्याकडे पाहिलें. त्याच्या धनुष्यापासून झरझरां बाण सुटूं लागले. राक्ष-सांचीं मस्तकें अंतराळांत उडूं लागलीं. एका घटकेंत सगळे राक्षस खलास झाले. त्यांचा एक म्होरक्या सुबाहु मरून पडला आणि दुसरा मारीच लंकेंत पळून गेला.

ऋषि निर्भय झाले. यज्ञ यथासांग पार पडला. येवढ्यांत मिथिलेच्या जनकराजाकडून विश्वामित्राला बोलावणें आलें. दुसऱ्या दिवशीं तो राम-लक्ष्मणांना घेऊन मिथिलेकडे निघाला. वाटेंत त्यांना गौतमाचा आश्रम लागला तिथे गौतमाची भार्या अहल्या त्याच्याच शापानें शिळा होऊन पडली होती. राम जवळ येतांच त्याच्या पायांची धूळ वाऱ्यानें उडून तिच्या-वर पडली. त्यासरशीं मोठाच चमत्कार झाला. ती शिळा थरथर हालूं लागली. थोड्याच वेळांत शिळेच्या जागीं एक दिव्य स्त्री उभी राहिली. पोवळ्या-सारखे तिचे ओठ चांफ्याच्या फुलासारखा वर्ण. रेशमासारखे लांबसडक केस. रंभा, उर्वशी तिच्या पुढे तुच्छ वाटाव्या. पाहाते तों समोर रामचंद्र उभा !

## ९ अहल्येचा उद्धार

“ मस्तकींचा मोकळा कबरीभार सांवरोनि वीरगुंठी बांधी सत्वर
नेत्रीं न्यहाळीत रघुवीर विधिसुता समोर पातली ६२

जो दशरथाचा महत्पुण्यमेरु जो का लावण्यामृतसागरु
जो जगद्वंद्य जगद्गुरु तो अहल्येनें देखिला ६३

अष्टभावें दाटोन ब्रह्मकन्या साष्टांग नमी राजीवनयना
तों श्रीराम बोले सुवचना माते ऊठ झडकरी ६४

ऐसें ऐकतां ते वेळीं कमलोद्भवकन्या ऊठली
जैशी कोकिला गर्जे वसंतकालीं तैशी स्तवन करीतसे ६५
म्हणे जयजय रामा करुणासमुद्रा दाशरथि प्रतापरुद्रा
हे जगद्गुरु श्रीरामचंद्रा मज चकोरालागीं उदय तुझा ६६
श्रीरामा तूं भवरोग वैद्य सुजाण मात्रा देऊनि निजचरणरेण
दोष क्षयरोग दवडून अक्षय्य केलें मजलागीं ६७
साठ सहस्र वर्षेंपर्यंत अहंदेहभूतें झडपिलें यथाथ
तूं पंचाक्षरी येतां रघुनाथ भूतें समस्त पळालीं ६८
साठ सहस्र वर्षेंवरी जळतां चिंतेच्या वणव्याभीतरीं
तूं मेघ वर्षतां झडकरी आजि पूर्ण निवाल्यें ६९
माझ्या कुरळ केशेंकरून राघवा झाडीन तुझे चरण
तुजवरून ओंवाळून काया टाकीन माझी हे" ७०

–श्रीधरकृत रामविजय

आपल्या पत्नीचा उद्धार झालेला जाणून गौतम ऋषि तिथें आला. दोघांनीं मिळून आपल्या आश्रमांत रामरायाची पूजा केली. रामानें एका शिळेची सुंदर स्त्री बनवली हें वर्तमान आसपासच्या ब्राह्मणांना कळलें. त्यांना वाटलें कीं आतां चैन झाली. आपणहि एक शिळा रामाकडे नेऊन तिची फक्कड बायको बनवून घेऊं. म्हणून डोक्यावर उचलवेल तेवढा एकेक दगड घेऊन ते रामापाशीं आले आणि आपल्या बायकांच्या तक्रारी सांगून नवी सुंदर भार्या मिळवून देण्याबद्दल त्याची प्रार्थना करूं लागले.

## १० ब्राह्मणांचा विनोद

अदृष्टयोगें रघुराज आला
आतां स्त्रियांलागिं सुकाळ झाला

चोंळा शिळा सर्वहि पर्वतींच्या
होतील रूपें सम सर्व तीच्या [1] ७१

माझे घरीं बाइल पाहिली ते
तें पायली अन्न उन्याच खाते
निर्लज्ज मोठी गळताति कक्षा [3]
मला असे सुंदरिची अपेक्षा ७२

एकाक्ष कार्यास अदक्षता ही
नाकास पाहों तरि ठाव नाहीं
प्रत्युत्तरें दे वचना न साहे
या कारणें अन्य वधूस पाहें ७३

अदंत माझे घरिंचीच पाहे
नांवें मृगाक्षी परि अंध आहे
हातीं खुळी लंगित फार चाले
ऐसे वधूनें मज काय चाले? ७४

माझे घरीं बाइल फार काळी
उठोनि खाते तरि ते सकाळीं
घरीं तुपाची तरि वाण नाहीं
याकारणें सुंदर नार पाहीं ७५

सुलोचना नामक नक्र डाळे
देखोनियां अंतर फार पोळे
अंती महावोस तयेस वक्षीं
करीन मी आणिक पंकजाक्षी ७६

—नागेशकृत अहल्योद्धार

---

१ घुंडाळा. २ अहल्येच्या. ३ कांखा. ४ थोटी. ५ लंगडत

गौतमाच्या आश्रमांतून ही मंडळी पुढें निघाली ती मिथिला नगरीच्या बाहेर असलेल्या उपवनांत येऊन राहिली. तिथें त्यांना वर्तमान समजलें कीं, जनकानें सीतेचें स्वयंवर मांडलें आहे. शिवधनुष्य उचलून त्याला जो दोरी चढवील त्याला सीता माळ घालणार आहे. रामाला जिज्ञासा उत्पन्न होऊन त्यानें सीतेचा जन्म आणि शंकराचें धनुष्य यांची माहिती विश्वामित्राला विचारली. विश्वामित्र सांगूं लागला:—

" पूर्वी पद्माक्ष नांवाचा एक राजा होता. त्यानें लक्ष्मीला प्रसन्न करून घेऊन 'तूं माझी कन्या हो ' असा वर मागितला. यांत तुझें कल्याण नाहीं असें लक्ष्मी सांगत असतांहि त्यानें आपला हट्ट सोडला नाहीं. श्रीविष्णूनें मग त्याला एक महाळुंग दिलें. तें घरीं नऊ महिने ठेवल्यावर त्यांतून एक सुंदर मुलगी जन्माला आली. ती उपवर झाल्यावर राजे लोक तिला मागणी घालण्यासाठीं येऊं लागले. राजा त्यांना म्हणाला कीं, ज्याचा रंग आकाशासारखा निळा असेल त्याला मी ही कन्या देईन. हें ऐकून राजे खवळले आणि त्यांनीं पद्माक्षाला युद्धांत मारलें. त्या वेळीं ती कन्या यज्ञकुंडांत गुप्त झाली आणि ब्रह्मारण्यांत बाहेर निघाली. त्याच वेळीं रावण विमानांतून जात असतांना त्यानें तिला पाहिली. तिच्या रूपानें मोहित होऊन तो तिला धरावयाला निघाला. तेव्हां ती पुनश्च तिथल्या अग्निकुंडांत दडली. रावणानें तें कुंड विझवून तिथें खणलें, तों त्याला पांच रत्नें गवसलीं. तीं एका पेटींत घालून त्यानें आपली भार्या मंदोदरी हिला आणून दिलीं. दोघांनीं मिळून पेटी उघडली तेव्हां रत्नांच्या ऐवजीं सहा महिन्यांची एक मुलगी त्या पेटींत दिसली. मंदोदरीनें तिला ओळखलें व रावणास सांगितलें कीं, 'आत्तांच्या आतां हिला लंकेबाहेर नेऊन टाका. ही इथें राहिली तर लंकेवर विघ्न आणील '

रावणानें ती पेटी आपल्या नोकरांकरवीं मिथिलेजवळच्या शेतांत पुरून टाकली पुढें जनकराजानें तें शेत एका ब्राह्मणाला दान दिलें. तो एके दिवशीं तें नांगरीत असतां ती पेटी वर आली. उघडून पाहतो तों एक पांच वर्षांची नयनमनोहर बालिका. त्यानें तिला आणून जनकाच्या स्वाधीन केलें. जनकानें तिला आपली कन्या म्हणून वाढविली "

विश्वामित्र म्हणाला कीं, ' आतां धनुष्याचा वृत्तांत सांगतों. परशुरामानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली. शंकराचें धनुष्य त्याच्यापाशीं होतें. तें घेऊन तो एक दिवस जनकाकडे आला. जनकानें त्याची पूजा केली व आंत नेऊन भोजनास बसविलें. इकडे बाहेर सीता त्या धनुष्याचा घोडा करून खेळूं लागली. परशुराम बाहेर आल्यावर, एवढ्याशा मुलीनें, तें धनुष्य उचललेलें पाहून त्याला अचंबा वाटला. तो जनकाला म्हणाला कीं, ' माझं अवतारकार्य सपलं हें धनुष्य मी तुझ्याकडेच ठेवतों. जो कोणी याला दोरी चढवील त्याला तूं ही मुलगी दे. हाच तिच्या लग्नाचा पण ठरव.' एवढें बोलून परशुराम निघून गेला. ''

विश्वामित्राच्या तोंडून ही हकीगत ऐकतांच रामाला तें धनुष्य कसें आहे तें पाहण्याची उत्कट इच्छा झाली. विश्वामित्रानें सांगितलें कीं, ' आपण सीतेच्या स्वयंवरालाच जाऊ म्हणजे दिसेल. '

स्वयंवराचा दिवस उजाडला. देशोदेशींचे राजे-महाराजे जमा झाले. विश्वामित्रासह राम-लक्ष्मणहि आले. जनकानें त्यांचें स्वागत केलें. रामाला पाहून जनकाला आनद वाटला. ' हा जर आपला जांवई झाला तर किती छान होईल, ' असें तो मनांत म्हणाला. पण ' या नाजूक मुलाला हें धनुष्य उचलणें शक्य नाहीं ' या विचारानें तो निराश झाला.

स्वयंवरमंडपांत सीता आपल्या सख्यांसह बसली होती. तिच्या हातांत वरमाला होती. तिचें लावण्य सर्वांचे डोळे आकृष्ट करीत होतें. सीता म्हणजे सौंदर्याची मूस होती.

## ११ सीतावर्णन

" जे त्रिभुवनपतीची मुख्य राणी आदिमाया प्रणवरूपिणी
इच्छामात्रेंकरूनी ब्रह्मांड हें घडी मोडी ७७
ब्रह्मादिक बाळें आज्ञेंत आपले निजगर्भी पाळित
तिचें स्वरूपलावण्य अद्भुत कवणालागीं न वर्णवे ७८

अनंतशक्ति कर जोडून जिच्यापुढें ठाकती येऊन
जिणें आदिपुरुषासि जागा करून सगुणत्वासीं आणिला ७९

या ब्रह्मांडमंडपामाझारीं जनकात्मजेऐशी सुंदरी
उपमा द्यावया दुसरी कोणे अवतारीं नसेची ८०

जैसें जांबूनद सुवर्ण तप्त तैसें सर्वांग दिव्य विराजत
आकर्ण नेत्र विकासित मुखमृगांक[1] न वर्णवेची ८१

मुखीं झळकती दंतपंक्ति बोलतां जिकडे पड दीप्ति
पाषाण ते पद्मराग होती वाटे रत्नें विखुरलीं बोलतां ८२

पाय ठेवितां धरणी पदमुद्रा उमटती जे स्थानीं
तेथें वसंत आपण येउनी लोळत भुलोनी सुवासा ८३

चंद्र—सूर्यांच्या गाळिल्या ज्योती तैशीं कर्णपुष्पें अत्यंत झळकती
कर्णीं मुक्तघोस[2] ढाळ देती कृत्तिकापुंज जैसे कां ८४

आकर्णपर्यंत विशाल नयन माजीं विलासे सोगियाचें अंजन
कपाळीं मृगमद[3] रेखिला पूर्ण वरी बिजवरा झळकतसे ८५

विद्युत्प्राय दिव्यांबर मुक्तालग[4] चोळी शोभे विचित्र
वरी एकावळी मुक्ताहार पदकीं अपार तेज फांके" ८६

—श्रीधरकृत रामविजय

सीतेची दृष्टि रामाकडे गेली. त्याचें सुंदर रूपडें पाहून तिची त्याच्यावर प्रीति जडली. ती आपल्या सखीला म्हणाली, 'हा जर पति मला मिळेल, तर मी धन्य होईन.''

एवढ्यांत जनकानें तें प्रचंड धनुष्य सभेत आणवलें. त्याला पाहून बहुतेकांना चळकांप सुटला. कित्येकांचा बलदर्प गळला. सीतेच्या प्राप्तीबद्दल ते निराश झाले. जनकानें सभेंत उभें राहून स्वयंवराचा पण जाहीर केला:—

१ मुखचंद्र. २ मोत्यांचे घोस. ३ कस्तुरी. ४ मोत्यें लावलेली.

"जो कोणी हें धनुष्य उचलून त्याला दोरी चढवील त्याच्या गळयांत माझी गुणानिधान सीता माळ घालील."

सर्वांनीं पण ऐकला ! पण कोणीहि उठेना. सगळे जागच्या जागी स्तब्ध. इतक्यांत तिथें रावणाची स्वारी आली. सभा गजबजली लोकांना वाटलें कीं हा आतां सितेला उचलून नेणार. रावण जनकाला म्हणाला. " मी उचलतों धनुष्य कैलासपर्वत उचलला तिथें या धनुष्यांची काय कथा !"

## १२ रावणाची फजीती

"हातें थोपटिल्या भुजा, मज असा नाहीं त्रिलोकीं दुजा<br>
मेरूही गगनीं खुजा, सुखवरीं माझीच आधीं पुजा "<br>
ऐसा जल्पुनि चाप जाड, उचलों जातां, न हाले कदा<br>
जैसा शैल मतंगजासि न ढळे, पाहे विदेहात्मजा ८७

एका दों न ढळेचि कार्मुक करें हे नेटकें जों कळे<br>
लावी हात बळें समग्रहि तदा तों कांहिंसं आकळे<br>
मोठी आरंभटी[1] करूनी, चुकटी दंतावली चावुनी<br>
आक्रोशें अतिविक्रमें, क्षितितळीं जानुद्वया लावुनी ८८

विसां करांनीं धनु तें न तोले<br>
न सांवरे यास्तव देह डोले<br>
भारें तयाच्या बहु खाय झोले<br>
त्याहीमधें रावण काय बोले ८९.

"या भूपें पण जिंकिला उभविलें कोदंड चंडाकृति<br>
महोदंडें[2] उदंड दंड करिती शाबास ! माझी धृती !"<br>
डोले बोलत बोल तों न धवरे, गेलाचि झोला भला<br>
आलें चाप अपाप त्यावरि उरीं तो भूतळा पातला ९०

---

१ ओढाताण. २ बाहु.

आला भूमितळासि गर्वपुतळा पिंजारुनी कुंतला
चापातें उखळावया बळ खळा नाहींच उत्शृंखळा[1]
सर्वांगींच कळा, विटे मुखकळा, झाला भुजामोकळा
वाजे ऊर गळा, स्वदेह सगळा झिंजाडितां आगळा ९१

ओकी रक्त भडाडुनी दडपतां वक्षःस्थळाची फळी
सर्वांगें ढकले, न लेशाहि ढळे, भूमी भुजा आफळी
शेखीं[2] देखुनि अप्रयत्न जनकें दीर्घप्रयत्नें दया
केली ओढुनि काढितां शिवधनू, देखे स्वभाग्योदया ९२

**–आनंदतनयकृत सीतास्वयंवर**

रावण उताणा पडला. तें धनुष्य त्याच्या उरावर कोसळलें त्याची प्राणांतिक अवस्था झाली. पण तें धनुष्य बाजूला काढून रावणाला उठवायला कोणीहि पुढें येईना. तें पाहून जनकानें उद्वेगानें म्हटलें, 'आज पृथ्वी निर्वीर झाली काय ?'

तेव्हां विश्वमित्रानें रामाला खूण केली. राम उठून धनुष्याकडे गेला. लीलेनें त्यानें तें धनुष्य उचललें. दोरी चढवण्यासाठीं तो तें वांकवूं लागला. त्यासरशीं तें कडकन् मोडलें. मोठा आवाज झाला भूमंडळ हबकलें. शेष हादरला. सभाजन थोडा वेळ मूर्च्छित झाले. रावण खालीं मान घालून तेथून चालता झाला. ऋषिजनांना आनद वाटला सीता पुढें आली आणि हातांतली माळ रामाच्या गळ्यांत घालून तिनें त्याच्या पायांवर मस्तक ठेवलें.

जनकानें अयोध्येंत दशरथाला कुंकुमपत्र लिहिलें. तो लवाजम्यासह मिथिलेस आला. जनक त्याला समोरा गेला. राम त्याच्या पायां पडला त्यानें रामाला पोटाशीं धरलें लग्नाची देवदेवकें बसली न्हाणीं झालीं; उष्टी हळद रुखवत वगैरे उपचार झाले. राम लग्नमंडपांत आला. जनकानें त्याला रत्नाच्या चौरंगावर बसवून त्याचे पाय धुतले. सुमेधेनें सोन्याच्या झारींतून पाणी घातलें मधुपर्क झाला लग्नघटका भरली. 'सुमुहूर्त सावधान' झालें. मंगल वाद्यें वाजलीं; अंतःपट दूर झाला सीता रामाची भार्या झाली

१ अमर्याद. २ शेवटीं.

जनकाची दुसरी मुलगी ऊर्मिला हिनें त्याच मंडपांत लक्ष्मणाला वरलें. कुशध्वजाच्या दोघी कन्या मांडवी आणि श्रुतकीर्ति यांनीं अनुक्रमें भरत आणि शत्रुघ्न यांच्या गळ्यांत माळा घातल्या. त्या चारहि सुना पाहून दशरथाला आनंद झाला चार दिवसपर्यंत थाटाचा लग्नसोहळा झाला. जनकानें जांवयांना अपार आंदण दिलें.

वरात घेऊन दशरथ अयोध्येला जाण्यासाठीं निघाला. वाटेंत एका एकीं अपशकुन होऊं लागले. थोड्याच वेळांत भार्गवराम त्यांना आडवा आला. सगळे लोक भ्याले. प्रलयाग्नि जाळायला आला असें त्यांना वाटलें. भ्याला नाहीं तो एकटा श्रीराम. तो सर्वांच्या पुढें झाला.

रामानें पुढें होऊन भार्गवाला वंदन केलें. भार्गव त्याला रागानें बोलला, 'शिवधनुष्य मोडून टाकल्याबद्दल तुला जो गर्व झाला आहे, त्याचं छेदन करण्यासाठीं मी आलों आहें. तुला सामर्थ्य असलं तर हें माझं धनुष्य घे आणि याला बाण जोडून दाखव. नाहींतर मला शरण ये.'

रामानें त्याच्या हातांतलें धनुष्य घेतलें आणि क्षणार्धांत बाण लावून आकर्ण ओढलें. भार्गव आश्चर्यचकित झाला त्याचा गर्वभार उतरला. आपला अवतार समाप्त झाल्याची त्याला जाणीव झाली. तो रामाला शरण गेला. राम त्याला म्हणाला:—

"तूं ब्राह्मण आहेस म्हणून तुझ्यावर बाण टाकणार नाहीं. पण माझा जोडलेला बाण फुकटहि जाणार नाहीं. तेव्हां यानें मी तुझा स्वर्गमार्ग बंद करूं का पृथ्वीवरची गती बंद करूं तें सांग."

भार्गवरामांनें 'स्वर्गमार्ग बंद कर' म्हणून सांगतांच रामाचा बाण ऊर्ध्व गतीनें सुटला. आलेलें संकट टळलें. वरात अयोध्येंत आली. रामानें सीतेसह गृहप्रवेश केला. नगरांत आनंदीआनंद झाला.

# अयोध्याकांड

★

विवाहसोहळा आटपून परत आल्यावर कैकयीच्या भावानें भरत शत्रुघ्नांना आजोळीं नेलें. राम–लक्ष्मण दशरथाची सेवा करूं लागले. रामानें तर राज्यकारभारांत लक्ष घालून दशरथावरचा भार बराच हलका केला. तें पाहून त्यानें रामाला यौवराज्याचा अभिषेक करण्याचें मनांत आणलें. वसिष्ठ आणि प्रधानमंडळी यांनीं त्यांच्या विचाराला संमति दिली. मुहूर्त ठरला. आमंत्रणें गेलीं, नगर शृंगारलें गेलें. राम आपला राजा होणार म्हणून प्रजा हर्षभरित झाली.

होमहवनाची सिद्धता झाली- पुण्य नद्यांचें जल आणवलें ब्राह्मण जपाला बसले. वसिष्ठानीं राम-सीतेला उपोषण करायला लावलें. त्यांच्या हातून ब्राह्मणांना दानें देववलीं.

कैकयीची मंथरा नांवाची एक माहेरहून आणलेली दासी होती. तिनें राजवाड्याच्या गच्चीवर उभें राहून नगरशोभा आणि मंडपशोभा पाहिली. लोकांच्या उत्साहास भरती आलेली तिला दिसली. वाड्यांतली गडबड तर तिच्या कानावर आदळतच होती. हें सगळें रामाच्या राज्यभिषेकासाठीं चाललें आहे हें समजतांच तिच्या मनांत एक दुष्ट कल्पनेचा उदय झाला. ती धांवतच कैकयीकडे आली.

"देवी, उद्यां रामाला राज्याभिषेक होणार म्हणे." ती म्हणाली.

"असं का? फार छान. आनंदाची गोष्ट सांगितलीस.हें घे तुला बक्षीस." असें म्हणून कैकयीनें आपल्या गळ्यांतला हार काढून तिच्या गळ्यांत घातला.

"जळो तुझं तें बक्षीस ! तुझी बुद्धि ठिकाणावर आहे का? राजानं भरताला आजोळीं पाठवून दिलं, देशोधडीला लावलं म्हणेनास. आणि पाठीमागून रामाला राज्यावर बसवण्याचं हें कारस्थान शिजवलं."

"यांत कसलं आहे कारस्थान राज्याचा अधिकारी रामच आहे. सगळ्या भावांत तोच मोठा. मला तर माझ्या भरतापेक्षांहि राम आवडतो आपल्या जन्मदात्या आईवंर नसेल एवढी त्याची माझ्यावर भक्ति आहे."

"भोळी ग भोळी! म्हणे माझ्यावर भक्ति आहे! तो एकदां राज्यावर बसूं दे, म्हणजे बघ तुझे कसे वनवास लावील ते! भरताला तर आतां अयोध्या अंतरलीच. आला तर रामाच्या पायाचा दास म्हणून त्याला राबावं लागेल. दशरथ महाराजांनीं तुला फसवलं बरं! लाडकी लाडकी म्हणून प्रेमाचं नाटक केलं अन् शेवटीं गळा कापला."

मंथरेची मात्रा कैकयीला लागू पडूं लागली. विष भिनत चाललें. थोडा वेळ विचार केल्याअंतीं मंथरेचें बोलणें सत्य आहे असें तिला वाटलें ती म्हणाली:—

"मंथरे, आतां मी काय करूं? मला तर वाटतं कीं आतां वेळ निघून गेली."

"अजून नाहीं गेली. अजून तुझ्या हातांत डाव आहे." असें म्हणून मंथरेनें तिला कसली तरी कानगोष्ट सांगितली.

त्यासरशीं कैकेयी तावडतोब कोधागारांत गेली अलंकार इतस्ततः फेकून दिले. जमिनीवर लोळण घेतली आणि तळमळत पडली. थोड्या वेळानें दशरथ तेथें आला. त्याला हा प्रकार काय आहे तें समजेना. तो तिची मनधरणी करूं लागला. बऱ्याच वेळानें ती एकदांची बोलली:—

"माझे मागचे दोन वर मला आत्तां पाहिजेत."

"मग घे कीं. कोण नाहीं म्हणतो? काय हवं तें माग." राजा म्हणाला.

"माझ्या भरताला राज्य मिळावं हा एक वर अन् राम चौदा वर्षं वनवासाला जावा हा दुसरा!" कैकयीनें मागितलें.

दशरथाच्या मस्तकावर वज्राघात झाला.तो तिला नाना प्रकारें काकुळती आला. पण कैकयी आपला हेका सोडीना. दशरथाला नाहीं म्हणतां येईना. कारण तो वचनबद्ध झाला होता. रडत रडत त्यानें ती रात्र काढली. त्याच्या सगळ्या आकांक्षावर कुऱ्हाड पडली.

सकाळीं त्यानें सुमंत्रा करवीं रामाला बोलावणें धाडलें. राम येऊन हात जोडून पुढें उभा राहिला. दशरथानें कैकयीचा हेतु त्याला सांगितला. रामानें क्षणभरहि विचार न करतां राजाला सांगितलें कीं, 'भरताला सुखानें राज्य करूं दे. मी वनवासाला जातों.

रामानें कौसल्येच्या महालांत जाऊन तिला सारा वृत्तांत सांगितला. ती त्याला मिठी मारून रडूं लागली, 'रामा नकोरे वनांत जाऊं! मी कशी जगूं तुझ्यावाचून! '

आई शोक आवर. मी कर्तव्यानं बांधलों आहें." पित्याचं वचन सत्य करणं हें पुत्रांच मुख्य कर्तव्य आहे." तोम्हणाला.नाना प्रकारें तिची समजूत करून तो तिथून बाहेर पडला. वनवासांत आपल्या मुलांचे संरक्षण करावें म्हणून कौसल्येनें पंचमहाभूतांची प्रार्थना केली.

## १३ कौसल्येची पंचमहाभूतांस प्रार्थना

" ते आदिपुरुषाची जननी वना निघतां चक्रपाणि
पंचभूतांसी कर जोडोनी प्रार्थना करी भावार्थे ९३

धरणीस कौसल्या विनवित माते! तुझा श्रीराम जामात
यासी रक्षीं यथार्थ निजस्नेहें करूनियां ९४

ज्या पंथे जाईल कमलपत्राक्ष त्याच पंथें असोत सुफल वृक्ष
नाना संकटीं विरूपाक्ष[1] रक्षो यासि सर्वदा ९५

रातोत्पल कमलें पूर्ण त्याहून सुकुमार चरण
त्याचिया चरणीं खडेपाषाण रुतों नेदी अवनीये ९६

उदकासि कौसल्या म्हणत रघुवीर होईल तृषाक्रांत
नदी-सरोवरें समस्त पूर्ण उदकें ठेवीं कां ९७

म्हणे विश्वप्रकाशा चंडकिरणा[2] तूं रक्षीं आपुले कुलभूषणा
तुझीं किरणें मनमोहना स्पर्शों नेदी सर्वथा ९८

---

१ शंकर. २ सूर्य.

लोक प्राणेश प्रभंजना लघु माझिया रघुनंदना
तुझिया गुणें धुळी नयनां- माजीं न जावी सर्वथा ९९
उष्णें शिणतां रघुनाथ तूं मंद येईं मारुत
जेणें सुखावे अवनिजाकांत करीं ऐसें प्राणेशा १००
अंबरीं[1] तूं निर्विकार पाहीं शब्दविषय तुझे ठायीं
मंजुळ शब्द तुझे हृदयीं अंडजें[2] करोत सर्वदा " १०१

—श्रीधरकृत रामविजय

सगळ्या अयोध्येत ही दुष्ट वार्ता पसरली. राजवाड्यांपुढें प्रजाजनांची गर्दी लोटली. 'रामचंद्रा! वनांत जाऊं नको. आम्हांला टाकूं नको.' हा एकच सर्वांचा आक्रोश. रामाच्या बरोबर लक्ष्मणानेंहि जाण्याचें ठरविलें. नंतर राम सीतेच्या महालांत गेला. 'सीते! मी कैकयीच्या आज्ञेनें पितृवचन सत्य करण्यासाठीं वनांत चाललों. चौदा वर्षांनीं परत येईन. तोंवर तूं इथें राहून माझ्या मातांची सेवा कर.' राम तिला बोलला.

## १४ सीतेची रामास विनवणी

" ऐकोनि श्रीरामाचें वचन हृदयीं लागला तो वाग्बाण
अश्रुपूर्ण झाले नयन अधोवदन जानकी १०२
पतिवियोगाचें दुःख तेणें कोरडें केलें मुख
हारपलें सकळ सुख परम दुःख वोढवलें १०३
दुःखें झाली कासाविसी मग लागली पतिपायांसी
काय बोलली श्रीरामासी तें सावकाशीं अवधारा १०४
राज्यीं असतां श्रीरामासी सेवा वांटिली सेवकांसी
ते मी एकली वनवासी सर्वस्वेंसी सेवीन १०५

१ आकाश. २ पक्षी.

सर्व सेवेचा निजस्वार्थ मज लाभेल वनांत
तूं सर्वज्ञ श्रीरघुनाथ माझा मनोरथ पुरवावा १०६
मग बोलिला रघुनंदन नेणंसी वनवासाचें चिन्ह
वनवासीं दुःख दारुण सावधान अवधारीं १०७
वनीं वनफळांचा आहार तृणपर्णांचा शेजार
शीत उष्ण निरंतर दुःख दुर्धर वनवासीं १०८
तूं तंव रायाची राजबाळा अतिशयेसीं वेल्हाळा
वनीं द्वंद्व[1]दुःख उमाळा तूं अबला केविं साहसी? १०९
ऐकोनि द्वंद्वबाधावचन सीता जाली हास्यवदन
जवळी असतां रघुनंदन द्वंद्वबंधन बाधींना ११०
वृकव्याघ्रपंचानन त्यांचा आत्मा रघुनंदन
तो तूं जवळी असतां जाण द्वंद्वबंधन मज कैचें? १११
जवळी असतां रघुटिळक कंटक होती निःकंटक
विष तें होय पीयूख परम सुख वनवासीं ११२
तुज सांगातें वनवास तो मज वैकुंठ कैलास
तुज वेगळा संसार वोस दुःख असोस मज तेव्हां ११३
कृपाळु तूं हृषीकेशी ऐसीं बिरुदें तूं वाहसी
तरी मज न्यावें वनासी निजसेवेसी दास्यत्वा ११४
म्हणोनि धरिले दोन्ही चरण गहिंवरें गळताति नयन
जालें पतिपादप्रक्षाळण श्रीराम पूर्ण तुष्टला" ११५

**—एकनाथकृत भावार्थ रामायण**

---

१ शीत, उष्ण इ. द्वंद्वांचें दुःख

राम, सीता आणि लक्ष्मण यांची सिद्धता झाली. त्यांनीं दशरथ, वसिष्ठ आणि माता यांना नमस्कार केला. येवढ्यांत सुमंत्रानें रथ जोडून दारीं आणला. तिघेहि रथांत बसलीं. रथ चालू झाला. सर्वांनीं हंबरडा फोडला. राजवाड्यांत एकच आकांत झाला. कौसल्येचें हृदय दुभंग झालें. दशरथ मूर्च्छित पडला. नगरवासी लोक तर घरेंदारें टाकून रथामागून धावूं लागले. अग्निहोत्री चालले. पंडित चालले. सज्ञान-अज्ञान सगळेच निघाले.

## १५ अयोध्येंतल्या प्रजेचा विलाप

"जेधवां प्रभु तो निघे सहसा वनाप्रति जावया
पौर ते रडती, समस्तहि टाकिती द्रविणालया[1]
त्या रथासह धांवती, पडती पथीं किति कश्मळें[2]
'हा' असें वदती मुखें नयनांतुनि गळति जळें　　११६

लोक सर्वहि शोकविव्हल ओक[3] टाकुनि धांवले
कीं तृषाकुल सर्व ते अमृताशयाप्रति[4] पावले
रोधिती रथमार्ग पाहति रामचंद्रमुखाकडे
बर्हिवेष्टित[5] विद्युदंबुदसाम्य[6] तैं प्रभुला घडे　　११७

लोक ते कर जोडुनी ह्मणती वियोग न साहवे
स्पष्ट संयमनीसमान[7] पुरीस आज न पाहवे
त्वत्पदांकित काननीं विचरूं जसे सुर नंदनीं
सर्व सौख्य असे त्वदास्यविलोकनीं[8] पदवंदनीं　　११८

त्वत्पदाब्जवियोगतापित चित्त हें न रमे घरीं
न श्रुतिप्रतिपाद्य वस्तुविचार[9] सार कथांतरीं

---

१ श्रीमंत घरें. २ दुःखानें. ३ घर. ४ अमृतसरोवर. ५ मोरांनीं वेढलेला. ६ विजाळ मेघ. ७ यमपुरी. ८ तुझें मुख पाहण्यांत. ९ आत्मविचार.

न स्मरालसकेलिलीलस सुंदरी भुजबंधनीं
सर्व सौख्य असे त्वदास्यविलोकनीं पदवंदनीं ११९

त्वत्पदाब्जवियोगताप हरावया बळ सारसीं
पाहतां न दिसे, नसेचि निशाकरीं, न सुधारसीं
राधवा! मग शक्ति कोठुनि सर्पवेष्टित चंदनीं ?
सर्व सौख्य असे त्वदास्यविलोकनीं पदवंदनीं १२०

पन्नगाश्रित गेह सिंहगुहाच कीं पितृकानन
बंधनालय यातनास्थळ कीं सकोप यमानन
वाटते नगरी तशी तुजवांचुनी रघुनायका !
दे स्वपादसमागमामृत सर्वदा सुखदायका " १२१

**–मोरोपंतकृत छंदोरामायण**

रामरायानें रथाखालीं उतरून लोकांना नाना परींनीं विनवलें. पण कोणी ऐकलें नाहीं. रथाचा माग सोडला नाहीं. त्या रात्रीं रामानें तमसा नदीच्या तीरावर वस्ती केली. सीतेसह तृणशय्येवर शयन केलें. लोकहि आजूबाजूच्या वृक्षाखालीं झोंपले. ते आपली पाठ सोडणार नाहींत हें जाणून त्यांना त्रास होऊं नये म्हणून रामानें एक युक्ति योजिली. मध्यरात्रीं उठून त्यानें सुमंत्राला रथ जोडायला सांगितलें. सगळीं रथांत बसलीं. लोकांना चकवण्यासाठीं रथ थोडा वेळ अयोध्येच्या रोखानें चालवला आणि मग तमसेला जिथें पायउतार होता तिथून पलीकडे नेऊन ते पुढच्या मार्गाला लागले.

दुसऱ्या दिवशीं सूर्यास्ताच्या वेळीं राम भागीरथीच्या तीरावर आला. वडाचा चीक काढून राम-लक्ष्मणांनीं आपले जटाजूट कायमचे बांधून टाकले. गुहक नांवाचा निषादांचा राजा रामभक्त होता. आपला स्वामी आला आहे असें ऐकून तो त्याच्या दर्शनाला आला. त्यानें रामापुढें लोटांगण घातलें. देव-भक्त प्रेमसुखांत रंगले. सकाळीं त्यानेंच नावाडी बोलावून आणून राम-

१ विषयविलास. २ स्मशान.

रायाला नौकेंतून गंगेपार केलें. सुमंत्र दुःखविव्हळ होऊन तिथूनच मागें परतला.

सुमंत्र अयोध्येंत आल्यावर दशरथानें, राम कसा वनांत गेला तें त्याला विचारलें. सुमंत्रानें सर्व वृत्तांत निवेदिला. ' कसारे माझ्या बाळाला वनांत टाकून तूं परत आलास ? ' म्हणून दशरथ रडूं लागला. गळाला अडकलेल्या माशासारखा तो तळमळूं लागला, पुत्रवियोगाचा अग्नि त्याचें हृदय जाळूं लागला. ' रामा, धांव ! ' म्हणून त्यानें हांक फोडली. तेच शब्द शेवटचे ठरले. दशरथाचे प्राण कुडी सोडून रामाकडे उडून गेले. चार पुत्र असून दशरथाच्या अंतकाळीं एकहि त्याला मांडी देऊं शकला नाहीं.

दशरथाच्या सर्व राण्या त्याच्याभोंवती बसून ऊर पिटूं लागल्या. आधीं सापानें दंश करावा आणि त्यावर विंचवानें नांगी मारावी त्याप्रमाणें आधीं पुत्रवियोगाचें दुःख आणि त्यांत पतीचें निधन, अशा दुहेरी दुःखांत कौसल्या-सुमित्रा सांपडल्या. सगळें अयोध्यानगर तुंबळ शोकांत बुडालें.

दशरथाचें प्रेत तेलाच्या द्रोणींत ठेवून वसिष्ठांनीं भरताला आणण्यासाठीं सुमंत्राला पाठविलें. सुमंत्रानें त्याला ताबडतोब आणलें. दशरथाचें प्रेत पाहून भरत धरणीवर लोळूं लागला. तशांतच राम वनवासाला गेल्याची वार्ताहि त्याला कळली. त्यामुळें तर त्याचें सारें धैर्य गळालें. तो अंतरांत खचला.

नंतर तो आपल्या मातेला भेटायला गेला. तिच्या गांवीं पतिमरणाच्या दुःखाची वार्ताहि नव्हती. आतां आपला भरत राजा होणार. आपण राजमाता होणार याच आनंदांत ती निमग्न होती. भरत भेटतांच तिनें त्याला हृदयाशीं कवटाळलें. ' आई, असं कसं झालं ग ! ' म्हणून भरतानें विचारतांच ती हृष्टपुष्ट होऊन सांगूं लागली:—

" माझ्या लाडक्या बाळा ! तुझ्या भाग्यानंच या सर्व गोष्टी अल्पकाळांत घडून आल्या. रामाला चौदा वर्षं वनवासाला मी पाठवलं आणि तुझ्यासाठीं अयोध्येचं राज्य मिळवलं. रामाचा वियोग असह्य होऊन तुझ्या पित्यानं प्राण सोडला. आतां तूं राजा झालास. माझा बाळ राजा झाला ! "

आईचे हे शब्द ऐकून भरताला शिसारी आली. ही माणूस का राक्षसीण असा त्याला भ्रम पडला. त्यानें तिची कठोर शब्दांत निर्भर्त्सना केली.

वाचनालय ... १२२ ... क्रमांक ... ता. ...

## १६ भरतानें केलेला कैकेयीचा धिक्कार

" वृत्तांत सांगे भरतासि माय
आनंद जीचा त्रिजगीं न माय
भेदूनि वक्षःस्थल शब्द तीचा
करी महाक्षोभ महामतीचा

जाळील तीतें निज दृष्टिपातें
पाहे असा हालविनाच पातें
म्हणे 'अवो! पापिणि, पापरूपे!
जळो तुझें तोंड! जडस्वरूपे[1]' १२३

जाळीन हें तोंडचि जाण आधीं
मुखें जया देशि अनंत आधी[2]
न माय तूं वैरिणि होसि साची
माझे मनीं भाव खरा असाची १२४

केला तुवां देखत भर्तृघात
क्षणें तिवाटा[3] रचिल्या तिघांत
शत्रुघ्न-मी, लक्ष्मण-राम जोडे
राजा तिजा, तीस अनर्थ जोडे १२५

वना धाडिलें जेधवां रामराया
तुवां हेतु केला स्वभर्ता मराया

१ मूर्ख. २ मनोव्यथा. ३ तीन वाटा.

अहा! राम-सीता अशा दंपतीतें
वना धाडिलें, मारिलें कां पतीतें? १२६

नकळत पतिताचें खादलें अन्न वोकी
तरि पतित नव्हे तो, पापरूपे! अवो कीं
म्हणुनि उदरिं तूझ्या देह हा जन्मला गे!
त्यजिन तरि मला हें पाप तूझें न लागे १२७

हे अग्नितापित घृतांत तनू जळेना
प्रत्यक्ष तो कधिंहि पावक आतळेना
रामापराधिनि सुतास शिवेल कां जी
घे ब्राह्मणोत्तम न अंत्यजपात्र कांजी १२८

मारील सद्य मज, खाइन त्या विखातें
कीं पापियासि निज पातक जेविं खातें
तूं पापिणी! त्वरित जाशिल रौरवासी
होशी सदा निरयदारुणलोकवासी! १२९

धिक्कारूनी गोष्टि मातेसि सांगे
कौसल्येच्या ये गृहा सानुरागें
त्यातें देखे जेधवां राममाय
श्रीरामाचा शोक लोकीं न माय १३०

मोकळा करुनि कंठ तेधवां
आठवूनि मनिं जानकीधवा
ते रडे भरतही तसा रडे
जोंवरी नयन होति कोरडे" १३१

—वामनपंडितकृत भरतभाव

वसिष्ठांनीं मग भरताचें सांत्वन केलें. त्याला रामभेटीचें आश्वासन दिलें. त्याच्याकडून दशरथाला अग्नि दिला. तेरा दिवसपर्यंत सगळें क्रिया-कर्मांतर करवलें. चौदाव्या दिवशीं भरत, शत्रुघ्नासह मोठा दळभार घेऊन रामभेटीसाठीं वनांत निघाला. वसिष्ठ आणि इतर ब्राह्मण त्याच्या सांगातीं निघाले. कौसल्या आणि सुमित्राहि चालल्या. अयोध्येंतले बरेचसे प्रजाजनहि चालले. सुमंत्र त्यांचा वाटाड्या झाला.

तमसा नदीवर त्यांना गुह भेटला. राम इथें कसा आला, कुठें बसला कुठें झोंपला तें त्यानें भरताला दाखवलें. रामाचीं पावलें जिथें उमटलीं होतीं तिथली धूळ उचलून भरतानें कपाळीं लावली. गुहकानें त्यांनाहि गंगेंतून पलीकडे नेलें. तिथून ते भरद्वाजाच्या आश्रमाला आले. भरद्वाजानें सर्वांचें स्वागत केलें. वसिष्ठादि ऋषीश्वरांची षोडशोपचारें पूजा केली. आपल्या आश्रमांत सर्वांना थाटानें भोजन देण्याचा त्यानें बेत केला. त्यासाठीं त्यानें आपल्या तपःसामर्थ्यानें साक्षात् स्वर्ग खालीं आणला.

## १७ भरद्वाजाश्रमांतला भोजनसमारंभ

"भरद्वाज महामुनी बैसोनियां अनुष्ठानीं
स्वर्ग आणी आकर्षुनी पूजेलागोनी आश्रमा १३२

घरें चत्वरें पट्टिशाळा अश्वशाळा गजशाळा
जना बैसावया विश्रामशाळा अतिविशाळा विचित्र १३३

चित्रवन नंदनवन येथें आणिलें आनंदवन
तेणें आश्रम शोभायमान राजे ऋषिजन विस्मित १३४

घृतकुल्या[1] मधुकुल्या आम्ररसें वापी भरल्या
इक्षुरसें नदी वाहूं लागल्या सरिता भरल्या दधिदुग्धें १३५

नानापरीच्या शिखरिणी तेणें भरल्या पोखरिणी
शर्करांचे पर्वत धरणी फळश्रेणी स्वादिष्ट १३६

---

१ तुपाचे पाट

चंपक कल्पद्रुम मांदार पारिजातादि विचित्र हार
पूजावया ऋषि राजकुमर सुमनसंभार सुवासी १३७

उगाळून शुद्ध चंदन भरिले कनकाचे रांजण
षड्रसीं दिव्यान्न नाना पक्वान्नें परवडी १३८

ऐसीं दिव्यान्नें पूर्णताटीं नानारसीं भरिल्या वाटीं
परमानंदें पडे मिठी शाखा गोमटीं लोणचीं १३९

ठायीं ठायीं अतिनिर्मळ सुवासिक शीतळ जळ
सेवितांचि पैं तात्काळ सबाह्य सकळ निवताती १४०

दिव्यांगना अतिसुंदरी विंजणे घेवोनियां करीं
वीजितात आपुले करीं त्यांसी जेवणारीं भुलिजेती १४१

पाहतां त्यांच्या तोंडाकडे जेवण अंतरलें पुढें
जेवणार जाले वेडे अंगनांकडे पहातांची १४२

त्यांच्या मुखाचा पाहतां वास देखतां हावभाव विलास
हातींचा हातीं राहिला घांस जाला स्पर्श वायसाचा[२] १४३

जेवण अंतरलें बापुडें सचैल स्नान करणें घडे
सकामी ठकले रोकडे अति तरफडें चडफडती १४४

श्रीरामाचे निजभक्त अंगनामुखीं न्हेती आसक्त
ग्रासोग्रासीं राम स्मरत जाले तृप्त स्वानंदें १४५

वसिष्ठ ताटीं परवडी[३] चोख तैसेंचि ताट सेविती रंक
उंच नीच नाहीं देख जेविलें कटक[४] समतृप्ति १४६

क्षुधा हरपली तेथ तृष्णा तृष्णेशीं जाली तृप्त
तृप्त जालें सैन्य समस्त कोणी अतृप्त असेना १४७

---

१ भाज्या. २ कामाचा. ३ पदार्थांची रेलचेल. ४ सैन्य.

भरत आणि शत्रुघ्न ऋषीं केलें शुद्धाचमन
सभा बैसली प्रसन्नवदन सुख संपूर्ण सर्वांसी १४८

टिळेमाळा गंधाक्षता विडे दिधले समस्तां
पूजितां श्रीरामाच्या भक्तां उल्हासता भरद्वाजा १४९

वनें घमघमित मनोहर परागें उधळती सपूर
सामगायनें मधुर तैसे भ्रमर रुणझुणती १५०

कोकिळा वाक्यें कूजती वेदांत पारवीं घुमघुमती
तांडवें नाचे उमापति तैसे नाचती मयूर १५१

विवेकद्राक्षांचे घड देखतां डोळ्यांचें पुरे कोड
सकळ गोडियाचे ते गोड गोड सुरवाडी सेविलिया १५२

हा हा, हू हू गंधर्व दोनी मधुर स्वरें गातीं गाणीं
रंभा उर्वशी विलासिनी रंगीं नाचणी नाचती १५३

प्रकाश न लोपे सूर्यापुढें ऐसे रत्नदीप चोखडे
उजळले वाडेंकोडें चहूंकडे लखलखितु १५४

प्रतिपुरुषीं भिन्न वोवरी रत्नमंचक त्यामाझारी
पुरुषाप्रति पांच नारी सेवेवरी तिष्ठती १५५

येकी करिती चरणक्षाळण येकी त्या चरणसंवान
येकी चंदन येकी व्यजन विडिया जाण येकी देती १५६

जवळी असतां अप्सरांसी श्रीरामभक्ता उदास त्यांसी
भूतीं देखतां भगवंतासी स्त्री-पुरुषासी अभावो १५७

मुळी आम्हां आम्ही नाहीं तेथें स्त्री-पुरुष मिथ्या पाहीं
स्त्री-पुरुष भास भासे देहीं ते देहबुद्धि नाहीं हरिभक्तां" १५८

—एकनाथकृत भावार्थरामायण

भरतानें मग पुढें जाण्यासाठीं भरद्वाजाची आज्ञा मागितली. चित्रकूट पर्वतावर तुला राम भेटेल असें भरद्वाजानें त्याला सांगितलें. भरत तिथून निघाला. तो चित्रकूट पर्वताच्या पायथ्याशीं आला. त्या वेळीं लक्ष्मण फळें मिळवण्यासाठीं चित्रकूटावर हिंडत होता. पायथ्याशीं भरत आला आहे हें दुरून त्यानें पाहिलें. त्याचें सशस्त्र सैन्यहि त्याला दिसलें. त्याच्या मनांत कसली तरी आशंका येऊन तो रामाकडे धांवला.

" रामराया ! पायथ्याशीं भरत सैन्यासह उतरला आहे. बहुतेक तुझा वध करण्यासाठीं कैकयीनें त्याला पाठवलें असावें. मला अनुज्ञा दे. मी त्याच्याशीं लढून त्याला मारतों अथवा पिटाळून लावतों."

" लक्ष्मणा ! तूं अजाण आहेस. तुझी शंका व्यर्थ आहे. भरत मला मारायला कधींहि येणार नाहीं. भरताचं अंतःकरण तूं ओळखलं नाहींस ; मीं ओळखलं आहे. भरत प्रेमाचा पुतळा आहे. बंधुप्रेमाचा तो आदर्श आहे. तो इथें आल्यावर तुझी खात्री पटेल. "

इतक्यांत भरत वर आलाच. दर्भाच्या आसनावर बसलेल्या राम–सीतेला पाहून त्यानें लोटांगण घातलें. त्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रु झरझर वाहूं लागले. रामानें त्याला उठवलें. उभयतांनीं क्षेमालिंगन दिलें. बराच वेळ झाला तरी दोघांची मिठी सुटेना. तें प्रेमळ सात्त्विक दृश्य पाहून ऋषिमुनि गहिंवरले. नंतर रामानें कौसल्येच्या चरणांवर मस्तक ठेवलें. सुमित्रेलाहि प्रणाम केला.

वसिष्ठांनीं दशरथाच्या मृत्यूचें वर्तमान सांगतांच रामाच्या हृदयावर वज्राघात झाला. प्रेमळ सासऱ्यासाठीं सीता धाय मोकलून रडली. लक्ष्मणाचीहि तीच अवस्था झाली. नंतर रामानें नदीवर जाऊन पित्याला तिलांजलि दिली.

एवढं झाल्यावर रामानें भरताच्या आगमनाचें कारण विचारलें. भरत म्हणाला कीं, " मी तुला अयोध्येला नेण्यासाठीं आलों आहें. अयोध्येचं राज्य माझं नसून तुझं आहे तूं त्याचा स्वीकार कर आणि प्रजेला सांभाळ. मी आजन्म तुझी सेवा करून राहीन. त्यांतच मला आनंद आहे."

"चौदा वर्ष वनवासाची प्रतिज्ञा करून मी निघालों आहें. आतां मला परत फिरणं शक्य नाहीं. एकवचनी, एकपत्नी, एकबाणी हें माझं ब्रीद आहे. एखादे

वेळीं सूर्य आपला मार्ग चुकेल. अग्नि आंधळा होईल. वाऱ्याचे पाय मोडतील. पण राम आपली प्रतिज्ञा मोडणार नाहीं. तूं आपल्या आईच्या आज्ञेप्रमाणें वाग आणि सुखानें राज्य कर."

रामाचें हें निर्धाराचें वचन ऐकून भरताला परम दुःख झालें. तो अग्निप्रवेश करायला सिद्ध झाला. रामानें परोपरीनें त्याची समजावणी केली आणि चौदा वर्षें पूर्ण होतांच भेट देण्याचें आश्वासन दिलें, तेव्हां तो आत्मघातापासून परावृत्त झाला.

"रामराया ! मी आतां नंदिग्रामीं संन्यस्त वृत्तीनें राहीन. अयोध्येंत जाणार नाहीं. तूं परत आल्यावर तुझ्यासहच मी अयोध्येंत पाय ठेवणार आहें." भरत म्हणाला.

रामानें 'ठीक आहे.' असें म्हटलें व भरताला आपल्या पादुका दिल्या. शत्रुघ्न आणि सुमंत्र यांस राज्यकारभार चालवायला सांगितलें. संसारांत कसें वागावें याबद्दल थोडा उपदेशहि केला.

## १८ रामाचा शत्रुघ्नास उपदेश

" सदा स्तवावे संतसज्जन श्रीगुरुभजनीं सावधान
दूर त्यागावे दुर्जन त्यांचें अवलोकन न करावें १५९

परदारा आणि परधन येथें कदा न ठेविजे मन
वेदमर्यादा नोल्लंघावी पूर्ण प्राणांतहि जाहलिया १६०

जरी क्लेशकाळ पातला बहुत परी धैर्य न सोडावें यथार्थ
गुरुभजन पुण्यपंथ न सोडावे सर्वथा १६१

साधुसंत गोब्राह्मण यांचें सदा करावें पालन
सकळ दुष्टांसीं दवडोन स्वधर्म पूर्ण रक्षावा १६२

संतांचा न करावा मनोभंग हरिभजनीं झिजवावें अंग
सांडोनि सर्व कुमार्ग सन्मार्गेंचि वर्तावें १६३

ऋषींचे आशीर्वाद घ्यावे वर्म कोणाचें न बोलावें
विश्व अवघें जाणावें आत्मरूपीं निर्धारें १६४
सत्संग धरावा आधीं नायकावी दुर्जनाची बुद्धि
काम-क्रोधादि वादी दमवावे निज पराक्रमें १६५
मी जाहलों सज्ञान हा न धरावा अभिमान
विनोदेंहि पराचें छळण न करावें सहसाही १६६
शोक-मोहांचे चपेटे पूर्ण अंगीं आदळती येऊन
विवेक वोडेण पुढें करून ज्ञानशस्त्र योजावें १६७
कामक्रोधमदमत्सर हे गृहास येऊं न द्यावे तस्कर
आयुष्य क्षणिक जाणोनी साचार सारासार विचारावें" १६८

—श्रीधरकृत रामविजय

भरत श्रीरामाचा निरोप घेऊन परतला आणि नंदिग्रामीं रामपादुका स्थापून त्यांची उपसना करीत राहिला. भरत गेल्यावर रामहि तिथून पुढें निघाला. जातां जातां त्याला अत्रिऋषीचा आश्रम लागला. अत्रीनें त्याचें स्वागत केलें. अनसूयेनें सीतेला आपल्या निढळाचें कुंकू लावून अनेक आशीर्वाद दिले.

---

१ प्रहार. २ ढाल.

# अरण्यकांड

★

अत्रिऋषीचा निरोप घेऊन राम दक्षिण मार्गानें निघाला. राम-लक्ष्मण पुढें चालले होते आणि सीता त्यांच्या मागून जात होती. तिचे पाय दमले होते आणि मधून मधून ती मागेंच राहत असे. घनदाट अरण्यांतून त्यांचा प्रवास चालला होता. खडे-काटे सीतेच्या पायांत बोंचत होते. कांटेरी झुडपांनीं आंग ओरबाडलें जात होतें. पण रामाच्या सहवासांत ती या दुःखांची पर्वा करीत नव्हती.

इतक्यांत पाठीमागून विराध नांवाचा एक राक्षस आला आणि त्यानें सीतेला उचललें. तिला खांद्यावर घेऊन तो धूम पळूं लागला. सीता ओरडली. रामानें मागें वळून पाहिलें धनुष्याला बाण जोडून त्यानें प्रथम त्या राक्षसाचे दोन्ही बाहु तोडून टाकले आणि तिसऱ्या बाणानें मस्तक तोडलें. तो राक्षस म्हणजे कुबेरानें शापलेला तुंबर नांवाचा गंधर्व होता. दिव्य रूप घेऊन तो रामाकडे आला आणि आपला उद्धार केल्याबद्दल त्याच्या पायांवर लोळूं लागला. लगेच त्याला स्वर्गांतून विमान आलें आणि त्यांत बसून तो निघून गेला.

रामानें मग शरभंगऋषीच्या आश्रमांत येऊन त्याला दर्शन दिलें. पुढें तो अगस्त्य मुनीच्या आश्रमांत आला. अगस्त्यानें भक्तिभावानें रामाची पूजा केली. त्यानंतर त्यानें रामाला अक्षय भाते, अक्षय कवच आणि इतर अनेक शस्त्रास्त्रें दिलीं. आणि शेवटीं एक तेजस्वी बाण रामाच्या हातीं देऊन त्याला म्हटलें कीं, 'हा बाण रावणाला मारण्याच्या कामीं तुला उपयोगी पडेल.'

तिथून पंचवटीला जात असतांना वाटेंत रामाला जटायु भेटला. हा कोण भयंकर प्राणी म्हणून राम त्याच्यावर बाण सोडणार तों जटायूनें आपण दशरथाचा मित्र असल्याचें त्याला सांगितलें. रामानें मग त्याला आपला काका समजन त्याचे पाय धरले.

पंचवटीस आल्यावर लक्ष्मणानें रामासाठीं गोदातटाकीं आश्रम बांधला. तिघेंहि त्या आश्रमांत राहूं लागलीं. लक्ष्मण नित्य फळें-मुळें आणूं लागला. राम-सीता फळें भक्षीत. लक्ष्मण मात्र उपाशी राहत असे.

रावणाची शूर्पणखा नांवाची एक बहीण होती. तिचा पुत्र कालखड्गाच्या प्राप्तीसाठीं एका वेळूच्या बेटांत बसून शंकराची अराधना करीत होता. लक्ष्मणानें एक दिवस त्याला मारून टाकलें. पुत्रकोशानें शूर्पणखा घायाळ झाली. तिनें लक्ष्मणाचा सूड घ्यायचें ठरविलें. तरुण सुंदर कामिनीचें रूप घेऊन ती लक्ष्मणाकडे आली.

" महाराज, तुम्हांला पाहून माझा जीव भुलला आहे. मी त्रिभुवनांत हिंडलें; पण मनाजोगता पतिच मला मिळाला नाहीं. आज माझं भाग्य फळाला आलं. आत्तां तुम्ही माझं पाणिग्रहण करा. मी तुमची अहोरात्र मनोभावें सेवा करीन. " तिनें डोळ्यांत अश्रु आणून लक्ष्मणाची प्रार्थना केली.

" राम माझा थोरला भाऊ आहे. मी सदैव त्याच्या आज्ञेंत वागतों. त्याला तूं आपला मनोरथ कळव. त्यानं जर या गोष्टीला संमति दिली तरच मी तुझ्याशीं लग्न करीन; एरव्हीं नाहीं. " लक्ष्मणानें तिला सांगितलें.

ती उठून रामाकडे गेली. रामानें तिला ओळखलें. कपटाची फजिती कपटानेंच करावी असें त्यानें ठरविलें. तो तिला म्हणाला, 'लक्ष्मण माझी तोंडी आज्ञा मानायचा नाहीं. मी तुझ्या पाठीवर आज्ञा लिहून देतों म्हणजे तो सगळं काम ठीक बजावील.'

शूर्पणखा पाठमोरी बसतांच रामानें तिच्या पाठीवर आज्ञेचीं अक्षरें लिहिलीं व तिला जायला सांगितलें. ती धांवतच लक्ष्मणाकडे आली. लक्ष्मणानें ती आज्ञा वाचली आणि तीक्ष्ण बाणानें तिचें नाक व कान कापून टाकले.

अशी दुर्दशा झाल्यावर शूर्पणखा जी धावली ती राम-लक्ष्मणांना मारण्यासाठीं चौदा हजार राक्षससैन्य घेऊन पंचवटीस आली. खर, दूषण आणि त्रिशिर हे तीन राक्षस त्यांत मुख्य होते. सिंहनाद करीत ते रामावर धांवले. घनघोर युद्ध झालें. धडाधड राक्षस कोसळूं लागले. थोड्याच वेळांत राक्षससैन्य खलास झालें. प्रलयकालीं एकलें एक परब्रह्म सगळ्या ब्रह्मांडाचा निरास करून जसें शिल्लक उरतें तसा श्रीराम त्या सर्व निशाचरांचा संहार करून एकटा एक उरला.

तें पाहून शूर्पणखा आक्रोश करीत लंकेंत गेली. सगळा वृत्तांत सांगून तिनें आधीं रावणाचा क्रोध जागृत केला आणि मग सीतेच्या सौंदर्याचें वर्णन करून त्याचा काम क्षोभविला. 'सीतेसारखी लावण्याची खाण जर तुला मिळाली नाहीं, तर तुझी सत्ता आणि वैभव हीं व्यर्थ आहेत, आणि तिचं जर तुला हरण करतां आलं नाहीं, तर तुझा पुरुषार्थ कुचकामाचा आहे,' अशी तिनें रावणाला भर दिली.

रावणाला तें भाषण झोंबलें. तो मारीच नांवाच्या आपल्या मामाजवळ गेला आणि त्यानें मृगरूप घेऊन राम-सीतेला भुलवण्यास त्याला सांगितलें. नंतर आपण काय करीन तेंहि त्यानें उघड केलें. मारीचाला ती गोष्ट मानवली नाहीं. त्यानें त्याला पुष्कळ बोध केला; पण रावणानें आपला आग्रह सोडला नाहीं. शेवटीं रावणाच्या प्रेमाखातर मारीचाला त्याचें म्हणणें ऐकावें लागलें. थोड्याच वेळांत तो मायामृग बनून पंचवटींत आला आणि रामाच्या आश्रमापुढें फिरूं लागला. त्याला पाहून सीता भुलली. ती रामाला म्हणाली—

"नाथ, हा हरिण किती सुंदर आहे! असा कधीं आजवर पाहिलाच नाहीं. तुम्ही याला मारून आणा. मी याच्या कातड्याची काचोळी करून अंगांत घालीन."

तिची उत्कट इच्छा पाहून राम धनुष्यबाण घेऊन बाहेर पडला. जातांना त्यानें लक्ष्मणाला बजावलें कीं, 'सीतेला सोडून कुठें जाऊं नको.' तो हरिण रामाला हुलकावण्या दाखवूं लागला. क्षणांत तो थांबे तर क्षणांत चौखूर उधळे. अशा रीतीनें रामाला त्यानें खूप दूर नेलें. शेवटीं रामाच्या बाणाला तो बळी पडला, पण मरतांना त्यानें एक कपट केलें. 'लक्ष्मणा धांव!' असा रामासारखा शब्द करून तो मेला. तो शब्द सीतेच्या कानीं गेला. ती घाबरली. आपला पति संकटांत आहे; त्याला सोडवण्यासाठीं जा,' म्हणून तिनें लक्ष्मणाला सांगितलें. लक्ष्मण म्हणाला कीं, 'वहिनी, घाबरूं नको. ही राक्षसांची माया आहे. राम संकटांत सांपडणं शक्य नाहीं.' लक्ष्मणाचें हें बोलणें सीतेला आवडलें नाहीं. ती त्याच्यावर खूप रागावली. त्याला नाहीं नाहीं तें बोलली. 'भाऊ मरावा आणि त्याची भार्या आपल्याला

मिळावी, अशी दुष्ट इच्छा तुझ्या मनांत आहे,' हे शब्दहि तिनें त्याला ऐकविले. लक्ष्मणाला अत्यंत दुःख झालें. त्याच्या जिव्हारीं घाव बसला. निरुपाय होऊन तो आश्रमांतून बाहेर पडला.

लक्ष्मणाची पाठ फिरली नाहीं तोंच रावण अतिथिवेषानें तिथें आला. कपट न ओळखून सीतेनें त्याचें स्वागत केलें. त्याला भिक्षा वाढण्यासाठीं फळेंमुळें घेऊन ती बाहेर आली. भिक्षा घालीत असतांच रावणानें आपलें खरें स्वरूप प्रगट करून तिला उचललें. सीता भयविव्हल झाली. रावण तिला म्हणाला कीं, 'मी तुला लंकेत नेऊन माझी भार्या करीन. तुला सुखांत ठेवीन.' तिला घेऊन तो वायुवेगानें लंकेकडे जाऊं लागला. सीता अगतिक होऊन आक्रोश करूं लागली.

## १९. सीतेचा आक्रोश

"धांव पाव गा ! श्रीरघुवीरा सवेग धांवें गा सौमित्रा
रावणें हरूनी भिक्षाद्वारां लंकापुरा मज नेतो १६९

केउता राम केउता रावण केउतें माझें दाराहरण
म्यां अभिशापिला लक्षुमण तें पाप पूर्ण मज फळलें १७०

सौमित्र निष्पाप हरिदास तो म्यां छळिला अतित्रास
आतां कायसी रामआस माझी निरास म्यां केली १७१

लक्ष्मण मज मानी जननी मी त्यासी म्हणे करिसी पत्नी
तेणें पापें फुटे अवनी महापापिणी मी एक १७२

जें पुढिलांसि करी छळण तेणें छळे छळ आपण
तें मज फळलें संपूर्ण जें केशाकर्षण रावणें १७३

छळवाद्याचें निजमुख श्रीराम न पाहे निःशेख
मज म्यां दिधलें अति दुःख ऐसी अधोमुखें विलपतु १७४

मी तंव श्रीरामाची दासी मजही गांजिलें राक्षसीं
आपलीं ब्रीदें सत्य करावयासी धांव धांवण्यास श्रीरामा १७५

लक्ष्मणा तुझे चरणीं माथा जरी तूं मानिसील माता
तरी माझ्या छळणोक्ति समस्ता क्षमा सर्वथा कराव्या १७६

लक्ष्मणा वेगें धांव पाव सवें घेवोनि श्रीराघव
रावणाचा हरूनि गर्व छेदी सर्व प्रतापें १७७

तूं कां मजवरी रुसलासी तुझे चरण झाडीन केशीं
थोर गांजिलें राक्षसीं कवणापासीं मी सांगों! १७८

छळोनि दवडिला दुरी तो कोप सांडोनि जिव्हारीं
ऐशिये आकांत अवसरीं पावें झडकरी सौमित्रा " १७९

**—एकनाथकृत भावार्थरामायण**

जानकीचा हा करुण विलाप ऐकून चराचर जीव रडले; पण रावणाला कांहीं तिची दया आली नाहीं. तो तिला घेऊन सारखा धांवतच होता. वाटेंत जटायु पक्षानें हा प्रकार पाहिला आणि त्यानें रावणावर झडप घातली. आपल्या चोंचीचे प्रहार करून त्यानें रावणाला रक्तबंबाळ केलें. तो त्याला सांगूं लागला, 'रावणा! सीतेला आधीं सोडून दे. नाहींतर प्राणास मुकशील. ब्रह्मकुळांत जन्मून असलें हीन कर्म तुला शोभत नाहीं.'

पण रावणानें त्याचें बोलणें न ऐकतां त्याच्यावर शरवर्षाव सुरू केला आणि शेवटी त्या वृद्ध पक्ष्याचे पंख उपटून टाकले. जटायु मरणोन्मुख अवस्थेंत भूमीवर पडला. रावण पुढें चालता झाला. सीतेला जटायुबद्दल फार वाईट वाटलें. पुढें जात असतां सीतेला मातंग पर्वतावर पांच वानर दिसले. त्यांना पाहून तिनें आपला पदर फाडला व अंगावरचे सर्व दागिने त्यांत बांधून ती परचुंडी त्यांच्यासमोर टाकून दिली.

रावण सीतेसह लंकेंत आला, आपली भार्या होण्याचें ती कबूल करीत नाहीं असें पाहून त्यानें तिला अशोकवनांत ठेवून दिली. त्रिजटा व इतर क्रूर राक्षसिणी यांचा तिच्याभोंवतीं पहारा ठेवला.

इकडे राम-लक्ष्मण आश्रमांत परत येतात तों त्यांना सीता कुठें दिसेना. दोघांनीं तिला रानभर शोधलें; पण पत्ता लागेना. 'सीते! सीते ऽऽ!' म्हणून

राम हांक मारूं लागला. 'माझी सीता तुम्हीं पाहिली आहे कां ?' म्हणून वृक्ष–पाषणांना कवटाळूं लागला. एवढा धैर्याचा महामेरु; पण सीतेसाठीं घळघळां रडूं लागला.

## २० रामाचा करुण विलाप

" आलय जाउनि पाहे तों सीता राघवासि भेटेना
त्या समयाहुनि दारुण मृत्यु, असें लक्ष्मणासि वाटेना १८०
रुचिराक्षी नाहीं कीं, वत्सा ! हें अन्य गेह वाटतसे
इतर स्थळासि आलों चुकती अनभिज्ञ लोक वाट तसे १८१
वत्सा ! मज जरि म्हणसी 'सीतेची हेच होय दलशाला[1]'
तरि मीच रामनामा नसेन; साध्वी दिसेल काशाला ? १८२
ते मजवांचुनि गेली नाहीं गोदावरी विहारातें
क्षण मद्विरहें तीतें युग होतो; भार भावी[2] हारातें १८३
ते प्रियतमा न हिंस्रें वधिली; नाहींच रक्त भूवरतें
नेलीच राक्षसानें म्हणोनि शोधी स्थल क्षमावर[3] तें १८४
'कोठें जनकसुते, तूं गेलीस धरासुते ! प्रिये, जाये !
न करीं विनोद; जाला व्याकूळ अत्यंत देह माझा ये १८५
तूं काय कोप धरिला अपूर्व मृग नाणिला म्हणून मनीं ?
तरि चंद्रमृगाहि आणुनि देइन, हें तूं असत्यसें न मनीं १८६
श्वशुराला परलोकीं गेलिस जरि तूं करावया नमना
पुसल्यावांचुनि कैसी सीते ! झालीस आज यानमना ? १८७
न्यावें मजही तेथें श्वशुराची प्रार्थना करून सती !
भरत करूं राज्यातें तुजवांचुनि वांचुनी सुखें नसती १८८

१ पर्णकुटी. २ मानिते. ३ पृथ्वीपति.

मज राजकन्यके तूं वरूनियां पावलीस न सुखातें
खातें हें चित्तातें; सांगों कोणास मी स्वदुःखातें! १८९
हा! कमलाक्षि, तनूदरि, सुंदरि, जाये, प्रिये, सये, सदये!
विधुमुखि, पिकगर्वापह, अमृताहुनि गोडसें स्वयें वद ये!" १९०

—मोरोपंतकृत मंत्ररामायण

सीता ही रामाची प्राणेश्वरी होती. दुसरें हृदय होती. तिच्यावांचून राम तळमळूं लागला. त्याला आश्रम ओस वाटूं लागला. दशदिशा उजाड झाल्या. सृष्टींतलें मांगल्य संपलें असें त्याला वाटलें. कोणतीहि वस्तु वा दृश्य त्याला सीतेचा विसर पाडूं शकेना. विरहानलानें त्याचें शरीर आणि मन तप्त झालें. ना आराम ना झोंप! लक्ष्मणानें त्याला परोपरीनें समजावलें, पण त्याचा आपला एकच प्रश्न, 'माझी सीता कुठें आहे?' लक्ष्मण सर्वभावें त्याची काळजी घेऊं लागला. पण त्याला कांहींच गोड वाटेना.

पौर्णिमेची रात्र होती. चांदणें टिपूर पडलें होतें. राम तृणशय्येवर आडवा झाला होता. लक्ष्मण त्याचे पाय चुरीत होता. एकाएकीं तो उठून बसला आणि लक्ष्मणाला बोलूं लागला—

## २१ श्रीरामाची विरहावस्था

"पौर्णिमा रात्रि शोभायमान   तृणशेजे रघुनंदन
करिता झाला सुखें शयन   पद संवाही सौमित्र १९१
चंद्रोदय मनोहर   चंद्रकिरण अतिसुकुमार
अंगीं लागतां श्रीरामचंद्र   उठोनि सत्वर गजबजिला १९२
श्रीराम म्हणे लक्षुमण   खडतर सूर्याचे किरण
मज बाधिती दारुण   बैसूं दोघेजण तरुतळीं १९३
तंव सौमित्रि म्हणे श्रीरघुनाथा रात्रीं कायेसी सूर्याची कथा
हा अमृतांशु चंद्र तत्त्वतां   निववी समस्तां निजकिरणीं १९४

जरी हें चंद्रबिंब निजचिन्हीं येकत्र देखतसों नयनीं
तरी मृगनयना चंद्रवदनी जनकनंदिनी ते कोठें ? १९५

सर्वेचि बोले आनआन चंद्रें मांडिलें द्वंद्व जाण
खडतर तावितात किरण तापलों पूर्ण सौमित्रा ! १९६

लक्ष्मणा सावध ऐकें आतां चंद्रमा दवडीं गा परता
न वचे तरी करनि घाता संतापता मज तावी १९७

लक्ष्मणा घालीं सीतळ वारा म्हणे द्वंद्वा पेटलासी सौमित्रा
मज हाणिसी वज्रधारा दशशिरा मीनलासी १९८

येथोनि उठ ! जाय परता करूं आलासि माझे घाता
ऐसा विरहज्वर श्रीरघुनाथा संतापता अति तावी " १९९

—एकनाथकृत भावार्थरामायण

नंतर राम–लक्ष्मण सीता शोधार्थ दक्षिण दिशेकडे निघाले. जातां जातां त्यांना जटायु विकल स्थितींत पडलेला आढळला. रामभेटीसाठींच तो कसाबसा जीव धरून राहिला होता. रामाला त्याची करूणा आली. ' रावणानें सीतेचें हरण केलें असून तो दक्षिण पंथानें गेला आहे ' एवढें सांगून त्यानें प्राण सोडला. त्यानंतर ते पंपा सरोवरावर आले. तिथलीं कमळें, भ्रमर, हंस, वेली वगैरे पाहून रामाला सीतेचें स्मरण झालें. तो म्हणतो—

## २२ सीतेची स्मृति

" पंपेची श्री पाहुनि राम म्हणे लक्ष्मणास ' कां मातें–
सीता टाकुनि गेली, स्नेहासह कामिनी सकामातें ! २००

या पुष्करापरीसहि, सीतेचें नेत्रयुग्म बहु रुचिर !
दैव तिजसीं मजसीं योग न राहूं दिला सख्या सुचिर ! २०१

मातें कमलमृणालें[1] विलोकितां स्मरति युवतिच्या सुभुजा
प्रणयक्रोधें मजला बद्ध करायासि सर्वथा विभु ज्या २०२
अलिपुंज देखतां मज सीतेचे केश लक्ष्मणा ! स्मरती
तत्केबरीसम[2] हे शिखिपिच्छकलाप[3] स्वमानसीं भरती २०३
मद्हृदय हंसपक्षी पीडिति गति–भाषणें करून वनीं
नवनीतकोमलांगी सीता दिसते मला मनोभवनीं ! २०४
वत्सा धरारुहांतें[4] वेष्टुनि वल्ली जशाचि आहेत
सीतालिंगित होतों ऐसा, परि तो न पूरला हेत २०५
वत्सा ! विमल जसें हें पंपाजळ यापरीस हृदय तिचें
यतिचें व्रत मज दिधलें तद्विरहें क्रौर्य सुसह न नियतिचें २०६
पुष्पव्रज[5] हा मातें स्मरमार्गणवृंदसाचि[6] जाचितसे
हा वायु विरहशिखिला दीप्त करुनि मत्तनूसि पाचितसे " २०७

**मोरोपंतकृत मंत्ररामायण**

तिथून पुढें ते शबरीच्या आश्रमाला आले. रामभेटीसाठीं तप करतां करतां ती म्हातारी झाली होती. रामाचा तिला ध्यास लागला होता. 'आज माझा रामराय येईल' म्हणून ती रोज आश्रमाभोंवतालच्या वाटा झाडीत असे. रानांत हिंडून त्याच्यासाठीं फळें आणून ठेवीत असे. तिचे मनोरथ पूर्ण होण्याचा सुदिन उगवला. रामरायाची सांवळी मूर्ति दुरून दिसतांच ती धांवत त्याला सामोरी गेली. पायावर लोटांगण घालून तिनें आपल्या केसांनीं प्रभूचे चरण झाडले. तिच्या क्षीण, जर्जर देहांत तो रामदर्शनाचा आनंद मावेना.

---

१ कमलाचे देंठ. २ केशपाश. ३ मोराचा पिसारा. ४ वृक्ष
५ पुष्पसमुदाय. ६ मदनाच्या बाणांचा समूह

## २३ शबरीचीं उष्टीं बोरें

" देखोनि डोळां हृदयाभिरामा
रामापुढें धांवतसे सुकामा
पुष्टांग झाली स्वसुखें भजाया
साष्टांग वंदी रघुराजपायां २०८

रामांघ्रि वंदुनि नमी न उठेच कांहीं
रामें करांबुजयुगें उचलोनि बाहीं
आलिंगिली स्वहृदयीं शबरी वरी ते
आनंदले अमर भाविति बावरी ते २०९

' बहू दीससी राघवा तूं भुकेला
तुवां पाहिजे बा फलाहार केला
तुझ्याकारणें म्यां फळें गोड रामा
अगा! आणिलीं सेवि सीताभिरामा ' २१०

सारीं क्षतांकित फळें निरखूनि डोळां
' कां हो अशीं? ' तिस पुसे रघुराज भोळा
चंचूपुटींचि बहु चोखिलिं पाखरांनीं
नेणों दिला प्रतिफळास नखांक रानीं २११

' चंचूक्षतें हीं नव्हतीं कृपाळा
मी कां तशीं आणिन हा कपाळा!
मी आपुल्या चावुनि शुद्ध दांतें
चाखूनि घे मीच करीं तुम्हांतें २१२

मधुरतर फळांची पूर्ण घेऊनि गोडी
मग मज रघुनाथा, ठेविता होय खोडी '

१ नखचिन्ह

निरखुनि रघुराजें भाव त्या भिल्लिणीचा
परम मनिं सुखावे नाथ तो जानकीचा २१३

भिल्लिच्या वनफळें मन धालें
लोकनायक म्हणे, 'सुख झालें!'
प्रेम रामहृदयीं बहु आलें
तोयबाष्प नयनांत निघालें! २१४

आनंदतनयकृत शबर्याख्यान

तृप्त झाल्यावर रामानें शबरीला आत्मज्ञान उपदेशिलें. ती कृतार्थ झाली. रामाचें श्रीमुख पाहत पाहत तिनें देह ठेवला. तिचा आत्मा कैवल्यपदीं आरूढ झाला.

म. ग्रं. सं. ठाणे
वा. क्र. ७३६०
वि. ...आ. वा.

# किष्किंधाकांड

★

पंपा सरोवराजवळ ऋष्यमूक नांवाचा पर्वत होता. त्याच्या शिखरावर या वेळीं सुग्रीव, हनुमंत इत्यादि वानर बसले होते. सरोवराच्या कांठीं राम-लक्ष्मण बसलेले त्यांनीं पाहिले. सुग्रीवाच्या मनांत त्यांच्याबद्दल संशय उत्पन्न झाला.वालीनें आपला घात करायला हे मारेकरी पाठवले असावे असें त्याला वाटलें. तो भ्याला. मारुतीनें त्याचें सात्वन केलें. ते कोण असावे याची चौकशी करण्यासाठीं तो सरोवरावर आला. मारुतीला त्याच्या आईनें एक खूण सांगितली होती कीं, 'तुझी गुप्त सुवर्ण–लंगोटी जो ओळखील तो तुझा स्वामी असें समज आणि त्याची सेवा कर.' रामरायानें मारुतीला पाहिल्याबरोबर ती खूण ओळखली. ज्याला आपण आजवर शोधीत होतों तो धनी आज भेटला म्हणून हनुमंताला आनंद झाला. पण रामाचें सुकुमार रूप पाहून त्याला त्याच्या सामर्थ्याची खात्री पटेना. आपला स्वामी आपल्यापेक्षां शक्तीनें आणि पराक्रमानें मोठा असला पाहिजे असें त्याला वाटत होतें. म्हणून त्यानें रामाची परीक्षा घ्यायचें ठरवलें.

एक मोठा वृक्ष उपटून त्यानें रामावर टाकला. पाठोपाठ एक शिळाहि उचलून आदळली. रामानें एकच बाण सोडून त्या वृक्षाचीं शकलें व शिळेचें पीठ केलें.तें पाहून मारुतीनें पर्वताचें शिखर मोडून रामावर फेकलें रामानें तें बाणाच्या पिसाऱ्यानेंच वाऱ्यावर उडवून दिलें. शेवटीं. राम हा असामान्य पराक्रमी आहे अशी खात्री होतांच हनुमंतानें धावत येऊन रामाचे चरण धरले.अंजलिसंपुट जोडून तो रामापुढें उभा राहिला. रामानें त्याला हृदयाशीं धरलें. अंतरींची खूण एकमेकांना पटली. दोघांनींहि. आपलें स्वामिसेवकपण धन्य मानलें. मारुति रामाला म्हणाला—

"स्वामी ! या ऋष्यमूक पर्वतावर सुग्रीव नांवाचा एक वानरराज आहे तूं जर त्याला अभय देत असशील तर तुझ्या दर्शनासाठीं मी त्याला इथें घेऊन येतों."

राम म्हणाला– "हा सुग्रीव कोण आणि त्याला अभय कशासाठीं पाहिजे तें आधीं मला सांग."

"सुग्रीव आणि वाली असे दोघेजण भाऊ आहेत. किष्किंधेचं राज्य हें त्यांचं. कांहीं कारणामुळें दोघांत वैर जुंपलं. वाली हा सुग्रीवापेक्षां बलवान् असल्यामुळें त्यानें सुग्रीवाची उमा नांवाची भार्या आपल्या घरांत घातली. सुग्रीवाचें त्याच्यापुढें कांहीं चालेना. त्यालाहि एक दिवस तो मारायला निघाला. तेव्हां प्राणभयानें सुग्रीव पळाला तो या पर्वतावर येऊन राहिला आहे."

हनुमंतानें सांगितलेली हकीगत ऐकून रामाला सुग्रीवाची दया आली. वालीला मारून सुग्रीवाला त्याची स्त्री आणि राज्य मिळवून देण्याचें त्यानें हनुमंताला वचन दिलें.

मारुतीला मोठा आनंद झाला. तो एकाच उड्डाणांत सुग्रीवाजवळ गेला. मारुति कार्य साधून आलेला पाहतांच सुग्रीवाचा हर्ष गगनांत मावेना. ते दोघे मग रामाच्या भेटीसाठीं पंपातीरीं आले. मारुतीनें सुग्रीवाचा हात रामाच्या हातांत दिला. अग्नीच्या साक्षीनें दोघांची मैत्री झाली. रामानें सुग्रीवाला आश्वासन देऊन शोकमुक्त केलें.

नंतर एके दिवशीं सुग्रीवानें वालीला युद्धाचें आव्हान दिलें. तो भुजा ऱ्हाटीत धांवून आला. दोघांचें युद्ध माजलें. पर्वतावर पर्वत आदळावा तसे दोघे एकमेकांना भिडले. धरणी कांपली. आकाश नांदावलें.

## २४ वालि–सुग्रीवांचें युद्ध

"नभा गाजवी वीर संग्रामघोषें
बळें क्षोभला वाळिवेताळ रोषें
करीं घेतले ताळ हिंताळ दोघीं
मही डोलवी शेष पाताळ भोगी २१५

त्वरें ताडिती मातले एकमेकां
तरू भंगले, धांवती देवलोका

उडाणीं नभोमंडपा झोक मारी
गिरीं झेलिले रश्मि तेजाळ धारी २१६

गिरागर्जनें झेलिती शैलभारें
करें दाविती भोवणें चक्रमारें
दिठीं लक्षिती भेदिती वर्म ठावो
शरा तिंबली, लागलें रक्त वाहों २१७

उरीं मस्तकीं मारिती वज्रमुष्टी
नभा गाजतां होत नक्षत्रवृष्टी
थरारे मही मेरु कैलास गाढा
तळीं सांवरी यज्ञवाराह दाढा २१८

लुमें पीटिती मेदिनी थोर हांवे
उठी दाटली अंबरा धूळि धांवे
शिळा लागतां भंगलीं देवयानें
जगीं तोचि हा तारकापात मानें २१९

नभीं देखतां तात स्नेहाळ दोघीं
तयां ताडितां भाव सापत्न संगीं
त्वरें पातला शक्र तेथूनि जाणा
रवी आतला रक्त लोहित बाणा २२०

सुरेशाचिया नंदनें चंडबाहीं
रवीनंदना ताडिलें घोरघायीं
महामूर्च्छनें आडवी रामपाया
उठी मागुता सन्मुखी होत घाया २२१

रमानाथ तो ईश देवेश राजा
म्हणे दांडगा वीर संग्रामकाजा

करूं खंड तों आजिपासून याचें
वदे सायका मारणी मंत्र वाचे २२२

न साहेचि त्या वाळिदर्दूरदर्पा
त्वरें धांवणें बाण निर्वाण सर्पा
उरीं लागतां भेदलें वज्र जैसें
पडे पर्वती वानरी देह तैसें

शरें मारितां मांडला मृत्यु प्राणीं
धरामंडळीं धूळिपंकीं उताणी
दिठीं लक्षिला राम तो काळकोपी
म्हणे ' वीर रे ! धन्य चंडप्रतापी ! " २२४

**–मुक्तेश्वरकृत रामायण**

श्रीराम एका वृक्षाच्या आड उभा राहून वालि–सुग्रीवांचें युद्ध पाहत होता. दोघेहि बराच काळ उसण्या घायीं झुंजले. पण शेवटीं वालीचा वजरभार असह्य होऊन सुग्रीव धरणीवर पडला. त्यानें साह्यासाठीं श्रीरामाचा धांवा मांडला. सुग्रीवाची ती करुण दशा पाहून रामानें धनुष्याला बाण जोडला व तो वालीवर सोडला. एकाच बाणानें काम झालें. वालीचें हृदय फुटून तो खालीं कोसळला. राम त्याच्याजवळ जातांच वाली त्याला म्हणाला—

" देवाधिदेवा ! मजवर आडून बाण टाकून अपकीर्ती कां वरं जोडलीस? या कर्मानं तुझं यश मालिन झालं."

अंतकाळीं रामदर्शन झाल्याबद्दल त्याला धन्यता वाटली. त्याच्या अंतरांतला वैरभाव नष्ट झाला. आपल्या गळ्यांतली विजयमाला सुग्रीवाच्या गळ्यांत घालून त्यानें त्याला जवळ केलें. आपला पुत्र अंगद सुग्रीवाच्या हातीं निरवला आणि रामरूप डोळ्यांवाटे हृदयीं सांठवून त्यानें इहलोकाचा त्याग केला.

त्या प्रसंगानें सर्वांच्याच भावना हालल्या. सुग्रीवाला रडूं कोसळलें. इतक्यांत वालीची भार्या तारा तिथें येऊन आक्रोश करूं लागली. पतीच्या प्रेताला

कवटाळून तिनें दीर्घ रुदन माडलें. ' रामा ! कसा रे माझ्या पतीचा घात केलास ? मी आतां हें वैधव्यदुःख कसं सोसूं ? देवा, आणखी एक बाण काढ आणि माझ्याहि हृदयाचं विधान कर. पतीच्या पाठोपाठ सतीलाहि जाऊं दे ! '

तिचा हा विलाप रामाला ऐकवेना. तिचें अज्ञान आणि तज्जन्य शोक-मोह दूर व्हावे म्हणून रामरायानें मग तिला आत्मज्ञानाचा उपदेश केला. जगाची नश्वरता आणि आत्म्याचें अमरत्व तिला समजावून सांगितलें.

## २५ रामाचा तारेस उपदेश

" तारे ऐक सावधानेंसी तूं काय देहातें पति मानिसी
अथवा जीवा पति म्हणसी तें मजपासीं शुद्ध सांगें २२५

देहासि सत्य पति मानिसी तरी तो आहे तुजपाशीं
सिद्ध असतां शोक कां करिसी अति उल्हासीं भोगावया २२६

पति मानिसी जरी जीवासी तरी त्वां देखीलें नाहीं त्यासी
गेला गेला केवि म्हणसि व्यर्थ रांडवलीसि मूर्खत्वें २२७

जीवासी नाहीं मरणें जिणें जीवासि नाहीं खाणें भोगणें
जीवासि नाहीं येणें जाणें गेला म्हणणें अतिमिथ्या २२८

जीव चिदानंद चैतन्य घन सर्वीं सर्वत्र परिपूर्ण
त्यासि नाहीं गमनागमन वृथा रुदन कां करिसी ? २२९

घटा घड मोडी बहुवस घडमोड नेणे घटाकाश
तेविं देहासि होतां नाश जिव अविनाश नित्यत्वें २३०

घटीं भरिल्या घृतमद्यासी तो लेपु नलगे घटकाशीं
तेविं देहाच्या पापपुण्यासी आत्मप्रकाशीं रिघु नाहीं २३१

आत्मा परिपूर्ण सदोदित कर्मधर्माविरहित
सुखदुःखासी अलिप्त तूं कां व्यर्थ विलापसी २३२

देह तंव जड काष्ठप्राय त्यासी सुखदु:ख संबंधु न होय
आत्मा चैतन्यघन सबाह्य तेथें न समाय सुखदु:ख " २३३

" सुखदु:खाचा हा मारा कोणासि बाधी श्री राम चंद्रा ?
याचा उकलु सांगावा खरा दु:खापरपारा पावावया " २३४

ऐकोनि तारेचा प्रश्नु स्वयें सांगे श्रीरघुनंदनु
" जंव देही देहाभिमानु दु:खबंधन अविवेक्या २३५

देहीं सबाह्य चैतन्यघन तेथें मिथ्या भासे देहाभिमान
जेविं दोराआंगीं सर्पपण तेविं संपूर्ण देह मिथ्या २३६

जन्ममरण देहसंभ्रम क्षुधातृषा प्राणधर्म
विषयाचे भोग परम इंद्रियकर्म इंद्रियांचें २३७

सुखदु:खभयशोक मनोधर्म हे आवश्यक
हरिहरब्रह्मा त्रिगुणात्मक काल्पनिक संसारु २३८

आत्मा गुणीं गुणातीत देहीं देहबाधा अलिप्त
तोहि विषयाचा दृष्टांत सुनिश्चित अवधारीं २३९

स्फटिक कृष्णवर्णें काळा पीतवर्णें दिसे पिवळा
आरक्तें दिसे आरक्त किळा तरी वेगळा तिहीं रंगीं २४०

तेविं आत्मा संसारांतु त्रिगुणगुणीं गुणातीतु
ऐसा जोडला परमार्थु होय प्रांतु दु:खसुखा २४१

ऐसी व्हावया निजप्राप्ती अवश्य पाहिजे सत्संगती
त्यांचेनि संगें विषयविरक्ती तैं परमार्थीं अधिकारु २४२

शद्ध छेदी विकल्प समस्त परमानंदें नित्यतृप्त
तैसिया गुरुपासी परमार्थ सुनिश्चितार्थ साधावा " २४३

[2]एकनाथकृत भावार्थ रामायण

हा उपदेश ऐकून तारेचा शोक हरला. तिनें रामाचे चरण धरले. नंतर सुग्रीवाला राज्याभिषेक झाला. अंगदाला युवराज केलें. सीतेचा शोध करण्यासाठीं सुग्रीवानें वानरांना चारी दिशांना पाठवलें. अंगद, हनुमंत, नळ, नीळ इत्यादि वानर दक्षिण दिशेला गेले. वाटेंत त्यांना एक मोठें अरण्य लागलें. त्यांतून पुढें जातां येईना. ते भुकेनें व्याकूळ झाले; पण एकहि फळ कुठें दिसेना. पुढें ते एका विवरांत शिरले. बरेंच आंत गेल्यावर त्यांना एक सुंदर उपवन दिसलें. तिथें सुप्रभा नांवाची एक यक्षिणी होती. तिनें त्यांना खूप फळें खायला देऊन तृप्त केलें, आणि सागराच्या तीरीं आणून सोडलें.

तो अपार सागर तरून लंकेंत कसें जायचें ही वानरांना काळजी पडली. सीतेचा शोध लावल्यावांचून परत जाणें हेंहि त्यांना बरें वाटेना. शेवटीं मारुती या कामासाठीं सिद्ध झाला. त्यानें एकवार रामस्मरण केलें. सर्व वानरांना तिथेंच बसून राहायला सांगितलें आणि बुभु:कार करून उड्डाण मारलें.

# सुंदरकांड

★

हनुमंताच्या उड्डाणासरशीं प्रचंड वारा सुटला. वृक्ष उन्मळून आकाशांत भिरभिरूं लागले. पर्वत चळचळां कांपले. मेरुमांदार डळमळलें. समुद्रजळ उचंबळलें. सप्तपाताळ हेलावलें. सप्तस्वर्ग हादरले. इंद्र हृदयीं दचकला. पार्वतीनें शिवाच्या गळ्याला मिठी घातली. पंखांचा पर्वत उडावा तसा मारुति अंतराळांत झेंपावत होता. खालीं अगाध पाणी आणि वर अनंत आकाश. इतक्यांत मैनाक पर्वत समुद्रांतून वर आला. मारुतीनें पदाघातानें त्याला खालीं दडपलें. त्यानंतर सिंहिका राक्षसी मुख पसरून त्याला आडवी आली. मारुतीची उडी नेमकी तिच्या तोंडांत पडली. तिनें त्याला मट्ट केलें; पण मारुति तिचें पोट फोडून बाहेर पडला.

सगळीं विघ्नें निवारून मारुति लंकेंत येऊन पोंचला. सीतेचा शोध करीत तो सगळीकडे हिंडूं लागला. रावण-कुंभकर्णाच्या महालांत गुप्तरूपानें गेला. बिभीषणाच्याहि घरांत शिरला. राणीवशांतहि त्यानें प्रवेश मिळविला. पण सीता कुठें दिसेना. लंकेंतलीं ब्राह्मणांचीं घरें पाहिलीं. वाणी-उदमी, सोनार-कासार, तेली-तांबोळी, गणक-गायक या सगळ्यांच्या घरांत तो धुंडून आला. पण सीतेचा पत्ता लागेना. तो निराश झाला. त्याला वाटलें कीं, रावणानें सीतेची हत्या केली असावी. तो दुःखानें गडबडां लोळूं लागला. त्याचे डोळे पाण्यानें भरले. फुकट आपण समुद्र ओलांडून आलों असें त्याला वाटलें.

होतां होतां त्याचा क्रोध खवळला. सीता सांपडली नाहीं तर या लंकेचा विध्वंस करीन, असें म्हणून तो उठला. ताबडतोब एका गोपुरावर उड्डाण करून त्यानें तें खालीं कोसळलें. मोठमोठाले वाडे धडाधड पडूं लागले. लोक चेंगरून मरूं लागले. राक्षसांचीं पोरें तो आकाशांत भिरकावून देऊं लागला. नगरांत एकच कोल्हाळ माजला. पळापळ सुरू झाली. फजितीला पारावर उरला नाहीं.

## २६ लंकेची दाणादाण

" सजल कलश माथां चालती लोकवाळी
उपटत महिपृष्ठीं गुंतल्या वाळजाळीं
धरुनि बटुक बाळें, व्योमवाटा झुगारी
पिटिति वदन पोटें, मांडिली गुप्त मारी　२४४

गज रथ खर वाजी दिव्य मानुष्य यांनीं
सधन सुखविलासीं बैसले राजमानीं
नकळत कपिपुच्छें पाय गोवूनि वोढी
उलथुनि वरि लातें कर्दमामाजि पाडी　२४५

पुरुष-वधु निगूढीं नग्न निद्रिस्त भावी
न करित परि जागीं चोहटां शेज ठेवी
गज रथ वरि लोटी एकमेकांवरौते
परम सुखचि मानी मांडल्या झूज त्यांतें　२४६

धनें मांदुसा राजभांडार वस्तु
बिदी पातल्या भंगल्या कोण हेतु ?
त्वरें पूशिलें राक्षसां लंकनाथें
तयां नेणवे जें किजे रामदूतें　२४७

गळा गोवितां चांचरे छत्रधारी;
पडे पाठिसी नावरे झोक मारी
करें भेदिजे राजगुह्यांग दंडें
फिरे क्षोभला दंड माझारि खंडें　२४८

सुखें सारितां श्मश्रुकमार्गं चाडें
वळें चाचरी भादरी अर्धखांडें

त्वरें ताडितां नापिका लंकनाथें
फुटे शीर तें निष्ठुरा वज्रघातें २४९

पिटी पुच्छ गर्जे भरे मध्यराती
पुरीवासियां आदकें प्राण जाती
सिताशुद्धि साधावया रामभृत्यु
असे पातला रावणा कालमृत्यु २५०

रवी अस्तमाना सभे लंकनाथ
निवेदीतसे दूत अद्भूत मात
परी होतसे थोर आकांत लोकां
पिडाकारकू नेणवे कोण तो कां २५१

प्रभू क्षोभला मारवी सांगत्यातें
कपी पाठिसी धूमसी मारि त्यातें
पिटी दीप्त वाळानिळें तेज धाडी
भरी अंधकारीं करी वीरझोडी २५२

बळें ताडितां आदटें आड मोडी
हहाकार मारें करी शंख तोंडीं
करीं शद्व त्याचें करीं वक्त्र फोडी
मळें घोळिले दीन तात्काळ सोडी २५३

चिरें फोडिलीं तोडिल्या कंठमाळा
शिरोभूषणें भंगिलीं एककाळा
बळा दाविजे, वारिजे वीर वाटे
दिवा दावितां राजया लाज वाटे" २५४

—मुक्तेश्वरकृत रामायण

लंकेची अशी पडझड चालली होती. नानाप्रकारचे अद्‌भुत चमत्कार होत होते. लोकक्षोभ माजला होता. पण ही सगळी नासधूस करतो कोण, हें मात्र कोणाला कळत नव्हतें. या सर्व गोष्टी पाहून आणि ऐकून रावण उद्विग्न झाला आणि मंदोदरीच्या महालांत गेला. मारुति गुप्तरूपानें त्याच्या पाठोपाठ होताच. त्या दोघांच्या संभाषणांत मारुतीला कळलें कीं, सीता अशोकवनांत आहे.

ताबडतोब तो तिथून अशोकवनांत आला. तिथें सीता एका अशोक-वृक्षाखालीं बसली होती. तिच्याभोंवतीं अक्राळविक्राळ आणि घाणेरड्या अशा राक्षसींचा वेढा होता. सीता यावेळीं ध्यानस्थ होती. ती रामरूपीं रंगून राहिली होती. तिची काया अति कृश झाली होती. मुखावर मात्र पातिव्रत्याचें सात्विक तेज झळकत होतें. मधून मधून ती 'श्रीराम! रघुपते!' असे उद्‌गार काढी. त्यावेळीं तिच्या उच्छ्‌वासाचा सुगंध आसमंतीं पसरे. तिनें 'राम' असा शब्द उच्चारला कीं तोच ध्वनि वृक्ष-पाषाणांतून उमटे. तिला पाहतांच मारुतीची खात्री झाली कीं, हीच सीता.

त्याला अपार हर्ष झाला तो नाचूं, उड्या मारूं लागला. आपण लंकेंत आल्याचें सार्थक झालें असें त्याला वाटलें. हळूच पुढें होऊन त्यानें सीतेपुढें दंडवत घातलें. लगेच उठून ती खुणेची मुद्रिका तिच्या हातांत टाकली. ती मुद्रिका रामरायाच्या बोटांतली आहे हें तिनें ओळखलें. मुद्रिका नव्हे– परब्रह्म हातीं आल्यासारखें तिला वाटलें. एका क्षणांत सर्व क्लेश विसरून ती आनंद सागरांत पोहूं लागली. तिनें त्या मुद्रिकेला हृदयाशीं धरलें, मस्तकावर ठेवलें आणि आपल्या अंगुलींत घालून सजल नेत्रांनीं निरखून पाहिलें. त्या मुद्रिकेशींच ती हितगुज करूं लागली.

## २७ सीतेचें मुद्रिकेशीं हितगूज

" मुद्रिका शोभे करीं     श्रीरामनाम मुद्रिकेवरी
श्रीराम मुद्रिके सबाह्य अंतरीं     सीता सुंदरी स्वयें देखे     २५५
देखतांचि चमत्कार जाहला     स्वयें श्रीरामचि आला
ऐसा सितेसी भाव गमला     सरसावला अंचळू     २५६

श्रीराम आला एकाएकीं लाजे जाहाली अधोमुखी
सर्वांगें हर्षली जानकी सुखोन्मुखी डुल्लत २५७

मुद्रिका वंदिली निढळीं मग आलिंगिली हृदयकमळीं
स्वानंदें चुंबी जनकबाळी 'सुखें वेल्हाळी आलीसी ? २५८

तूं माझी सखी श्रीराममुद्रा घालूं सेजे, करीं निद्रा
श्रमलीस उतरतां समुद्रा आणि गिरिवरा उल्लंघितां' २५९

न म्हणे अचेतन सचेतन प्रेमपूर्ण सीता संपूर्ण
तेणें हनुमंतासी आलें रुदन करी स्फुंदन वृक्षाआड २६०

मुद्रिका देखोनि दृष्टी अत्यानंद मानी गोरटी
सीता पुसे सप्रेम गोष्टी अवस्था पोटीं जे वर्ते २६१

कुशल असतां राम-लक्ष्मण माझी कां न करिती सोडवण
करावया नाहीं आंगवण दुर्धर बाण असोनी ? २६२

मुद्रिके ! तूं सांगें गोष्टी रावणें मातें हरिल्यापाठीं
दोघे येवोनी पंचवटीं अतिसंकटी काय केलें ? २६३

विजनीं मूर्च्छित पडिले ? कीं वृकव्याघ्रीं फाडिले ?
किंवा सिंहें विभांडिले कीं रगडिले वनगजीं २६४

ते तों महावीर निधडे सिंहव्याघ्र काय बापुडे
शार्दूल पळती तयांपुढें केलें कुडें रावणें २६५

रावणें छळोनि केलें घाता स्नानतर्पण संपादितां
अथवा फळमूळ भाक्षितां दोघे निद्रिस्तां मारिलें ? २६६

माझेनि दुःखशोकें जाणा स्वयें रामें सांडिलें प्राणा ?
येरव्हीं निवटोनि रावणा माझें सोडवणा येतां कीं ! २६७

मुद्रिके ! सत्य सांगें मजपाशीं श्रीराम तरी जाहला संन्यासी ?
अथवा पहुडला समाधिशेजेसी किंवा देहासी त्यागिलें ? २६८

मुद्रिके ! मौनाचें लक्षण निमाले राम-लक्ष्मण ?
हेंचि तुझें मौनवचन अतिसावधान निजमौनें २६९

मुद्रिके ! तुज कैसें चालविलें वाटा कैसोनि उल्लंघविलें घाटा ?
समुद्र तरोनि दुस्तर मोठा कैसेनि परतटीं आलीस? २७०

मज संबोखावया येथें तुज काय धाडिलें श्रीरघुनाथें ?
ऐसें बोलत बोलत तेथें पडे मूर्च्छित जानकी " २७१

—एकनाथकृत भावार्थरामायण

नंतर सीतेनें मारुतीची चौकशी केली. तूं कोण, कोणाचा व हा अपार सागर उल्लंघून कसा आलास वगैरे प्रश्न केले. राम-लक्ष्मणांचें कुशल पुसलें. मारुतीनें आपण रामदूत असल्याचें तिला सांगितलें.

"श्रीरामाच्या आज्ञेवरून मी तुझ्या शोधासाठीं आलों. त्याच्याच कृपेनें सागर ओलांडला. लक्ष्मण तुझी वारंवार आठवण काढतो. राम तुझ्यासाठीं अतिशय तळमळतो. मी आतां परत जाईन, रामाला सगळें वर्तमान सांगेन, मग राम वानर सैन्यासह लंकेंत येईल आणि रावणाला मारून तुला सोडवील. माते! तूं चिंता करूं नकोस."

मारुतीचें हें बोलणें ऐकून सीतेला धीर आला. तिनें मारुतीला थोडा वेळ विश्रांति घ्यायला सांगितलें. पण त्याला लागली होती भूक. त्यानें सीतेला विचारलें कीं, 'या बागेंतलीं फळें मी खाऊं का?' सीता म्हणाली कीं, 'खालीं पडलेलीं असतील तेवढींच खा.' त्यावर 'आज्ञा प्रमाण' म्हणून मारुतीनें उड्डाण मारलें. एक झाड उपटून दुसऱ्या झाडावर मारायचें आणि खालीं पडतील तीं फळें खायचीं असा त्यानें सपाटा सुरू केला. थोड्याच वेळांत बागेंतल्या अर्ध्याअधिक झाडांचा निकाल लागला. रक्षक त्याच्या अंगावर धांवून आले. मारुतीनें आपल्या शेपटाचा विळखा घालून त्यांचा भारा बांधला आणि जमिनीवर आपटला. त्यांचा असा जीव घेऊन प्रेतें समुद्रांत फेकून दिलीं. ही बातमी रावणाला कळली. तो क्रुद्ध झाला. त्यानें मारुतीला पकडण्यासाठीं हजारों राक्षस पाठवले; पण त्यांतला एकहि परत

आला नाहीं. अक्ष नांवाचा रावणाचा मुलगा मारुतीला पकडून आणण्याची प्रतिज्ञा करून निघाला. पण त्याचीही गत तीच झाली. रावणाला पुत्रशोक झाला. त्या प्रकारानें रावणाचा जेष्ठ पुत्र इंद्रजित चिडला आणि मारुतीवर चाल करून गेला. त्यालाहि मारुतीनें लोळवलें. इंद्रजित पळाला आणि एका गुहेंत लपून बसला. शेवटीं ब्रह्मदेवाला पुढें करून रावणानें मारुतीस पकडलें. समोर उभा करून रावण त्याला रागानें म्हणाला—

## २८ लंकादहन

" अरे मर्कटा थोर अन्याय केला
म्हणे रावणू मारितों सीघ्र तूला
तुझा मृत्यु कोठें खरें सांग आतां
मुढा! कश्मळा मारितों जातजातां २७२

म्हणे मारुती 'काळ मारूं शकेना
कृपाळूपणें तोषला रामराणा'
न वाटे खरें सांगतां रावणाला
म्हणे, वानरूलांगुळीं आग्नि घाला २७३

म्हणे, रावणू पाहतां काय आतां
चिरे आणवा सांगताहे समस्तां
असंभाव्य ते वीर धावोनि गेले
त्रिकुटाचळीं लोक ते नग्न केले २७४

पुढें पुच्छ ओढूनि गुंडाळितातीं
सिमा सांडिली वीर वेंटाळितातीं
तया वोढितां तें असंभाव्य लांबे
विरेंवीर त्या लांगुळालागिं झोंबे २७५

किती येक तें आणिलीं अज्य तेलें
किती येक तें मोगरेलें फुलेलें
महापुच्छ तें सर्वही भीजवीलें
पहा हो ! कपी वापुडें वेर्थ मेलें! २७६

तया लावितां वन्हि तेथें न लागे
बळें फुंकितां तो विरेंवीर भागे
तया देखतां रावणू सीघ्र आला
बळें फुंकितां फुंकितां तो गळाला २७७

पुढें रावणू थोर कोपें कडाडी
बळें फुंकितां ज्वाळ नेटें भडाडी
जळालीं मुखें भस्मल्या खाडमीषा
बहूसाल लंबीत होत्या विशेषा २७८

बळें चेतला वन्हि नेटें भडाडी
कडाडीत ज्वाळा दडाडी धडाडी
कपी वीर तो वाड जाला उडाला
पुढें जाळितां जाहला त्रीकुटाला २७९

गृहांगोपुरांमाजि तो पुच्छ घाली
त्रिकूटाचळीं आगि नेटें निघाली
विदी हाट बाजार चौबार कुंचे
पळे, बोंबली, नागिवा लोक नाचे २८०

बहुतांपरींची बहू हाक जाली
' पळारे पळारे ! पळा आगि आली ! '

१ लंका

गुरें, वासुरें, सिंगुरें, लेंकुरें तें
सुणीं, मार्जरें, तें खरें, येशरें तें २८१

बहुतांपरींचीं बहू रम्य यानें
बहूसाल छेत्रें विचित्रें निशाणें
बहूतांपरींच्या बहूसाल शाळा
जळाल्या विवीधा विचित्रा विशाळा २८२

पळे लोक तेथें बळें पुच्छ घाली
बहूतां विरांची बहू शांति जाली
महा पुच्छ तें ज्वाळबंभाळ झाला
बहू साक्षपें वन्हि तो चेतवीला २८३

महावज्र लांगूळ कल्लोळ जाला
परी पाहतां रोम नाहीं जळाला
गदादीत काया समुद्रांत घाली
निवाला कपी पुच्छज्वाळा विझाली २८४

समुद्रीं शुचिष्मंत होऊनि आला
नमस्कार घाली तये जानकीला ”

—श्रीरामदासकृत रामायण

अशा प्रकारें लंकादहन करून मारुति सीतेकडे गेला व तिचा निरोप घेऊन परत रामापाशीं आला त्याच्या कार्याची रामरायानें प्रशंसा केली. आतां लंकेवर स्वारी करायची असें सुग्रीवाला सांगितलें सुग्रीवानें आपलें वानरसैन्य एकत्र केलें. लंकेच्या रोखानें रामासह सुग्रीवाचा दळभार निघाला. समुद्रतीरावर येऊन सर्वांनीं मुक्काम केला. आतां समुद्र कसा उल्लंघायचा आणि सैन्य लंकेंत कसें उतरावयाचें हा रामाला प्रश्न पडला.

लंकेवर स्वारी करण्यासाठीं राम ससैन्य सागरतीरीं येऊन थडकला आहे, ही बातमी रावणाला समजली. त्यानें आपल्या प्रधानांची आणि सेनापतींची एक सभा भरविली राम आला तर पुढें काय करायचें या प्रश्नांवर खल सुरू झाला. रावण मनांतून भ्याला होता. त्याला पुढील भविष्याचीं स्वप्नें पडत होतीं. सीतेला पळवून आणल्याचें पाप त्याच्या मनाला खात होतें. धैर्याचा, पराक्रमाचा हिमाचल तो; पण आंतून पोखरला होता. आपल्या प्रधानांकडून आणि आपल्या वीरांकडून त्याला उत्तेजन हवें होतें. राक्षसांनीं तें त्याला दिलें.

प्रत्येकजण रावणासमोर बढाया मारूं लागला. कोणीं रामाची निंदा केली, कोणी त्याच्या वानरसैन्यांचा उपहास केला. तर कोणीं 'राम म्हणजे माणसाचं पोर, त्याला काय एवढें भ्यायचें आहे, ' म्हणून उपेक्षाहि दाखविली. 'रामाला आणि त्याच्या माकडांना आम्ही हां हां म्हणतां मारूं आणि समुद्रांत फेकून देऊं ' असें सगळयांनींच सांगितलें. विरुद्ध बोलला तो एकटा बिभीषण. त्यानें मात्र स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, सीतेला परत पाठव, रामाला शरण जा आणि लंकेचा सर्वनाश थांबव ! '

रावणाला अर्थात् तें भाषण रुचलें नाहीं. त्यानें त्याला फितूर म्हटलें. तूं माझा भाऊ नसून वैरी आहेस, तुझी मला गरज नाहीं, ' असेंहि त्याला सांगितलें.

बिभीषणानें 'ठीक आहे ' म्हटलें व आपल्या चार प्रधानांसह तो तिथून निघाला आणि सरळ रामाला येऊन मिळाला. रामाच्या सैन्यतळावर येऊन तो जेव्हां तिथल्या लोकांना ' रामाची भेट करवा ' असें सांगू लागला तेव्हां सुग्रवादि वानरांना त्याच्याबद्दल शंका आली. त्यांनीं रामाला तसें जाणवलें पण अंतरसाक्षी रामाला बिभीषणाचा सद्भाव कळून आला. मारुतीनेंहि त्याच्याबद्दल निर्वाळा दिला. तेव्हां त्यांनीं त्याला रामापुढें नेलें. रामानें त्याचें स्वागत करून लंकेंतली सर्व हकीगत विचारून घेतली आणि त्याला लंकेचें राज्य त्याच वेळीं देऊन टाकलें. त्या समुद्राच्या विस्तीर्ण वाळवंटांत लक्ष्मणाच्या हस्तें बिभीषणाला लंकाधिपति म्हणून राज्याभिषेक झाला.

## २९ बिभीषणावर अनुग्रह

“ उभें राहिलें भाग्य बीभीषणाचें
करी अंतरीं ध्यान पादांबुजाचें
भिजे दिव्य सर्वांग त्या अश्रुबिंदीं
मिठी घातली रामपादारविंदीं २८५

कृपासागरें ठेवितां हस्त माथां
चिरंजीव लंकापती होये आतां
मधूरा गिरा राघवें ऊठवीला
पुढें तिष्ठतू हात जोडूनि ठेला २८६

बहू स्तूति केली रघुनायेकाची
करी आदिनारायणाची विरंची
तयाचेपरी शब्द कारुण्य बोले
पुढें पाउलें लक्षितां अश्रु आले २८७

म्हणे राम ‘ बीभीषणा बैस आतां
पुरे स्तूति सांडीं, तजीं सर्वचिंता ’
सुमित्रासुतालागिं संकेत केला.
दिजे मंगलस्नान बीभीषणाला २८८

त्वरें ऊठिला बंधु त्या राघवाचा
घटू आणिला पूर्ण सिंधोदकाचा
पुढें सीघ्र बीभीषणालागिं शेषें
विशेषें दिलें सौख्य राज्याभिशेषें २८९

म्हणे राम बीभीषणा सत्य वाचा
प्रतापें वधू कालिया वैरियांचा

---

१ टाक.

तुज दीधलें राज्य लंकापुरीचें
चळेना चिरंजीव जैसें ध्रुवाचें २९१

वरू दीधला रामचंद्रें दयाळें
कृपासागरें दासपाळें भुपाळें
प्रसंगीं तये थोर आनंद झाला
दिलें अक्षयी राज्य बीभीषणाला

–श्री रामदासकृत रामायण

नंतर श्रीराम समुद्राची प्रार्थना करण्यासाठीं एका दर्भासनावर बसून उपवास करूं लागला. तीन दिवस झाले तरी समुद्र दाद घेईना. तेव्हां रामाला क्रोध आला आणि तो समुद्राला शासन करण्यासाठीं उद्युक्त झाला. रामाच्या बाणानें आपलें सगळें पाणी आटून जाईल या भयानें समुद्र देहधारी होऊन रामाला शरण आला. 'हे राघवा, तूं माझ्यावर सेतु रचून पैलपार जा. यायोगें तुझी कीर्ति त्रिलोकीं अजरामर होईल.' सागरानें रामाला सांगितलें व तो गुप्त झाला.

रामानें वानरांना सेतु बांधण्याची आज्ञा केली. वानर मोठमोठ्या शिळा आणि पर्वतशिखरें आणून टाकूं लागले. नल नांवाच्या वानरानें सेतूची रचना केली. थोड्याच दिवसांत शंभर योजनें लांबीचा सेतु बांधून तयार झाला.

## ३० सेतुबंध

" शतयोजन आयत, दशयोजन विस्तीर्ण सेतु, शंकेतें
दे, गेला बुडवाया कोपाकुल भूमिवाह्[1] लंकेतें २९२
किंवा तो कपिकटकोत्तरसिंधूद्गत बुभुक्षु कालाही
दूर पसरला खाया रात्रिचरां क्षुद्र बेडकांला ही २९३

१ काळसर्प.

सेतु न तो यत्पतिनें लघुता नेली, वृकें जशी एणी
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी २९४
रामजयश्री लग्नीं लंका घाली सुनील पाटावें
सेना वऱ्हाडणीला पायघडी कां असें न वाटावें ? २९५
बहुधा तुच्छ जलधितृण चाटायाचा धरूनियां वीट
गेला प्रभुप्रतापासितपथ रक्षोटवीकडे नीट २९६
कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्याकडे रडत वाटे
आली जी लंकाश्री तीचा तो सांजनाश्रुपथ वाटे २९७
कीं चिरलें स्वापयशें शोकानलदग्ध सागरोरचि तें
सूचविले तर्क असे त्या सेतुवरें महासुधीरचितें " २९८

**—मोरोपंतकृत मंत्ररामायण**

सेतु तयार होतांच वानरसैन्य सुरक्षितपणें लंकेत उतरलें.

---

१ रामप्रतापरूप अग्नि·

# युद्धकांड

★

श्रीराम दळभारासह लंकेच्या वेशीवर येऊन थडकला. रावणाला ही बातमी समजली. उंच गोपुरावर चढ्न त्यानें तें अफाट वानरसैन्य पाहिलें. त्यानें प्रधानमंडळीला एकत्र करून युद्धाची तयारी सुरू केली. युद्ध सुरू करण्यापूर्वी रामानें अंगदाला रावणाकडे शिष्टाईसाठीं पाठवलें.

अंगद एकच उड्डाण मारून रावणाच्या राजसभेंत उतरला. सूर्यासारखें त्याचें तेज पाहून राक्षसवीर चपापले. अंगदानें एकवार सभेंत चौफेर दृष्टि टाकली. "अरे मला तुम्ही कोणीच 'या बसा' म्हणत नाहीं. तुमच्या राज्यांत शिष्टाचार म्हणतात तो नाहींच वाटतं? बरं आहे. आतां माझी व्यवस्था मलाच करून घेतली पाहिजे."

असें म्हणून त्यानें आपल्या शेपटाचे वेंटाळें केलें आणि त्यावर तो आरूढ झाला. रावणाच्या सिंहासनापेक्षां सुद्धां अंगदाचें पुच्छासन अधिक उंच झालें. रावणाला उद्देशून तो बृहस्पतीसारखा बोलूं लागला—

## ३१ अंगद शिष्टाई

"हे रात्रिंचर राजा! रामाचा दूत अंगदाभिध मी
कोणी मला पुसाना 'कोण असें' काय बैसलों अधमीं? २९९
वैदेहीच्या रमणें वीरें करुणाकरें जगद्गीतें
पाठविलें मज, त्याच्या ऐकें कल्याणहेतु सद्गीतें ३००
चतुरानन जगदीश्वर त्याचा तूं पौत्र भूतपतिदास
श्रुतसंपन्न, नयज्ञ ब्राह्मणसुत, पावलासि सुपदास ३०१
सुरभूसुर यत्नानें पूजावे धर्मसेतु रक्षावे
निर्मल यश जोडावें, व्यसनानाचार ते उपेक्षावे ३०२

या विहिताचारातें, सोडुनि धरिलीस वृत्ति जननीचा
अनुसरलासि दशास्या ! पक्षाला तूं स्वकीय जननीच्या ३०३

विधिवर सामर्थ्यानें होउनि मदमत्त वन्य कुंजरसा
धर्मद्रु मोडिले हे, केली ध्वस्ताचि वेदकुंज रसा ३०४

शमदमनयभयलज्जा सोडुनि हरिशी परांगनावित्त
वित्तम होउनि निरयप्रद मार्गी काय ठेविलें चित्त ? ३०५

स्वकुळाला अंजन जो लावी, तो पुत्र न प्रसूविष्ठा
शिष्टाचरणीं यास्तव नित्य असावी यशःप्रदा निष्ठा ३०६

करिशी अन्याय बळें हितोपदेष्टा तुला गमे द्वेष्टा
स्वेष्टासि मंतुवांचुनि धिक्कारिशि, हे बरी नव्हे चेष्टा ३०७

जनकमहाराजसुता रविकुलतिल्काजसूनुची सून
तूं नकळत नेली, तरि दे, हो सद्वृत्त आजपासून ३०८

अपराध हा महाजननिंद्य तशा हे जनाधमा ! केली
अद्यापि मी पुलस्त्यद्विजाकडे पाहुनि क्षमा केली ३०९

रघुकुलज श्रीमंत, प्राज्ञ, प्रबल, क्षमादयानिलय
शरणागत वत्सल हे, ख्यात जनीं, शत्रुचा करूनि लय ३१०

रविवंशज राजांची बहु सरला भूलताहि चापलता
ते वक्रा झाल्यावर चालेना जिष्णुचीहि चापलता ३११

नाहीं तुजसीं मजसीं वैर, तथापि प्रियावियोग मला
दिधला, यावरुनि तुझा स्वभाव विपरीत सर्वथा गमला ३१२

वैदेहीला तूं जरि आणुनि देशील आझुनि मजला
मीही लंकाजीवन अभय, समर्पीन तत्क्षणीं तुजला ३१३

१ शहाणा.

नाहींतरि सायक हे, हें भुज, हा खड्ग, हें धनूरत्न
मी सज्ज जयधनातें तूं निधनातें स्वयें करीं यत्न ! ” ३१४

यांपरि तुज राजेंद्रें कथिलें, आतां करूं नको उशिर
सीतोपायन घेउनि, ठेवीं ये तत्पदांबुजीं स्वशिर ३१५

तूं करुनि समर न मर ; भ्रमरसम रघूत्तमांघ्रिनवपद्मीं
रम, रस घे, अमरचि हो ! भ्रमरहित स्वस्थ नांद निजसद्मीं ३१६

दे उत्तर, निजलासा बाहिरासा मूकसा नको राहूं
याहुनि हित काय वदों ! न वदासि कां आझुनीहि चोरा हूं ३१७

अनल, अनिल, यम, यक्षप, वरुण, विधु, ब्रध्न, सर्प, गंधर्व
सर्व पराजित केले, परि रामाशीं नको करूं गर्व ३१८

राम प्रणतजनांचा त्राता, रिपुलोककाल या पाशीं
चेष्टा करितां दुष्टा ! भ्रष्टा पडशील मृत्युच्या पाशीं ” ३१९

**मोरोपंतकृत मंत्ररामायण**

अंगदाचें बोलणें रावणाला चांगलेंच झोंबलें. त्यानें आपल्या सेवकांना अंगदाला पकडण्याची आज्ञा केली. अंगदानें त्या वेळीं अद्‌भुत पराक्रम दाखवला. रावणाच्या हृदयावर पुच्छाचा तडाखा लगावून त्यानें त्याचा तेजाळ मुगुट अंतराळांत उडवला व पाठोपाठ आपण उड्डाण करून तो झेलला. तो रामापुढें नेऊन ठेवतांच रामाला आनंद झाला. त्यानें तो विभीषणाच्या मस्तकावर घातला.

सामोपचारानें रावण वळत नाहीं हें अंगदानें सांगतांच रामानें आपलें धनुष्य उचललें. वानरसैन्यहि उठविलें. प्रत्यक्ष युद्धाला प्रारंभ झाला. एकच कोल्हाळ माजला. लंकानगर गडबडलें. राक्षस दुर्गावर उभे राहून वानरांना झोडूं लागले. वानर उड्या मारून राक्षसांच्या तंगड्या ओढूं लागले. गरगर फिरवून त्यांना जमिनीवर आदळूं लागले. कोणीं राक्षसांचे कोथळे बाहेर काढले. कोणीं नाक-कान तोडले.अश्व खिकाळूं लागले.गजभार सैन्यें तुडवीत

पुढें जाऊं लागले. 'जय श्रीराम' म्हणून वानर वृक्ष उपटूं लागले. वानरांच्या शिळावर्षावानें राक्षसांच्या अंगांतून भडाभड रक्त वाहूं लागलें.तडातड मस्तकें तुटून उर्ध्वपंथें उडूं लागलीं.तीन दिवसांनंतर धूम्राक्ष नांवाचा रावणाचा पहिला सेनापति रणांत पडला.

रावणाला ही वार्ता कळली. त्यानें मग वज्रदंष्ट्राला पाठवलें. तो मरतांच त्याच्यामागून अकंपन, जंबुमाळी इत्यादि राक्षसवीर सरसावले. त्यांची पण तीच गत झाली. त्यानंतर प्रहस्त नांवाचा सेनापति चतुरंगदलानिशीं वानरसैन्यांवर आदळला. संग्रामाची झड लागली. तलवारी तळपूं लागल्या. गदा दणाणल्या. शूळ हृदयाचा ठाव घेऊं लागले. नीळ नांवाच्या वानरानें एक ताडवृक्ष उपटून फेकला आणि प्रहस्ताचें रथासह चूर्ण केलें. प्रहस्त पडल्याची वार्ता ऐकून रावणाचा क्रोध अनावर झाला. तो स्वतः रणांत जाण्यासाठीं उठला.मंदोदरीला ही गोष्ट कळली.आपल्या पतीचें लक्षण तिला ठीक दिसेना. ती लगबगीनें रावणापुढें येऊन उभी राहिली. जीव तोडून तिनें रावणाला सन्मार्गाचा उपदेश केला.

पण मंदोदरीच्या शब्दांकडे लक्षहि न देतां रावण बाहेर पडला. त्याचे पुत्रपौत्र आणि सगळें राक्षससैन्य मागोमाग निघालें. पुनश्च संग्रामभेरी दुमदुमल्या. लंकेचीं सगळीं महाद्वारें एकदम उघडलीं. पुढें पायदळ मागें घोडेस्वार, त्यांच्यामागून हत्ती आणि रथ व सर्वांच्या मागें रावण असें संचलन चालू झालें.

पहिल्या प्रथम सुग्रीव त्याला भिडला. रावणानें त्याला मूर्च्छित पाडलें. तें पाहून लक्ष्मण पुढें आला आणि बाणामागून बाण सोडूं लागला. रावणाच्या पर्वतमय देहांतून रक्तधारा गळूं लागल्या. रावणानें जंगजंग पछाडले; पण लक्ष्मण आवरेना. त्याचीं सर्व शस्त्रास्त्रें लक्ष्मणानें मधल्यामध्येंच तोडून टाकलीं. शेवटीं ब्रह्मशक्ति अभिमंत्रून रावणानें लक्ष्मणावर टाकली. त्यासरशीं तो भूमीवर मूर्च्छित पडला.तशा स्थितींत रावणानें येऊन त्याच्या हृदयावर मुष्टिप्रहार केला.मारुतीला तें सहन झालें नाहीं.त्यानें रावणाच्या छाताडावर अशी एक लाथ मारली कीं, तो रक्त ओकीत तिथून पळाला. कितीतरी वेळानें मग लक्ष्मण सावध झाला.

रावणाचा सर्व बाजूंनीं पराभव होऊं लागला. त्यामुळें त्याचा आत्मविश्वास डळमळला. तो कलाहीन दिसूं लागला. 'आतां पुढें काय करायचं' असा प्रश्न त्यानें प्रधानांना टाकला. ते म्हणाले कीं, कुंभकर्ण झोंपला आहे त्याला उठवावं म्हणजे तो शत्रुसैन्याचा फडशा पाडील. रावणाला ती गोष्ट पटली. मग विरूपाक्ष, महोदर हे हजारों राक्षस बरोबर घेऊन त्याच्या शयनागारांत गेले. त्यांनीं तिथें जाऊन नगारे वाजवले आणि खूप ओरडाओरड केली. सर्वांनी मिळून एकच हांक फोडली.

## ३२ राक्षस कुंभकर्णाला उठवतात

" मग सत्वर रात्रिंचर गेले तो कुंभकर्ण उठवाया
पाठविले दशवदनें जे तन्निद्राघनासि लुटवाया ३२०

त्याच्या निकट मधु रुधिरघट शतसंख्याक ठेविती पूर्ण
मत्स्यवराहमहिषमृगमांसाचे राशि निर्मिती तूर्ण ३२१

विंध्य तसा निजला तो, वदनदरीमाजि निबिड अंधार
फार भयंकर भासे, पातालाचेंचि काय तें दार ३२२

श्वासानिलरयपतित क्षणदाचर तूलतुल्य ते भ्रमती
नासाप्रवेशनिर्गमगतागतें मशकसे किती श्रमती ३२३

'हे कुंभकर्ण! राजा बलाविती' मारिती अशा हाका
हा कांहींच वदेना, निद्राप्रिय इंद्रशत्रुचा काका ३२४

एक सहस्र महारव दुंदुभि संताडिले कितेकांहीं
मुद्‌गर मुसळें करिती ताडन, परि लागती न ते कांहीं ३२५

शतसंख्याक जळाचे कुंभहि आणूनि रिचविले कानीं
केशोन्मूलन केलें, झाले निजकंठ शुष्क हाकांनीं ३२६

चावुनियां काय वळें धांवति अंगावरूनियां, हसती
मृत वन्य गजास जसे वायसगण वेष्टिती, तसे दिसती ३२७

दश शत गज देहावर चालविले, ताडिला शिलाशिखरें
निद्रापराजयास्तव केलें त्यांहीं प्रसिद्ध युद्ध खरें !
ऐसा बहुतां यत्नें जागा केला जसा महाकाळि
मधुलोहित घट घट घट सेवी मांसासमेत तत्काळ ३२९
क्षुत्तृट् परिहारातें करूनि निद्रालसस्वभावानें
क्रव्यादांसि म्हणे, 'मज ऊठविलें किं निमित्त भावानें ?' " ३३०

**मोरोपंतकृत मंत्ररामायण**

कुंभकर्ण जागा होऊन 'काय झालं' म्हणून विचारतांच राक्षसांनीं त्याला युद्धाचा सगळा वृत्तांत सांगितला. तो रावणाला जाऊन भेटला. रावणानें त्याला सांगितलें कीं, 'आतां आपला जय तुझ्यावरच अवलंबून आहे. 'ठीक' म्हणून तो रणभूमीवर गेला.' पहिल्याप्रथम सुग्रीवाशीं त्याची गांठ पडली. सुग्रीवानें चावा घेऊन त्याचे नाककान तोडून टाकले. पण कुंभकर्णाला त्याची शुद्धच नव्हती. जेव्हां न्हाव्यानें त्याच्यापुढें आरसा धरला तेव्हां कुठें त्याला आपल्या चेहऱ्याची कशी विटंबना झाली आहे तें कळलें. त्यासरशीं तो कृतांतासारखा खवळला. त्यानें आपला अधोरोष्ठ दातांखालीं रगडला. पर्वत कोसळावा तसा तो वानरसैन्यांवर येऊन आदळला. आपल्या हातांतला मुद्गर चक्राकार भोवंडूं लागला. तडाख्यांत सांपडेल त्याचा चुराडा करूं लागला. थोड्याच वेळांत समरभूमीवर त्यानें धुमाळ उडवून दिली.

कुंभकर्ण असा अनाटोप झालेला पाहून रणरंगधीर श्रीराम पुढें आला. एकाद्या भयाण अंधाऱ्या गुहेसारखें तोंड उघडून कुंभकर्ण रामाला गिळायला धांवला. त्याच्या नाका-तोंडातून ज्वाळा उफाळूं लागल्या. पण रामानें एकाच दिव्य बाणानें त्याचें शीर गगनांत उडवलें. अशा रीतीनें कुंभकर्णाचा अंत झाला. एक अतुर्बळी रामशत्रु यमलोकाला गेला.

रावणाला ही वार्ता कळतांच तो बसल्या जागीं मूर्च्छित पडला. इंद्रजितानें त्याला सावरून धरलें आणि सावध केलें. 'बाबा तुम्ही काळजी करूं नका.

मी रणांत जातों आणि राम-लक्ष्मणांना यमाचे पाहुणे करून येतों.' बापाला असें आश्वासन देऊन तो निघाला.

मेघांच्या आड दडून तो रामसैन्यावर अंतराळांतून शरवर्षाव करूं लागला. त्यानें सुग्रीवादि प्रमुख वानरांना जमिनीवर लोळवलें. शेवटीं शक्तीचा प्रहार करून राम-लक्ष्मणासहि घायाळ केलें. ते दोघे रणभूमीवर निचेष्ट पडले. त्यांचे श्वासोच्छ्वास क्षीण झाले. हातपाय हालेनात. इंद्रियें विकल झालीं. चेतना हरली. हनुमंत आणि बिभीषण चिरंजीव असल्यामुळें त्यांना मात्र कांहीं झालें नाहीं.

'राम-लक्ष्मण मेले. आपला विजय झाला.' असें इंद्रजिताला वाटलें. तो जयवाद्यें वाजवीत लंकेंन परतला. रावणास परम हर्ष झाला. त्यानें पुत्राला दृढ आलिंगन दिलें. लंकेंत विजयोत्सव सुरू झाला. राक्षस मस्त झाले.

पण लंकेंत हा विजयानंद फार वेळ टिकला नाहीं. मूच्छित पडलेले वानरवीर लवकरच उठून बसले. राम-लक्ष्मणहि सावध झाले. त्यांनीं पुनश्च युद्ध मांडलें.असंख्य राक्षस संहारले.रक्ताच्या नद्या वाहिल्या.मांसाचा चिखल झाला.रणभूमि छिन्नविच्छिन्न प्रेतांनीं भरून गेली.

तेव्हां इंद्रजितानें निकुंबळेच्या किल्ल्यावर जाऊन महाभयंकर अनुष्ठान मांडलें. त्यानें रक्तानें स्नान केलें. रक्तवस्त्र परिधान केलें. सात प्रेतें खालीं पसरून त्यांवर आसन घातलें ब्राह्मणांचीं शिरें आणि रक्तमांस यांचें तो अग्नींत हवन करूं लागला. दिव्य रथाच्या प्राप्तीसाठीं तो हें सर्व करीत होता.

ही गोष्ट बिभीषणाला कळली. तो रामाला म्हणाला, 'अग्नींतून दिव्य रथ निघाला तर इंद्रजित मग कोणास आटोपणार नाहीं. त्याचें अनुष्ठान पुरें होण्याच्या आंत त्याला मारलें पाहिजे. बारा वर्षे ब्रह्मचारी आणि उपवासी जो असेल त्याच्याच हातून इंद्रजिताला मृत्यु आहे.

हें ऐकून रामानें लक्ष्मणाकडे पाहिलें. कारण लक्ष्मण तसा होता. त्यानें त्याच्या मस्तकीं कृपाहस्त ठेवून त्याला इंद्रजितावर पाठवला. अंगदाच्या खांद्यावर बसून तो निघाला हनुमंत, बिभीषण हेहि त्यांच्यासंगें चालले निकुंबळेवर जाऊन पोंचतात तों इंद्रजित पूर्णाहुति घालीत होता. एक तेजाळ रथ अग्निकुंडांतून वर येत होता मारुतीनें चपळाई करून एक मोठी

शिळा अग्निकुंडावर टाकली. कुंड मोडलें आणि अग्नीनें रथ परत गिळून टाकला. इंद्रजिताच्या सर्व आशा भग्न झाल्या.

तो क्रोधानें धडकला. दुसरा एक रथ आणवून तो निकुंबळेच्या पायथ्याशीं आला. लक्ष्मण आणि इंद्रजित समोरासमोर आले. युद्धाची धुमश्चक्री सुरू झाली.

## ३३ लक्ष्मण–इंद्रजित युद्ध

"फणी रावणी वीर सन्मूख झाले
बळाचे महांकाळ जैसे उदेले
करायासि निर्वाण ते एकमेकां
विरश्रीबळें सांडिली सर्व शंका ३३१

पुढें बोलतां जाहला इंद्रजीतु
'कृदांतापुढें निर्बळा मानवा तूं
मरायासि तूं व्यर्थ आलासि येथें
निमीषांत मारीन रे बाणपातें ३३२

रणामाजि सन्मूख होतां बळेंसी
समस्तां तुम्हा पाडिले नागपाशीं
पुन्हा मागुते सर्वही बाणजाळीं
निमालेति माझ्या करीं युद्धकाळीं ३३३

अरे काय जाली तुझी शक्ति तेथें
पुन्हा शीघ्र आलासि युद्धासि येथें
तुवां आणिलें काय सामर्थ्य जायां
बळें दावितां निर्बळें व्यर्थ वायां' ३३४

बहू बोलिला वाजटू घोर शत्रु
प्रतीउत्तरें बोलिला तैं सुमैत्रु

मि हा कोण तूं नेणसी काय मूढा
वृथा विक्रम् बोलसी वाड गाढा ३३५

रिपू बोलतो जाण रे सत्य वाणी
प्रतापें तुझें शीर छेदीन बाणीं
तया बोलतां ताविली भीमदृष्टि
उभा काळ जाळावया जीवसृष्टि ३३६

बळें छेदितां जाहला वोष्ठ दंतीं
सिमा फांकली वैभवाची दिगांतीं
करारां रणीं खादल्या वज्रदाढा
शतें सोडिली बाण बोढूनि मेढा ३३७

बळें धांविलीं बाणजाळें उफाळें
लखाखीतसे प्रेरिले दूत काळें
तडाडीत घोषें कडाडीत आले
सुमित्रासुतें सर्व छेदूनि नेले ३३८

असंभाव्य ते जाहली बाणवृष्टी
जळों लागली पावकें सर्व सृष्टी
अती चेंड ते दंड अद्‌भूत कैसे
महाकाळ कल्पांतिंचे मेघ जैसे" ३३९

**—रामदासकृत रामायण, युद्धकांड**

लक्ष्मणानें इंद्रजिताचें शिर आणि बाहुही एकदम तोडला. शिर वानरांनीं झेललें आणि रामाकडे आणलें. बाहु जो उडाला तो निकुंबळेंत जाऊन पडला. इंद्रजिताची भार्या सुलोचना तिथें होती. तिनें तो ओळखला. तिच्यावर आकाश कोसळलें. आपल्या पतीचा वध कसा झाला तें तिनें त्या बाहूला विचारलें. त्यानें भूजपत्रावर सगळी हकीगत लिहून दाखविली. तें पत्र घेऊन

ती रावणाकडे आली. पुत्राच्या मृत्यूची वार्ता ऐकून रावण ऊर बडवूं लागला. तिनें पतीचें शिर आणून देण्याबद्दल रावणाची प्रार्थना केली, तेव्हां मंदोदरीनें तिला सांगितलें कीं, तूं स्वतःच रामाकडे जाऊन तें मागून आण.

सुलोचना रामाकडे गेली. तिनें त्याचें स्तवन केलें. तुला ही गोष्ट कशी कळली असें रामानें विचारतांच तिनें तें पत्र दाखवलें. वानर म्हणाले कीं, 'तुटलेला हात पत्र लिहील या गोष्टीवर आमचा विश्वास बसत नाहीं. तुझ्या पतीचें शिर हें इथें पडलें आहे. त्याला तूं हंसव आणि मग घेऊन चल. तुटका हात जर पत्र लिहितो तर तुटलेलें शिरहि हंसूं शकेल.'

सुलोचनेनें ती गोष्ट मान्य केली. शिर हृदयाशीं धरून ती स्फुंदूं लागली. नंतर खालीं उत्तरीय वस्त्र पसरून तिनें तें त्याच्यावर ठेवलें. हात जोडून ती त्याला म्हणाली, 'अयोध्याधीश रामचंद्र तुमचं हास्य पहाण्यासाठीं उत्सुक झाला आहे. तरी एक वेळ कृपा करून हंसा,' आणि मग त्याला हंसूं येण्यासाठीं ती अनेक गोष्टी बोलली. अनेक विनोद प्रसंग आठवून दिले. पण शिर कांहीं हंसेना तेव्हां ती म्हणाली--

"माझंच चुकलं, जर मी माझा बाप शेष याला तुमच्या साह्यार्थ बोलावलं असतं तर तुम्हांला मृत्यु आला नसता--"

हे शब्द ऐकतांच शिर खदखदां हंसलें. वानरांनीं रामाला विचारलें कीं, हा काय चमत्कार आहे? तेव्हां राम म्हणाला कीं, हिचा बाप शेष तोच माझा भाऊ लक्ष्मण. सासऱ्यानेंच जावयाला मारलें असा प्रकार आहे हा. तें ऐकून लक्ष्मण दुःख करूं लागला. आपल्या मुलीची त्याला करुणा आली. रामानें त्याची कशीबशी समजूत घातली. सुलोचना पतीचें शिर घेऊन समुद्रतीरीं आली. तिनें त्या ठिकाणीं मोठें अग्निकुंड रचून त्यांत शिर ठेवलें अग्नीला तीन प्रदक्षिणा करून आपणहि त्यांत उडी घातली. तिच्या शरिरांतली आत्मज्योत दिव्य देह घेऊन स्वर्गलोकीं निघून गेली.

ज्या मुलावर एवढा भार तोच एकाएकीं मेलेला पाहून रावण सूडाच्या भावनेनें खवळला. राम-लक्ष्मणांशीं त्यानें तुंबळ युद्ध सुरू केलें. पण त्याचा

पराजयच होऊं लागला. शेवटीं त्यानें धगधगीत अशी शक्ति भात्यांतून बाहेर काढली व लक्ष्मणावर सोडली. तिनें लक्ष्मणाला घायाळ केलें. तो खालीं पडला. त्याचे श्वासोच्छ्वास बंद झाले. प्राण कंठाशीं आले.

तें पाहून राम शोकाकुल झाला. मारुतीनें त्याला सांवरलें सगळेच वानर रडू लागले. एकच हाहाःकार झाला. सुषेण नांवाच्या वैद्यानें लक्ष्मणाची ती अवस्था पाहून सांगितलें कीं, 'सूर्योदय होतांच याचा प्राण जाईल. द्रोणाचलावरची अमृतवल्ली रात्रींत जाऊन जर कोणी आणील तरच हा वांचेल.' तें ऐकून मारुति त्या कामासाठीं तयार झाला. रामचरणीं मस्तक ठेवून त्यानें उड्डाण केलें आणि तो द्रोणाचलाजवळ आला नमस्कार करून त्यानें पर्वताची प्रार्थना केली.

मारुति द्रोणाचल घेऊन सूर्योदयाच्या आंत लंकेंत आला. सुषेणानें त्याच्यावरची अमृतवल्ली तोडून तिचा रस काढला आणि लक्ष्मणाच्या मुखांत घातला. लक्ष्मण ताबडतोब उठला. त्या रसानें इतरहि मृत वानरवीर सुषेणानें उठवले सर्वांना आनंदीआनंद झाला. रामाचें मुखकमल हर्षोत्फुल्ल झालें. राम–सैन्य ताजेंतवानें होऊन युद्धोन्मुख झालें. सर्वांनीं गर्जना केल्या. वानरवीर 'घेमार' म्हणून शत्रुसैन्यावर तुटून पडले. रावण सैन्य बरेंचसें मेलें व उरलेलें पांगलें.

रावणाला या सर्व गोष्टी असह्य झाल्या. तो तीन वेळां रणभूमीवर जाऊन परत आला होता. आतां निर्वाणीचें युद्ध करायला तो निघाला. उरलेंसुरलें सगळें सैन्य त्याच्यामागें निघालें. रावणाचा रथ रामासमोर येऊन थडकला. दोघे प्रचंड वीर विभांडूं लागले. अलातचक्रासारखीं दोघांचीं धनुष्यें चमकूं लागलीं. नागासारखे बाण एकमेकांना डसूं लागले. रावणाच्या सर्पास्त्रावर रामानें गरुडास्त्र सोडलें. रावणाचें अग्न्यस्त्र रामाच्या पर्जन्यास्त्रानें विझलें. रावणाच्या वातास्त्रावर रामानें पर्वतास्त्राचा उतारा दिला. रावणाचा एक तेजाळ बाण रामाच्या पायांत घुसला.

राम भूमीवर लढतो हें देवांना पाहवलें नाहीं. इंद्रानें मग त्याच्यासाठीं एक दिव्य रथ पाठविला. मातलि नांवाचा सारथीहि त्याच्यासह आला. त्यानें विनंति करतांच राम रथारूढ झाला. मग युद्धाला खरा रंग चढला. कितीतरी

वेळ राम-रावणांनीं एकमेकांना विंधिलें आणि एकमेकांचे घाव चुकवले. आकाशांत बाणांचा मंडप झाला नक्षत्रें खळाखळ तुटूं लागलीं. मेघ रक्त-धारा वर्षू लागले एक काळ दुसरा महाकाळ, एक दावानल दुसरा वड-वानल असे ते दोघे दिसूं लागले. युद्ध नव्हे; प्रळय ओढवला असें त्रिभुवनाला वाटलें.

रामानें त्याच्या रथाचे घोडे प्रथम मारले. नंतर सारथ्याला घायाळ केलें, आणि त्यानंतर एक अर्धचंद्रकार बाण सोडून रावणाची दहाहि शिरें उडवलीं. रामाला वाटलें कीं, आतां रावणाचें अचेतन धड खालीं कोसळेल. पण काय आश्चर्य! परत दाही शिरें होतीं तशीं त्या धडांतून वर आलीं. तेव्हां मातलीनें, अगस्त्यानें दिलेल्या बाणाची रामाला आठवण करून दिली. रामानें तो बाण काढतांच सर्वांचे डोळे दिपले. रामाच्या धनुष्यापासून सुटतांच रावणाच्या वक्षःस्थलाच्या रोखानें तो धांवला. रावणाच्या हृदयांत अमृताची कुपी होती ती फोडून आणि हृदय विदारून तो आरपार गेला. रावण क्षण न लागतां मरून पडला.

## ३४ रावणवध

“ कुपी फोडिली बाणघातें. निघातें
तेणें रावणू चालिला मृत्युपंथें
रुसी, देव, गंधर्व, ते सर्व तोषें
विमानीं सुखें गर्जती नामघोषें ३४०

नभीं दुंदुभी वाजती येक नादें
बहुतांपरींचीं बहूसाल वाद्यें
ध्वनी दाटले पूर्ण ब्रह्मांड घोषें
कपी गर्जती नामघोषें विशेषें ३४१

सुखानंद आनंदली जीवसृष्टि
विमानींहुनी जाहली पुष्पवृष्टि

रुसी, देव, गंधर्व, सर्वै मिळाले
विणे वाउनी नारदादीक आले ३४२

मिळाल्या सुखें नायेका अष्टभावें
करीं ताळ मृदंग वीणे स्वभावें
कळा कौतुकें दाखवीती प्रसंगें
गुणी नाचणीं नाचती रागरंगें ३४३

बहू गायनें थोर गंधर्व गाती
कळा ऐकतां देव थकीत होती
जयांच्या अळापें देहेभाव जाती
मृगें श्वापदें लोपल्या त्या विजाती ३४४

रुपें सुंदरी किन्नरी दिव्य येत्रें
बहूसाळ विद्याधरी गूणपात्रें
उठे राग कल्लोळ सप्तै स्वरांचा
गमे बोळला मेघ हा अमृताचा ३४५

तुरें वाजती अंबरीं शंखभेरी
जयो पावला राम लीळावतारी
सुरां मानसीं थोर आनंद झाला
महाघातकी रावणू तो निमाला ३४६

समस्तां सुरां मानसीं सूख जालें
परी दुःख बीभीषणा प्राप्त केलें
रणीं रावणू श्रेष्ठ बंधू निमाला
झळंबे मनीं शोक उत्पन्न झाला ३४७

बहू लोटले मेघ नेत्रोदकाचे
दिनाचेपरी शब्द कारुण्य वाचे

घडीनें घडी तो भुमी अंग घाली
अरीभ्रातया शुद्धि सर्वै उडाली ३४८

देहेभाव सांडूनि तो रूदताहे
मोहोजाळ होतांचि आक्रंदताहे
बहूतांपरींचें बहू सौख्य दिल्हें
मनामाजि तें सर्वही आठवीलें ३४९

मुखें श्वास सांडूनि पाणी चुरीतो
भुमी मस्तकू आपटीतो पिटीतो
म्हणे वीर तो ' वोखटा काळ आला
त्रिकूटाचळाचा अळंकार गेला ३५०

नव्हे रावणासारिखा संपतीचा
नव्हे रावणासारिखा वित्पतीचा
बहू सांगतां वैभवालागिं कांहीं
प्रतापी तयासारिखा वीर नाहीं ३५१

मनाचा उदारू धनाचा कुबेरु
बहूसा विचारु जनीं दानशूरु '
गळाला बहू धीर त्या राक्षसांचा
महामंडळीं धाक गेला सुरांचा " ३५२

—श्रीरामदासकृत रामायण

रावण मरतांच रामरायानें धनुष्य खालीं ठेवलें. बिभीषण बंधुशोकानें रडत होता त्याचें सांत्वन केलें. त्याच्याकडून रावणाचें सगळें और्ध्वदेहिक करवलें. लंकेचे प्रजाजन बिभीषणाला भेटायला आले. वानर लंकानगरीचें वैभव पाहून आले. बिभीषणानें रामाला विनवलें कीं, ' माझ्याबरोबर तुम्ही नगरांत चलावें. तेव्हां श्रीराम म्हणाला—

" मीं लंका तुला दान दिलेली आहे. आतां मी तिच्या आंत पाऊल टाकणार नाहीं. कन्यादान झाल्यावर मुलीच्या घरीं अन्न घेऊं नये. गाय दान दिल्यावर आपण तिचें दूध काढूं नये. शिवाय भरताला भेटल्यावांचून मी मंगलस्नान करणार नाहीं. भोजन, तांबूल इत्यादि भोग तोंवर वर्ज्य आहेत.

नंतर रामानें बिभीषणाला लक्ष्मण-सुग्रीवांसह लंकेत पाठवलें. शुभ मुहूर्तावर बिभीषण लंकेचा राजा झाला.

---

# उत्तरकांड

★

सर्व स्थिरस्थावर झाल्यावर 'आतां सीतेला घेऊन ये' म्हणून रामानें मारुतीला आज्ञा दिली. मारुति या आज्ञेची वाट पहात होता. तो शीघ्रगतीनें लंकेत गेला. रामाचा निरोप त्यानें बिभीषणाला सांगितला. दोघे मिळून अशोक वनांत आले. विभीषणाची राणी आणि इतर स्त्रियाहि आल्या. त्यांनीं सीतेला मंगलस्नान घातलें. नंतर तिला अमूल्य वस्त्रभूषणें लेवविलीं. बिभीषणानें तिच्यासाठीं पालखी सजवून आणली. सीता तिच्यांत बसली. वाजत गाजत मिरवणूक निघाली. थोड्याच वेळानें ती जगज्जननी आदिमाया रामचंद्राच्या पुढें येऊन उभी राहिली.

तिला पाहून रामाच्या मुद्रेवर आनंद प्रगटला नाहीं. त्यानें भ्रुकुटी वक्र केल्या. तीक्ष्ण दृष्टीनें तो सीतेकडे पाहूं लागला. क्षणभर स्तब्ध राहून तो सीतेला म्हणाला--

"सीते, रावणाच्या बंदिवासांतून मीं तुला सोडवलं. पति या दृष्टीनें माझ्यावर असलेली जबाबदारी मीं पार पाडली. आतां तुला दाही दिशा मोकळ्या आहेत. मनाला येईल तिकडे तूं जा. मला तुझी गरज नाहीं आणि माझी गरज तुला वाटेल असंहि माझ्याकडे कांहीं नाहीं. तुला ठाऊकच आहे कीं, मी राज्यभ्रष्ट आहें. ना छत्र ना सत्ता. ना धन ना वैभव. कंदमुळें खातों. वल्कलं नेसतों. वानरांच्या संगतींत राहतों. माझ्या सहवासांत तुला काय सुख लाभणार आहे? शिवाय मला आतां प्रपंचाची आसक्ति मुळींच उरली नाहीं.

## ३५ सीतेची दारुण अवस्था

"ऐसें बोलतां रघुनाथ सीतेसी वाटला कल्पांत
कीं शब्दरूपें तप्त शस्त्र अकस्मात खोंचलें

नयनीं सुटल्या अश्रुधारा म्हणे जगदंबा श्रीरामचंद्रा
आनंदकंदा गुणसमुद्रा करा माझा वध आतां ३५४

षण्मास कष्टी होऊन आजि दृष्टीसि देखिले रामचरण
तों पूर्वकर्म माझें गहन आडवें विघ्न आलें हें ३५५

कामधेनूची काढितां धार शेराच्या चिकें भरलें पात्र
अमृताच्या घटीं घातला कर तों विष दुर्धर भरलें असे ३५६

याचक लवलाहें धांवला कल्पतरूखालीं आला
त्यासी तेणें मार केला शुष्क काष्ठ घेऊनियां ३५७

भागिरथी भरूनि लवलाहीं सागरा शरण गेली पाहीं
तो जरी म्हणे कीं ठाव नाहीं तरी तिसी गती काय पुढें ! ३५८

जळत्या गृहांतून काढिलें मागुती वणव्यांत टाकिलें
करुणासागरासि आलें भरतें क्रूर नवल हें ३५९

सूर्य कोपला किरणांवरी समुद्र लहरींवरी दावा करी
अमृत मधुरता बाहेरी आपुली घालूं इच्छितसे ३६०

आपल्या शाखेशीं अबोला कल्पद्रुमें जैसा धरिला
कीं चंद्रें कलांचा त्याग केला मेरु कोपला शिखरांवरी ३६१

जैसी भागीरथी दोषविहीन कीं सर्वदा शुचि जैसा अग्न-
तैसी बोलतां मी जाण शुचिष्मंत निजांगें ३६२

दशकंधर गेला घेऊन हा मोहरीहून अन्याय सान
मेरूइतका दंड पूर्ण समर्थें हा आरंभिला " ३६३

—श्रीधरकृत रामविजय

जानकीच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. कमलिनीसारखी तिची काया कांपूं लागली. 'आपण दोषी आहों म्हणून रामचंद्र आपला स्वीकार करीत

नाहीं' असें तिला वाटलें. आपला निर्दोषीपणा सिद्ध करण्यासाठीं ती अग्नि-दिव्य करायला सज्ज झाली. तिनें वानरांना विनवलें. 'माझ्या उपकार-कर्त्यांनो, लांकडं गोळा करून मजसाठीं एक चिता रचा. मी तुम्हां सर्वांच्या देखत दिव्य करणार आहें.'

वानरांनीं तात्काळ एक चिता प्रज्वलित केली. सीतेनें अग्नीची पूजा करून आंत उडी घातली. पण ती जळाली नाहीं. तिच्या स्पर्शानें अग्नि पावन झाला. त्याच्या ज्वाळा शांत झाल्या. अग्नि शमला. सीतेची काया दिव्य दिसूं लागली. जणूं सोन्याची पुतळी !

आकाशांतून तिच्यावर पुष्पवृष्टि झाली. वानरवीर आनंदानें गर्जूं लागले. रामाला सीतेची शुद्धता पटली. त्यानें तिला आलिंगन दिलें. तिचा स्वीकारही केला. वनवासाचीं चौदा वर्षे पूर्ण झालीं. कृतकार्य झालेला रघुनंदन पुष्पक विमानांत बसून सीतेसह अयोध्येकडे परतला. सुग्रीव, हनुमंतादि वानर आणि बिभीषणादि राक्षस रामाच्या समागमें निघाले.

इकडे नंदिग्रामांत भरत दिवस मोजीत बसला होता. सांगितलेली मुदत पूर्ण भरली तरी राम अजून आला नाहीं म्हणून तो व्याकुळ झाला. त्याला देहाचें ओझें संभाळवेना. प्राण धरवेना. अग्नि पेटवून तो आत्मबलिदानाला सिद्ध झाला. तीन प्रदक्षिणा करून तो अग्नींत उडी घालणार तोंच 'भरता थांब ! असा अविचार करूं नको' असें म्हणत मारुति तिथें आला. त्यानें त्याला रामाच्या आगमनाची वर्दी दिली.

पाठोपाठ पुष्पक विमान नंदिग्रामांत उतरलें. रामाला थकला भागलेला भरत दिसला. धावत जाऊन दोघांनीं एकमेकांना आलिंगन दिलें. हृदयाला हृदय भिडलें. मानेवर मान टेकली. अश्रूंत अश्रू मिसळले. हरिहर एकमेकांना भेटावे, चंद्रसूर्यांची मिळणी व्हावी, अथवा क्षीरसागराचे उठावलेले कल्लोळ परस्परांत मिसळावे तशी ती राम-भरतभेट झाली. ती बंधुभेट नसून तीर्थ-संगम होता. सगळी मंडळी त्या तीर्थांत स्नान करून पावन झाली

शत्रुघ्न आणि सुमंत्र रामरायाला सामोरे आले. प्रचंड मिरवणूक निघाली. अयोध्येंतले रस्ते नरनारींनीं फुलून गेले. अयोध्येंत एकाएकीं नवचैतन्य संचरलें. स्त्रियांनीं राम-सीतेवर लाह्या-फुलांचा वर्षाव केला वाद्यांच्या गजरांत

आणि लोकांच्या जयजयकारांत श्रीरामानें अयोध्येच्या राजवाड्यांत प्रवेश केला.

वसिष्ठांनीं रामाला हृदयाशीं धरलें. 'आर्ये, राघवाची सत्कीर्ति तूं वाढवलीस' म्हणून सीतेचें अभिनंदन केलें. नंतर सर्व मातांना प्रणाम झाले. कौसल्येनें रामाला अश्रूंनीं भिजवलें. नंतर एक दिवस शुभमुहूर्त साधून वसिष्ठांनीं रामाला राज्याभिषेक केला. रत्नजडित सिंहासनावर रघुनंदन शोभला. सगळ्या राजांनीं त्याच्या पायाजवळ करभार समर्पिला आणि नजराणे दिले.

रामानें आपलें भांडार उघडलें. याचकांना दानें दिलीं. ब्राह्मणांना संतुष्ट केलें. अन्नसंतर्पणें झालीं. सोळा दिवसपर्यंत राज्यारोहणसमारंभ चालला. अयोध्येंत सुखसंतोषाची लयलूट झाली. देणें तरी सुखच, आणि घेणें तरी सुखच ! रामाचे बंधु मुख्य प्रधान बनले. मारुतिरायानें चरणसेवेचा अधिकार घेतला. भरतखंडांत रामराज्य सुरू झालें.

नंतर कांहीं दिवसांनीं वानर आणि राक्षस यांनीं रामाकडे स्वस्थानीं परत जाण्याची अनुज्ञा मागितली. रामरायानें त्या सर्वांना थाटाचें श्रमभोजन दिलें. वस्त्रभूषणें देऊन सर्वांचे गौरव केले. हिरेमाणकें मुक्तहस्तानें वानरांच्या ओंजळींत घातलीं. मारुतीची पाळी येतांच त्याचा हात थबकला. त्याच्या निस्सीम सेवेचें आणि भक्तिभावाचें पारितोषिक म्हणून त्याला काय द्यावें हेंच रामाला सुचेना. मनांत आणावी ती ती वस्तु मारुतीच्या उपकारापुढें क्षुद्र वाटूं लागली, तो म्हणाला, 'हनुमंता ! तुला देण्यासारखें मजजवळ कांहीं नाहीं.' अखेर त्यानें उठून मारुतीला दृढ आलिंगन दिलें. 'आतां मीच तुझा भक्त होईन आणि तुझ्या हृदयांत वास्तव्य करीन.' श्रीराम म्हणाला. मारुतीनें रामाचे पाय धरले आणि सांगितलें कीं, 'हेंच मला निरंतर दे.'

इतक्यांत सीता तिथें आली. तिनें आपल्या गळ्यांतला पृथ्वीमोलाचा मणिहार मारुतीला देण्यासाठीं काढला. रामाला तिचा हेतु समजला. 'ठीक आहे, दे.' असें रामानें म्हटलें आणि मारुतीची योग्यता तिला समजावून सांगितली.

## ३६ मारुतीला सीतेचें बक्षीस

"मुक्तामणिहारातें सीता घेऊनि हस्तकीं होती
तों सर्वज्ञवराला कळली तच्चित्तकामना हो ती ३६४

राम म्हणे 'प्रमदे या लोकीं जो योग्य हार हा देया
त्याला देतां राज्य, प्राणहि नाहींत सर्वथा प्राज्य ३६५

जैसी तूं तैसी श्री, भरत जसा हा तसेचि हे प्राण
ज्यानें मातें दिधले सीते! तो पूज्य सर्वथा जाण ३६६

एवं रघुवीराच्या वाक्यें जाली प्रहृष्टरूपा हे
माता जसी सुतातें, तैशी ते मारुतीकडे पाहे ३६७

शिरकरकमळें चरणीं समर्पितां मारुतीस ती सीता
देवी मणिहारासह दे हृदयाभीष्टें भक्ति सुप्रीता ३६८

तूं निर्मळ निजगुणमणिभूषित वत्सा! सदैव परि हार
कंठीं म्हणे असों दे मद्विस्मृतिचा करिल परिहार ३६९

तुझिया हृदयसरोजीं स्मरण असो आणि हार हा कंठीं
मुदित मनें काळातें आत्मज्ञानें पहा, रहा, कंठीं ३७०

आम्हां उपकाराचा सागर लंघावया नसे नाव
धन्यें वदान्यांमध्यें घ्यावें पहिलें सदा तुझें नांव ३७१

पवनतनुज हेमप्रभ सितमुक्ताहार घालितां कंठीं
भासे कनकाद्रीच्या[1] बलाकमालेचि[2] काय उपकंठीं" ३७२

—मोरोपंतकृत मंत्ररामायण

यानंतर सर्वांनीं रामरायाचा निरोप घेतला. सुग्रीव किष्किंधेला गेला. बिभीषण लंकेला गेला. ऋषिमंडळी आपापल्या तपोवनांत परत गेली. अयोध्येंतली गर्दी ओसरली. रामराय प्रजेच्या सुखाकडे लक्ष देऊं लागला.

---

१ मेरुपर्वताच्या. २ बगळ्यांची माळ

थोड्याच दिवसांत सीता गर्भवती झाली. सर्वांना आनंद झाला. राममाता तिचें परोपरीचें कौतुक करूं लागल्या. आपण आई होणार या भावनेनें सीता हर्षोत्फुल्ल झाली. एक दिवस रामानें एकांती तिला डोहाळे विचारले. सीता लाजत संकोचत म्हणाली—

" मला पुनः एकदां वनांत जावंसं वाटतं. भागीरथीचं स्नान करावं, तपोवनांत हिंडावं आणि ऋषिमुनींची सेवा करावी असं मनानं घेतलं आहे. माझी एवढी इच्छा आपण पुरवणार ना ? "

रामानें ती गोष्ट कबूल केली आणि तो आपल्या निवासस्थानीं गेला. इतक्यांत दुर्मुख नांवाचा एक हेर रामाच्या भेटीस आला. प्रजा आपल्याबद्दल काय बोलते तें गुप्तपणें समजून घेण्यासाठीं रामानें त्याला नगरांत पाठवला होता.

'सीतेचा तुम्हीं स्वीकार केलांत याबद्दल कांहीं लोक वाईट बोलतात,' असें त्यानें रामाला सांगितलें. त्याला परमदु:ख झालें तें ऐकून. सीतेवर त्याचें अपार प्रेम होतें. तिच्या सच्चारित्र्याबद्दल, पातिव्रत्याबद्दल पुरेपूर खात्री होती. पण लोकापवाद टाळण्यासाठीं त्यानें सीतेचा त्याग करायचें ठरवलें. लक्ष्मणाला बोलावून आणून आज्ञा केली कीं, 'सीतेला भागीरथीच्या पार ने आणि वाल्मीकींच्या आश्रमाजवळ सोडून ये.'

भावांना हा विचार आवडला नाहीं. त्यांनीं रामाला या निर्धारापासून परावृत्त करण्याकरतां पुष्कळ प्रयत्न केले. पण रामानें कोणाचेंच ऐकलें नाहीं. तो वज्राहूनहि कठोर झाला.

सुमंत्रानें रथ जोडला. लक्ष्मण सीतेसह आंत बसला. वनें–उपवनें मागें टाकीत रथ पुढें जाऊं लागला. सीतेचा आनंद गगनांत मावेना. पतीनें आपली इच्छा पूर्ण केली, या सुखांत ती गर्क होती. तिचा ओसंडणारा आनंद पाहून लक्ष्मणाच्या हृदयांत मात्र कालवाकालव होत होती. वाटेंत त्यांना अपशकुन होऊं लागले. सीतेचें मन चरकलें. तिनें म्हटलें, 'इडापिडा टळो आणि माझ्या प्राणेश्वराचें मंगल होवो.'

## ३७ सीतात्याग

" धराधीशपत्नी धरानंदिनी हो !
पुसे देवरा भूधरातें गुणी हो
म्हणे वोखटें चिन्ह हें काय सांगे
न बोले, मनीं मीनला शोकगंगे ३७३

सकळसहित बंधु क्षेम रामा रमेशा
अचळ सुख असो कां हेंचि मागें महेशा
अकुशळ मज लागो सर्व त्याचें सुमित्रा
सकरुण अनुवादे सारसारंगनेत्रा ३७४

रुदन करित पाहे नोबले मातु कांहीं
चकित जनकबाळा नेणवे हेतु कांहीं
' निरखुनि वन भंगा चाल कां रामभेटी '
वचन पडत कानीं आगळा शोक दाटी ३७५

रचित कनकनौका नाविकें सिद्ध केली
उतरुनि सुरगंगा पैलपारासि नेली
गहनवन विलोकी लागल्या रूखजाळी
विरहित जनपक्षीं व्यापिलें सिंहव्याळीं ३७६

तरुतळिं तृणशय्यें बैसली लोकमाता
सकरुण फणिराजें वंदिले पाय माथां
वदनविधु विलोकी सद्गदां कंठ दाटे
उभय नयनपंथीं सांचलें नीर लोटे ३७७

प्रदक्षिणा पंकजईक्षिणीतें
सारूनि पायांवरि मस्तकातें

ठेवोनि बोले अळुमाळ संज्ञा
अलोट मातें रघुराजआज्ञा ३७८

रघुपतिचरणातें मानसामाजिं ठेवी
अनुदिनिं रसनेतें रामरंगेंचि लावी
रघुपतिकरुणेचा मेघ वोळेल जेव्हां
नयनवदन मेळें पावसी सौख्य तेव्हां ३७९

विनवित वनसत्त्वां पंचभूतां समस्तां
सकाळिं तुम्हि कृपेनें रक्षिजे रामकांता
भरुनि हृदय नीरें पातला नीज पंथें
रुदन करीत गेला त्यागिलें जानकीतें " ३८०

–मुक्तेश्वरकृत रामायण

रामानें आपला न सांगतां त्याग केला आणि मुलासारखा मानलेला लाडका दीर लक्ष्मण आपल्याला या रानांत एकटी सोडून चालता झाला हें पाहून सीतेचे अश्रु अनावर झाले. ती मुक्तकंठानें रडूं लागली. तिच्या शोकानें सारें वन हळहळलें. मोर नाचायचे थांबले. वृक्षवल्लींचीं फुलें झरझर गळाली. हरिणींनीं आपल्या मुखींचा दर्भकवळ खाली टाकला.

त्याच वेळीं वाल्मीकि मुनि समिधा, फुलें तोडण्यासाठीं वनांत आले होते. रडण्याचा आवाज ऐकून ते सीतेजवळ आले. सीतेनें अश्रु पुसून त्यांना नमस्कार केला. वाल्मीकींना अंतर्ज्ञानानें सारा प्रकार समजला. 'तूं आपल्या माहेरीं आलीस असें समज आणि कसलीच चिंता करूं नको' असें वाल्मीकींनीं तिचें सांत्वन केलें. तिला घेऊन ते आपल्या आश्रमांत आले. ऋषींची परिचर्या करीत सीता त्या आश्रमांत काल कंठूं लागली.

नवमास पूर्ण झाल्यावर सीता प्रसूत झाली. तिला दोन मुलगे झाले. जसे तेजस्वी हिरे. वाल्मीकींनीं एकाचें नांव कुश व दुसऱ्याचें लव असें ठेवलें. हे जुळे भाऊ वाल्मीकींच्या आश्रयाखालीं वाढले. त्यांनीं त्यांच्या मुंजी केल्या. त्यांना धनुर्वेद पढवला. युद्धशास्त्रांत पारंगत केलें. स्वतः रचलेलें रामायण

त्यांच्याकडून मुखोद्गत करवलें. आपले पुत्र आदर्श क्षत्रिय कुमार झाले हें पाहून सीतेच्या मातृहृदयाला धन्यता वाटली.

इकडे अयोध्येस श्रीरामाला अश्वमेध करण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्यासाठीं तो नैमिषारण्यांत आला. आपल्या भावांना सांगून त्यानें यज्ञाची सर्व सिद्धता करवली. मुख्य यज्ञमंडप आणि त्याच्या भोंवतीं निरनिराळ्या कार्यांसाठीं इतर अनेक मंडप उभारले गेले. यज्ञांत सहधर्मचारिणी म्हणून रामानें सीतेची सुवर्णप्रतिमा बनवून घेतली. पृथ्वीपर्यटनासाठीं श्यामकर्ण घोडा सोडला व त्याच्या रक्षणाकरितां सैन्यासह लक्ष्मणाला पाठवलें. यज्ञाचीं कृत्यें यथासांग पार पाडण्यासाठीं अनेक ऋषिमहर्षि तिथें आले. हा अपूर्व समारंभ बघायला अयोध्येतून असंख्य प्रजाजन जमले.

वाल्मीकिमुनींना ही हकिगत समजतांच ते लवकुश अणि सीता यांना बरोबर घेऊन तिकडे जाण्यासाठीं निघाले. त्यांचे कित्येक शिष्यहि त्यांच्या समागमें होतेच. रामाच्या यज्ञस्थानापासून थोड्या अंतरावर त्यांनीं आपला मुक्काम केला. आपण रचलेलें रामायण प्रत्यक्ष मुलांच्याच तोंडून रामाला ऐकवावें म्हणून त्यानें लव-कुशांना योग्य त्या सूचना देऊन यज्ञाच्या जागीं पाठविलें.

ते दोघे यज्ञमंडपांत आले. त्यांचें सौंदर्य आणि तेज पाहून सर्व सभा आश्चर्यचकित झाली. ते दोघेहि थेट रामासारखेच दिसत होते. सर्वांना तें सादृश्य पाहून नवल वाटलें. तिथें येतांच वीणेच्या स्वरावर त्यांनीं रामायण गायला सुरुवात केली. आधींच रामकथा गोड आणि त्यांतून ती कुमारांच्या किन्नरकंठांतून स्रवलेली. मग काय विचारतां ! जनतेचीं हृदयें एका क्षणांत तिनें आकृष्ट केलीं. लव-कुश काव्याच्या अर्थाशीं समरस होऊन गात होते. समाज नागासारखा डोलत होता. प्रसंगानुसार हर्षशोकांच्या भावना मंडपांत उचंबळत होत्या.

रामानें आपलें चरित्र त्यांच्या मुखानें ऐकलें. त्याला त्या कुमारांविषयीं अत्यंत आपुलकी वाटूं लागली. तो त्यांच्यावर मोहून गेला. अधिक चौकशी करतां हे दोघे सीतेचे म्हणजे आपलेच पुत्र आहेत हें त्याला कळलें. पुत्रमुख-

दर्शनानें रामाचा अंतरात्मा आनंदभरित झाला. वाल्मीकि याच अरण्यांत दुसरीकडे उतरले आहेत हें समजतांच त्यानें त्यांना बोलावणें धाडलें.

वाल्मीकि आले. त्यांच्या मागून सीता होतीच. तिची ती वनवासी कृश मूर्ति पाहून लोकांच्या डोळ्यांत पाणी आलें. रामानें वाल्मीकीचें स्वागत केलें. ते रामाला म्हणाले—

"रामा! ही तुझी सीता. तूं हिचा त्याग केलास. मी हिला आणि हिच्या या दोन पुत्रांना आजवर सांभाळलं. आतां तूं हिचा स्वीकार कर. धर्मपत्नी म्हणून हिला सन्मानानें वागव. ही निष्पाप आहे. पतिव्रता आहे. मी खोटं बोलत असेन तर माझी हजारों वर्षांची तपश्चर्या मातीमोल होवो."

"मुनिमहाराज ! सीतेविषयीं माझें मन निर्मळ आहे. पण तिच्या चारित्र्याविषयीं माझी प्रजा साशंक आहे त्याला मी काय करूं ? प्रजारंजन हें रघु वंशाचं कुलव्रत आहे. प्रजेसाठीं मी कशाचाहि त्याग करीन. सीतेनें पुनश्च एकवार दिव्य करावं आणि लोकांना आपलं शुचित्व पटवावं म्हणजे मी तिचा सन्मानपूर्वक स्वीकार करीन." रामराय धीरगंभीर वाणीनें बोलला.

तें ऐकतांच सीता पुढें झाली. तिनें ऋषिवर्यांना नमस्कार केला आणि आपली दृष्टि भूमीकडे वळवली. ही आतां काय करणार म्हणून सगळी सभा चित्रासारखी स्तब्ध होऊन तिच्याकडे पाहूं लागली. सीतेनें हात जोडले आणि म्हटलें—

"हे धरणीमाते ! मी जर मनानंहि पातिव्रत्याचं उल्लंघन केलं नसेल आणि माझं आचरण सर्वस्वीं शुद्ध असेल तर मला आपल्या पोटीं ठाव दे!"

## ३८ सीता भूमींत गुप्त होते

"मनोवासनेमाजि रामूचि नांदे
उठे शब्द त्यामाजि रामूचि बोधें
असे हेंचि जैं सत्यसाचार माये
त्वरें वाट दे विवरीं माधवीये ! ३८१

तनू आचरे तेथही चित्त रामीं
नसे राघवावीण आणिक कामी
असे सत्य हें वर्तलें साधनीये
धरे ! वीवरीं मार्ग दे माधवीये ३८२

तये सन्मुखीं सत्वरा तेचि काळीं
धरे छिद्र झालें, गुहा घोर काळीं
शिरीं रत्नसिंहासनीं सर्प आला
फणी श्वेतवर्णी धरी रत्नमाळा ३८३

तया हेमसिंहासनारूढ नारी
तनू श्यामला दिव्य देवांगधारी
करीं जानकी ते धरी अंकभागीं
रिघे सत्वरा वीवरीं नेत नागी ३८४

हहाकार झाला सुरां भूचरांतें
रघूनायकें पीटिलें वक्ष हातें
पतंगापरी धांवला मुक्तकेशी
म्हणे 'प्राण माझा ! प्रिये चारुहासी !' ३८५

करें कर्षितां सत्वरां चोज झालें
रवीमंडळाचेपरी बिंब गेलें
बुझालें तळीं छिद्र कोठें दिसेना
म्हणे राम तो 'भूतळीं मी वसेना' ३८६

तनू नावरे भूतळीं राम लोळे
जळें शिंपिती वक्ष राजीव डोळे

वपू घोळिलें धूसरें सर्व पाहे
गमे लोपलें ज्यापरी ज्ञान मोहें ३८७

विनवित अवनीतें शीघ्र देई सितेतें
करुनि विवर नेई जानकी तेथ मातें
हळमुख महिभेदें ओपिलीं त्यांच पूर्वी
न करि कठिण आतां स्नेहसंपूर्ण उर्वी ३८८

रसातळीं स्वर्गसुरेंद्रगेहीं
असेल तेथें सुभगा विदेही
असेन तेथें कवळीन बाहीं
येणें कुराज्यें मज चाड नाहीं " ३८९

–मुक्तेश्वरकृत रामायण

सीतेची प्रार्थना ऐकून धरणी एकदम दुभंग झाली. त्या विवरांतून रत्न-सिंहासन वर आलें. शतसहस्र नागांनीं तें आपल्या शिरांवर उचलून धरलें होतें. धरित्रीमाता त्यावर विराजमान झाली होती. तिनें चटकन् बाहु पसरून सीतेला उचललें आणि आपल्या मांडीवर बसवलें. जसें वर आलें तसेंच तें सिंहासन एकदम खालीं जाऊं लागलें. त्यावेळीं आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. लोकांच्या नेत्रांतून अश्रुबिंदु टपटपले. सीता भूमींत गुप्त झाली. विवर बुजून गेलें.

रामरायानें धाय मोकलली. 'माझी सीता मला दे' म्हणून तो धरणीची करूणा भाकूं लागला. त्या महापुरुषाची अवस्था मोठी शोचनीय झाली. तें पाहून देवांसह ब्रह्मदेव तिथें आला. त्यानें सांगितलें.—

"श्रीरामा ! पुरुषोत्तमा ! सीतेविषयीं शोक करूं नको. ती आतां तुला वैकुंठभुवनीं भेटेल. मृत्युलोकींचा तुझा तिचा सहवास एवढाच !"

रामानें शोक आवरला. यज्ञ समाप्त करून तो पुत्रांसह अयोध्येंत गेला. त्यानंतरहि त्यानें अनेक यज्ञ केले. प्रजेला सर्वतोपरी सुख दिलें. दहा हजार वर्षे राज्य केलें. पुढें कोसल देशाचें राज्य कुशाला दिलें. उत्तर कोसलावर लवाची स्थापना केली. आणि शेवटीं अयोध्येंतल्या प्रजाजनांसह विमानांत बसून वैकुंठीं गमन केलें.

श्रीराम जयराम जयजयराम !

BVBK-0404360